रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १३६ । पृष्ठे १० ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. २४ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹


## चौल परिसरात गटारांची कामे; जिल्हा परिषदेचे अधिकारी

# ठेकेदारांवर मेहरबान?

### निविदा प्रक्रिया पूर्ण होण्याआधी कामाला सुरुवात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यादेश वर्कऑर्डर दिल्याशिवाय कोणतेही काम सुरू करता येत नाही. परंतु, अलिबाग तालुक्यातील चौल ग्रामपंचायतीच्या हद्दीत एमएमआरडीए अंतर्गत जिल्हा परिषदेच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या कामाचे निविदा मागविण्याची अंतिम तारीखही अद्याप उजाडली नसताना पंधरा दिवस आधीच कामे सुरू असल्याने जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि ठेकेदार यांच्यात काही अर्थपूर्ण साटेलोटे आहे का, याबाबत संशय व्यक्त करण्यात येत आहे. याबाबतची चौकशी होणे गरजेचे आहे, असे येथील नागरिकांचे मत आहे.**


निविदेचे वेळापत्रक

| तपशिल | दिनांक | वेळ |
| --- | --- | --- |
| संकेतस्थळावरुन ई-निविदा प्रसिध्दी व डाऊनलोड करणेचा कालावधी | दि.१०/१०/२०२५ पासून<br>दि.२४/१०/२०२५ पर्यंत | १०.००<br>१७.०० |
| ई-निविदा सादर करणेचा अंतिम कालावधी | दि.२४/१०/२०२५ पर्यंत | १७.०० |
| ई-निविदा उघडणेची वेळ व तारीख | दि.२५/१०/२०२५ | १७.०० |
| ई-निविदा उघडणेसाठी प्राधिकृत केलेले अधिकारी | १.मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग<br>२.मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, रा.जि.प.अलिबाग | |

सदर कामाच्या निविदे बाबत खालील बाबी अपलोड करणे आवश्यक राहतील.

### आधीच ठेकेदार कसे ठरले?

एखादा ठेकेदार मलाच काम मिळेल हे कसे काय समजू शकतो. निविदा प्रक्रिया पूर्ण होण्याअगोदर ठेकेदाराला आधीच कसे काय कळतेय की त्याला काम मिळणार आहे. आणि, तसे समजून तर चौलमध्ये कामे सुरू नाहीत ना, याबाबत चर्चांना उधाण आले आहे.

> **वर्कऑर्डरशिवाय कोणतीही कामे करता येत नाही. परंतु, जर अशी कामे कुठे सुरू असतील, तर त्याबाबत माहिती घेण्यात येईल. योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.**
> **– सत्यजीत बडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, राजिप**

चौल ग्रामपंचायत हद्दीत चौलनाका, भाटगल्ली, तुलाडदेवी,

> **चौल तुलाडदेवी, भाटगल्ली असो वा एसनाईक आळी, याठिकाणी अंतर्गत गटारांची कामे आधीच करण्यात आली आहेत. त्यामुळे निविदेमध्ये दाखविण्यात आलेली कामे कुठे आणि कशी करणार आहेत. कामांची बोगसगिरी खपवून घेणार नाही. याबाबत वेळीच याविरोधात आवाज उठवून जाब विचारण्यात येईल.**
> **– सुरेंद्र म्हात्रे,** जिल्हाध्यक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे

एसनाईक आळी परिसरात रस्त्याच्या दुतर्फा गटाचे काम करण्यासाठी एमएमआरडीए अंतर्गत जिल्हा परिषदेला निधी मंजूर करण्यात आला आहे. जवळपास ९९,९९,७४२ रुपये येथील गटाराच्या •➤पान २ वर



# भेकरच्या मांसाची तस्करी?

### राष्ट्रवादीचे जयेंद्र भगत यांचा सहभाग असल्याची चर्चा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

वाडगावमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या एका राजकीय पुढाऱ्याने भेकराच्या मांसाची तस्करी केल्याची घटना उघडकीस आली आहे. अलिबाग पोलिसांनी गुरुवारी सायंकाळी छापा टाकून ते मांस जप्त केले. दरम्यान, संबंधिताविरोधात गुन्हा दाखल करण्याची कारवाई रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

मिळालेल्या माहितीनुसार, जयेंद्र भगत असे या राजकीय पुढाऱ्याचे नाव असून, खासदार सुनील तटकरे यांच्या अगदी जवळचे कार्यकर्ते आहेत.

जयेंद्र भगत यांनी मागील चार दिवसांपूर्वी वनसंवर्धनाचा गाजावाजा करत एक शासकीय कार्यक्रम महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करून घेतला. मात्र, गुरुवारी सायंकाळी त्यांच्या घरात भेकर या वन्यप्राण्याचे मांस असल्याची माहिती अलिबाग पोलिसांना मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी धाड टाकून मांस तस्करीचा पंचनामा केला. त्यानंतर ते मांस ताब्यात घेण्यात आले.

दरम्यान, ते मांस भेकर या प्राण्याचे असल्याचे अद्याप निष्पन्न झालेले नाही. याबाबत अलिबाग पोलिसांनी वनविभागाची मदत घेतली आहे. संशयित भेकर प्राण्याचे मांस कुठून आले, असा सवाल जनमानसातून उपस्थित केला जात आहे. वनविभागदेखील या घटनेबाबत स्पष्ट बोलण्यास टाळाटाळ करीत असल्याची चर्चा जोरात सुरू आहे.

## पाच जणांचा आत्महत्येचा प्रयत्न

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवी मुंबईत धक्कादायक घटना घडली आहे. उलवे येथील जावळे गावात एकाच कुटुंबातील पाच लोकांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. आत्महत्यतेचा प्रयत्न करणाऱ्यामध्ये दोन पुरुष, दोन मुले आणि एका महिलेचा समावेश आहे. या पाच जणांपैकी एकाचा मृत्यू झाला आहे. तर, चार जणांवर उपचार सुरु आहेत.

## ओवाळीते भाऊराया रे...


(छायाचित्र : समीर मालोदे)

• भावा-बहिणीचं नातं अधिक वृद्धिंगत करणार सण अर्थात भाऊबीज.

## वे|ध|क

### वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस

**अलिबाग** : रायगड जिल्ह्याला गुरुवारी सायंकाळनंतर पुन्हा एकदा परतीच्या पावसाने झोडपून काढले. ढगांचा गडगडाट आणि वादळी वाऱ्यासह आलेल्या जोरदार पावसाने भाऊबीजेसाठी बाहेर पडलेल्या भाऊरायांचीही तारांबळ उडाली. कापणी केलेले भातपीक शेतातच असल्याने मोठे आर्थिक नुकसान होण्याच्या भीतीने शेतकरी हवालदिल झाले आहेत. या पावसामुळे काही ठिकाणी उभे भातपीक शेतात पडल्याने मातीमोल होणार आहे. दरम्यान, पुढील चार दिवस पावसाची शक्यता हवामान विभागाकडून वर्तविण्यात आली आहे.

### बैलाची चोरी करुन कत्तल

**नेरळ** : कोदिवलेतील शेतकरी भाऊ सोनावळे यांच्या जनावरांची चोरी करण्यात आली. त्यानंतर त्या बैलाची कत्तल करण्यात आल्याने शेतकरीवर्गातून संताप व्यक्त होत आहे. दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळात कोदिवले गावातील शेतकरी भाऊ विठ्ठल सोनावळे यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. २१ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री २ ते ३ वाजताच्या सुमारास अज्ञात लोकांनी बैलाची चोरी केली. भाऊ सोनावळे दररोज आपल्या गुरांना चरायला नेले होते. त्या दिवशी बैल आपली वाट चुकलेला सोनावळे ही आपली उरलेली गुरे घेऊन घरी परतले. •➤पान २ वर

# विशालला पोलीस वाचवताहेत?

### भूषण पतंगेच्या कुटुंबियांचा आरोप

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबागमधील बनावट नोटा प्रकरणात रोज नव नवे दावे-आरोप संशयित मयत आरोपी भूषण पतंगेच्या कुटुंबियांकडून करण्यात येत आहे. पतंगे कुटुंबियांकडून पोलिसांच्या एकंदरीत तपासाबाबत संशय व्यक्त केला असून, पोलिसांसोबत त्यांचे काही खासगी बगलबच्चे आतापर्यंत पुढे-पुढे असल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणात आधी 'कादर'नामक खासगी व्यक्तीचा तपासादरम्यान हस्तक्षेप असल्याची चर्चा होती. या कादरची पोलीस ठाण्यापर्यंत मजल असल्याचेही बोलले जात आहे. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. हे ताजे उदाहरण असतानाच, भूषणच्या कुटुंबियांनी तपासादरम्यान विशाल मोरे पोलिसांच्या पुढे पुढे करीत होता. मग या विशालचा या प्रकरणाशी संबंध काय? त्यानेच तर या नोटा घरात ठेवल्या नाहीत ना, असा संशय व्यक्त केला आहे. परंतु, असे असूनही विशाल मोरे आजही मोकाट असल्याचा आरोप कुटुंबियांनी केला आहे.

विशालचा या प्रकरणाशी काहीतरी संबंध नक्कीच आहे. परंतु, या प्रकरणापासून पोलिसांनी त्याला चार हात लांब ठेवल्याचा आरोप भूषणचा भाऊ मनोज पतंगे आणि भूषणच्या पत्नीने केला आहे. कारण, शुक्रवारी जेव्हा पोलीस आमच्या घरी चौकशीसाठी आले, तेव्हा विशाल •➤पान २ वर

#### पाकीट, लायन्स, कागदपत्रांची नोंद नाही

**तपासदरम्यान पोलिसांनी भूषणचे पाकिट, लायन्सन जप्त केले आहे. परंतु, त्याची कुठेही नोंद करण्यात आलेली नाही, असे कुटुंबियांचे म्हणणे आहे. गाडीचे पेपर, मोबाईलही पोलिसांनी ताब्यात घेतलेत. आमच्या वकिलांशी बोलून भूषणला न्याय कसा मिळेल, यासाठी नक्कीच प्रयत्न करणार. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांना भेटून अलिबाग पोलिसांच्या भूमिकेबाबत सांगण्यात येईल.**

**उद्याच्या अंकात : पतंगे कुटुंबियांचे अनेक दावे**

# पिसाळलेल्या बैलाचा जीवघेणा हल्ला

**एक ठार, पाच जखमी**



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरात पिसाळलेल्या बैलाचा धुमाकूळ घातला आहे. त्या बैलाच्या हल्ल्यात एकजण ठार झाला असून, पाच जणांना जखमी केले आहे. त्या पिसाळलेल्या बैलाला हेल्प फाऊंडेशनच्या माध्यमातून पकडण्यात यश आले आहे.

कर्जत शहरातील दहिवली परिसरात पिसाळलेल्या बैलाने दोन दिवस उधळण मांडत नागरिकांवर हल्ले चढवले. या घटनांमध्ये एका ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाला असून, पाच जण गंभीर •➤पान २ वर

### महावितरण जनमित्रास मारहाण

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

महावितरण जनमित्रास कोनगाव शाखा कार्यालयात येऊन मारहाण करणाऱ्या चार आरोपींवर कोनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महावितरणकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, कोनगाव शाखा कार्यालयात कार्यरत जनमित्र आशिष जाऊळकर हे लक्ष्मीपूजनाच्या दिवशी कर्तव्यावर हजर असताना आरोपी अजय नाईक याने जाऊळकर यांना फोन करून वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी काय उपाययोजना केली याची विचारणा केली, तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांचा फोन नंबर मागितला. •➤पान २ वर

**कृषीवलच्या बातमीनंतर तपासाला गती**

# अपहृत मुलगी अनम अखेर सुरक्षित!

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

कौटुंबिक वादातून अपहृत झालेल्या १ वर्ष १० महिन्यांच्या चिमुकल्या अनम अफताब सुभेदार हिच्या शोधकार्यात 'कृषीवल' या वृत्तपत्राने केलेल्या पाठपुराव्यामुळे मोठी गती आली. वृत्तपत्रात बातमी प्रकाशित झाल्यानंतर, पोलीस यंत्रणेने अधिक तत्परता दाखवत दि. २० ऑक्टोबर रोजी मुलीला सुरक्षित अवस्थेत शोधून काढले.

याबाबत अधिक माहिती अशी की, कौटुंबिक वादातून पती अफताब नजीर सुभेदार याने दि. १२ ऑक्टोबर रोजी मुलीचे अपहरण केले होते. आई हुमैरा सुभेदार यांनी न्यायालयाच्या आदेशाने सर्च वॉरंट जारी करूनही पोलीस तपासात अपेक्षित गती येत नव्हती. या गंभीर परिस्थितीत 'कृषीवल'ने या घटनेची गांभीर्याने दखल घेतली आणि अपहृत मुलीचा आणि आईच्या लढ्याचा सविस्तर वृत्तांत प्रकाशित केला. या बातमीमुळे प्रशासकीय स्तरावर आणि पोलीस यंत्रणेत तपासाची गती वाढली.

मुलगी सुरक्षित सापडल्यामुळे आई हुमैरा सुभेदार यांना मोठा दिलासा मिळाला आहे. हुमैरा सुभेदार यांनी यावेळी 'कृषीवल'चे विशेष आभार मानले. हुमैरा सुभेदार म्हणाल्या, •➤पान २ वर






**प्रतीक जेम्स सोसायटीतील घटना** | **लाल फडक्यावर सापडल्या पिठाच्या गोळ्या**

# कामोठ्यात जादूटोण्याची खळबळ

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

कामोठे सेक्टर ३५ मधील 'प्रतीक जेम्स' ही नावाजलेली आणि उच्चभ्रू मानली जाणारी सोसायटी पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. काही दिवसांपूर्वीच या सोसायटीत २५ तोळे सोन्याची चोरी झाल्याची घटना घडली होती आणि त्या घटनेचा तपास अद्याप सुरु असतानाच गुरुवारी पुन्हा एक विचित्र आणि अघोरी, जादूटोण्याच्या घटनेने सोसायटीमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, ज्या सोसायटीच्या पर्ल इमारतीमधील घरात चोरी झाली, त्याच इमारतीमध्ये हा अघोरी प्रकार घडल्याचे समोर आले आहे.


**रहिवाशांत भीतीचं वातावरण**

गुरुवारी दुपारी चार वाजता सोसायटीच्या 'पर्ल' इमारतीच्या १३व्या मजल्यावर एका लाल रंगाच्या फडक्यात गुंडाळलेली, पिठाच्या गोळ्याने बनवलेली विचित्र प्रतिकृती याच सोसायटीमधील पर्ल इमारतीमध्ये राहणाऱ्या एका रहिवाशाला दिसून आले आहे व त्यांनी प्रथम सोसायटीच्या सोशल मीडिया ग्रुपमध्ये माहिती दिली. ही वस्तू पाहताच •➤पान २ वर

> **प्रतीक जेम्ससारख्या प्रतिष्ठित आणि सुरक्षित मानल्या जाणाऱ्या सोसायटीत अशा घटना घडू लागल्याने परिसरात भीती आणि चर्चेचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरीनंतर लगेचच जादूटोण्याचा प्रकार समोर आल्याने या घटनांनी एक वेगळाच कलाटणी घेतली आहे. रहिवासी मात्र तपासाच्या निष्कर्षाकडे आणि सुरक्षा व्यवस्थेच्या वाढीव उपायांकडे आता आशेने पाहत आहेत.**

# बलिप्रतिपदेनिमित्त उधळली गुरे

## नेरळ खांडा गावात जपली परंपरा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात दिवाळी पाडवा हा दिवस आपल्या घरातील गोधन यांना सजवण्याचा दिवस असतो. विविध प्रकारे फुले आणि सजावट करून सजवून आणलेले बैल यांना गावाच्या वेशीवर मिरवणूक काढण्याची प्रथा आहे.नेरळ गावात खांडा येथे अंकुश शेळके आणि नेरळ पाडा येथे भगवान चंचे यांनी ही प्रथा कायम ठेवली आहे.

दिवाळी पाडवा हा नवीन दिवस समजला जातो आणि त्यावेळी आपल्या घरातील गोधन यांची पूजा केली जाते. गोधन यांना सजवून गावच्या वेशीवरून फेरफटका मारण्याची प्रथा असून, नेरळ गावात ही प्रथा आजही सुरू आहे. नेरळ गाव हे दोनशे वर्षांपूर्वी ज्या दोन भागात विखुरले होते, त्या खांडा आणि पाडा या गावात ही परंपरा आजही सुरू आहे. या भागातील शेतकरी यांच्या घरी शेतात काम करणारे बैल कमी झाले आहेत, मात्र बैलगाडा शर्यतीचे बैल यांची संख्या प्रचंड मोठी आहे. खांडा गावातील शेतकरी आणि बैलगाडी शर्यतमध्ये अग्रसर असलेले नेरळ गावचे माजी उपसरपंच अंकुश शेळके यांनी परिसरातील अनेक दिग्गज बैलगाडा शर्यतीमध्ये बैल यांना निमंत्रित केले होते. या बैलाचे मालक हे फेटे बांधून या सोहळ्यात सहभागी झाले होते. खांडा गावातील मैदानात या बैलांची पूजाअर्चा करण्यात आली. त्या ठिकाणी सजवलेल्या बैलांचे पाय धुवून घेण्यात आले आणि नंतर असंख्य बैलांची मिरवणूक बँड पथक यांचे सोबत काढण्यात आली. नेरळ खांडा गावात ही परंपरा जपली जात असताना असंख्य ग्रामस्थ यावेळी बैलांची मिरवणूक पाहण्यासाठी आणि फोटोग्राफी करण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा जमले होते.



## धानसर गावामध्ये परंपरा कायम

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पालिकेत समाविष्ट धानसर गावाने कात टाकली आहे. गावाचं झापट्याने शहरीकरण होत आहे. असे असताना आजही गावकरी जुन्या प्रथा परंपरा सांभाळण्याचे काम करत आहेत. पूर्वीच्या काळी बळीप्रतिपदेच्या दिवशी गुराढोरांना गावाच्या वेशीवर उधळवण्याची प्रथा ग्रामस्थांनी अद्यापही कायम ठेवली असून, प्रथेप्रमाणे गुराढोरांना सजवून या प्रथेचं पालन केल्याचं पाहायला मिळालं आहे.

एकेकाळी शेती हा प्रमुख व्यवसाय असलेल्या धानसर गावच झपाट्याने शहरीकरण होत आहे. शहरीकरणामुळे गावाचं रुपड पालटल्याने शेती हा व्यवसाय गावातून जवळपास संपुष्टात आला आहे. परिणामी, शेतीकामासाठी पूर्वी जोपसल्या जाणाऱ्या गुराढोरांची संख्या कमी झाली आहे. असे असतानाही गावातील काही शेतकरी अद्यापही शेती टिकवून आपल्या प्रथा परंपरा पाळत आहेत. पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात भातशेती केली जात होती व त्याकरिता जवळपास प्रत्येक शेतकऱ्याच्या घरी बैलजोडीसोबत गायी, म्हशी पाळण्याची पद्धत असल्याने दिवाळीदरम्यान येणाऱ्या बलिप्रतिपदा या दिवशी पहाटे लवकर उठून घरातील गुराढोरांना आंघोळ घालून सजवण्याची व गावाच्या वेशीवर गवताच्या गंजिना आग लावून त्यावरून गुरु उडवण्याची प्रथा पाळली जात होती. विशेषतः ठाणे, रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ग्रामीण भागातील गावात साजरी करण्यात येणारी ही प्रथा अनेकांनी शेतीची काम कायमची बंद करून गुरं पाळणे बंद केल्याने कमी झाली असली तरी तालुक्यातील काही गावात आजदेखील काही प्रमाणात ही प्रथा पाळण्यात येत असून पनवेल पालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १ मधील धांनसर गावातील काही व्यक्तींनी देखील ही परंपरा अद्यापदेखील जिवंत ठेवली आहे.

मागील काही वर्षात प्राणी मित्रांकडून या प्रथे वर टीका केली जात आहे. या प्रथे मुळे गुरांना इजा होण्याची शक्यता असल्याचे प्राणी मित्रांचे म्हणणे आहे. मात्र ही प्रथा साजरी करण्यामागे शास्त्रीय कारण आहे. गावाच्या वेशीवर वाळलेल्या गवताचा जाळ करून त्यावरून बैल जाळावरून उडवले जातात. या प्रथेमागे सांगितल्या जाणाऱ्या शास्त्रीय कारणानुसार भातशेतीची चिखलणी व लावणी झाल्यावर पावसाळ्यातील दोन-अडीच महिने बैलांना काही काम नसते. बैल हिरवेगार गवत खाऊन घरातल्या गोठ्यांमध्ये असतात, त्यामुळे त्यांच्या पायांना सतत ओलाव्यामुळे जखमा व रोगराई होते. काम नसल्याने काहीशा सुस्तावलेल्या बैलांना बळीप्रतिपदेला धूर व आगीवरुन उडवले जाण्यामुळे त्यांच्या अंगावर पायांवर असलेले रोग व जीवजंतू नष्ट होतात, तसेच धूर व आग यांच्याशी संपर्क आल्याने बैलांच्या मनात आग व धुराबद्दल असलेली भीती निघून जाते. दिवाळी संपली की लगेच शेतीची मशागत करण्यासाठी बैलांमध्ये चैतन्य निर्माण होते. यावेळी प्रत्येक शेतकरीदेखील बैलांच्या पुढे जाऊन स्वतः आगीवरून जातो आणि त्याच्या मागे आपल्या बैलांना ओढत नेतो.

## उरणला दीपावली मीलन उत्साहात

**। उरण । प्रतिनिधी ।**

सालाबादप्रमाणे यंदाही व्यापारी असोसिएशन उरण व महेश बालदी मित्र मंडळ यांच्या वतीने बुधवार (दि.२२) रोजी उरण येथील राम मंदिर सभागृह येथे दीपावली मिलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत सादर कार्यक्रम संपन्न झाला. आमदार महेश बालदी यांनी सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.




या वेळी महाराष्ट्र परिषद सदस्य रवी भोईर, भाजप उरण शहर अध्यक्ष तथा माजी नगरसेवक कौशिक शाह,माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, उद्योजक सुनील पेडणेकर, माजी नगरसेवक राजू ठाकूर, उद्योजक राजेंद्र पडते, माजी नगरसेवक नवीन राजपाल, भाजपा व्यापारी सेल अध्यक्ष हितेश शाह, उपाध्यक्ष मनोहर, सहतिया,सेक्रेटरी हस्तीमल मेहता, अजित भिंडे, मनन पटेल, पुरोशोत्तम सेवक, लक्ष्मन सेवक, अभिषेक जैन, दिनेश ठक्कर, परेश तेरडे, कश्यप मेहता, संतोष साळवी, व्यापारीवर्ग आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



■ दीर्घायुष्य लाभो माझ्या भावाला या प्रार्थनेसह भाऊबीजेनिमित्त आपल्या भावाची ओवाळणी करताना.

## दिवाळीनिमित्त मिठाई, कपडे वाटप

### वनवासी कल्याण आश्रमचा स्तुत्य उपक्रम

**। उरण । प्रतिनिधी ।**

वनवासी कल्याण आश्रम उरण तालुक्याच्या वतीने हिंदूंचा मोठा सण दिपावलीनिमित्त मिठाई आणि कपडे वाटप करण्यात आले. लहूचीवाडी, कल्ले येथे मिठाई वाटप करून जनजाती बांधवांची दिवाळी गोड करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. लहूचीवाडी, कल्ले येथील वनवासी कल्याण आश्रमचे कार्यकर्ते सुदाम पवार यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ॲड आकाश शहा यांनी लहान मुलांचे खेळ घेतले, निकेतन ठाकूर यांनी पसायदान म्हणून कार्यक्रमाची सुरुवात केली. वनवासी कल्याण आश्रम उरण तालुका अध्यक्ष मनोज ठाकूर यांनी वनवासी कल्याण आश्रम बद्दल आणि आश्रमा तर्फे सुरू असलेल्या विविध उपक्रमाबद्दल उपस्थित वाडीवरील बांधवांना माहिती दिली आणि ज्या मुलाची आश्रमात राहून शिकण्याची इच्छा आहे त्याला पुढील अभ्यासासाठी कल्याण आश्रम खर्च करेल असे सांगितले. पाड्यात वयस्कर आजी आजोबांना मिठाई देताना त्यांच्या डोळ्यातील भाव पाहून सर्वांना समाधान वाटले.

उपस्थित ३० भगिनींना नवीन साड्या, शाळेत जाणाऱ्या २५ मुलांना टोप्या, तसेच उपस्थित ३० बांधावाना टीशर्ट देण्यात आले. या कार्यक्रमासाठी जिल्हा हितरक्षा प्रमुख सुदाम पवार, वनवासी कल्याण आश्रम उरण अध्यक्ष मनोज ठाकूर, कार्यकर्ते ॲड. आकाश शाह, अर्णव ठाकूर, निकेतन ठाकूर, सुरेश नायडू ही मंडळी वाडीवरील जनजाती बांधवांना आनंद देण्यासाठी उपस्थित होते.

## भाऊबीजेला बहिणीला ओवाळणीत रोपे भेट

**। पाली । प्रतिनिधी ।**

भाऊबीज म्हणजे बहीण भाऊ यांच्यातील पवित्र नात्याचा सण. या सणाच्या निमित्ताने पालीतील पर्यावरण प्रेमी शिक्षक जनार्दन भिलारे यांनी आपल्या बहिणीसाठी ओवाळणीत अनोखी भेटवस्तू दिली. पर्यावरण रक्षण व्हावे म्हणून खास उत्कृष्ट जातीचे ॲपल बोर व पेरू रोप घेऊन ओवाळणीत विशेष भेट दिली.



तसेच हे झाड शेतावर आवर्जून लावायला सांगितले. झाडे लावून संवर्धन करणे हे येणाऱ्या भावी काळात अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरण रक्षण करण्यासाठी हा छोटासा प्रयत्न आहे, असे पदवीधर शिक्षक जनार्दन भिलारे यांनी सांगितले. भाऊबीज असो की रक्षाबंधन जनार्दन भिलारे आपल्या बहिणीला वृक्ष भेट देतात. याबरोबरच मित्रांना कोणत्याही उपक्रमात आवर्जून रोपे भेट देतात.

## मोदी-फडणवीसांकडून शेतकऱ्यांची फसवणूक : सावंत

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मोदी सरकारने या वर्षी सोयाबीनसाठी केवळ ५३२८ रुपये प्रति क्विंटल इतका हमीभाव जाहीर केला आहे. परंतु २०१३ साली भाजप प्रदेशाध्यक्ष म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी दिंडी काढून सोयाबीनला ६,००० रुपये हमीभाव देण्याची मागणी केली होती. त्या दिंडीला आज १२ वर्षे झाली, आणि मोदी सरकार सत्तेत येऊन ११ वर्षे उलटली तरीही शेतकऱ्यांच्या सोयाबीनला ६,००० रुपये प्रतिक्विंटल हमी भाव मिळालेला नाही. मोदी-फडणवीसांनी शेतकऱ्यांची उघड फसवणूक केली आहे, असा आरोप काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते सचिन सावंत यांनी केला आहे.

सावंत म्हणाले, २०१३ साली जेव्हा फडणवीसजी रस्त्यावर उतरून शेतकऱ्यांसाठी लढत होते, तेव्हा त्यांचा आवाज व भावन भावना खरी होती की केवळ राजकारणाचा भाग होता, असा प्रश्न आता जनतेसमोर आहे. आज ते सत्तेत आहेत, त्यांनी स्वतः केलेल्या मागणीप्रमाणे भाव मिळवून दिला नाही. हेच भाजपच्या उक्ती आणि कृतीतील दुटप्पीपणाचे ठळक उदाहरण आहे. आज बाजारात शेतकरी आपले सोयाबीन फक्त ३५०० रुपये प्रति क्विंटल दराने विकत आहे. म्हणजेच प्रत्येक क्विंटलमागे शेतकऱ्यांना १८०० ते २००० रुपये इतके थेट नुकसान होत आहे. त्यातही हमीभाव केंद्र सुरू करण्यात सरकारकडून जाणूनबुजून दिरंगाई केली जात आहे. यंदा खरेदी केंद्रांच्या वाटपातही नवा 'वाटेकरी' आणून गोंधळ निर्माण करण्यात आला आहे. पूर्वी पणन महासंघाकडे असलेले अधिकार आता राजकीय दबावाखाली विभागले गेले असून, त्यामुळे खरेदी केंद्र सुरू होण्यास विलंब होत आहे.

सावंत म्हणाले, अतिवृष्टीमुळे मूग, उडीद, कापूस, कांदा, उत्पादन पूर्णपणे नष्ट झाले, सोयाबीनचे उत्पादन घटले आणि भाव कमी राहिल्याने शेतकऱ्यांच्या हाती काहीच उरलेले नाही. सरकारने दिवाळीपूर्वी मदत देऊ अशी घोषणा केली, पण त्या घोषणा हवेत विरल्या. परिणामी, बळीराजाची दिवाळी अंधारात गेली आहे.

पूर्वी दिवाळीपूर्वीच हमीभाव केंद्रातून खरेदी सुरू व्हायची. शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती पाहता सरकारने किमान महिनाभर आधी केंद्र सुरू करायला हवे होते. पण सरकार हातावर हात धरून बसले आहे. खरीपाचे उत्पादन बुडाले तरी भाव वाढले नाहीत, उलट कमी होत आहेत. भाजपसाठी सत्ताच सर्वस्व आहे. शेतकरी त्यांच्या दृष्टीने माणूस नाही, फक्त मतदार आहे. निदान मतदार म्हणून तरी त्यांना मदत करा, असे सचिन सावंत म्हणाले.

## मल्हार सोनावळेंचे अपघाती निधन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात दिवाळी सण साजरा होत असताना नेरळजवळील पिंपळोली गावातील तरुणावर काळाने झडप घातली. रात्री घरी परतत असताना मल्हार गोविंद सोनावळे या तरुणाला गाडी चालवत असताना हृदयविकाराचा झटका आला आणि त्याची गाडी थेट रस्त्याखाली असलेल्या दुकानात घुसली. दरम्यान, या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या तरुणाच्या गाडीचे एअर बॅग उघडले गेले होते आणि एवढ्या मोठ्या अपघातानंतरदेखील त्या तरुणाला खरचटलेदेखील नव्हते.

पिंपळोली गावातील मल्हार गोविंद सोनावळे हा तरुण मिठाई बनविण्यात माहिर होता. हा तरुण आपली एम एच ४६ बी व्हि ०२०३ ही कार घेऊन रात्री घरी परतत होता. पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास हा तरुण नेरळ गावातून आपल्या पिंपळोली येथील घरी कार मधून परतत होता. नेरळ कोल्हारे येथील साई मंदिर नाका येथून गुडवण सुगवे रस्त्याने जात असताना त्याची गाडी रस्त्याच्या कडेला असलेले गोविंद डायरे यांच्या घराच्या बाहेर असलेल्या दुकानाच्या गाळ्यात घुसली. त्यानंतर ही गाडी दुकानाचे शटर तोडून पुन्हा बाहेर आली काँक्रिटचे गटारातून जात पुढे पुन्हा रस्त्याकडे आली. या अपघातात गाडीचे एअर बॅग उघडले. मात्र, अपघात झाल्यानंतर वाहनचालक यांचा मृत्यू झाला असल्याचे दिसून आले.

पान १ वरून

## ठेकेदारांवर मेहेरबान?

कामासाठीच खर्च करण्यात येणार आहेत. यासाठी जिल्हा परिषदेमार्फत नोंदणीकृत खुला कंत्राटदारांकडून ई-निविदा मागविण्याची कार्यवाही सध्या सुरु आहे. या कामासाठी दि.१० ऑक्टोबरपासून निविदा मागविण्यात आल्या असून, अंतिम दिनांक २४ ऑक्टोबरपर्यंत आहे. त्यानंतर कंत्राटदारांकडून मागविण्यात आलेल्या ई-निविदा २५ ऑक्टोबर रोजी उघडण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. म्हणजे, निविदा उघडल्यानंतर आठ-दहा दिवसांत वर्कऑर्डर देऊन संबंधित काम योग्य त्या ठेकेदाराला देण्यात येते, असा नियम आहे. परंतु, याठिकाणी संबंधित कामाची निविदा प्रक्रियादेखील अद्याप पूर्ण होणे बाकी असताना, आधीच काम सुरू कसे? यामागचे नक्की गौडबंगाल काय? या चर्चांना उधाण आले आहे.

वर्कऑर्डर देण्यात आलेली नसतानाही गटाराची कामे सुरू करण्यात आलेली आहेत. त्याबाबत कायदेशीर प्रक्रिया झाल्या आहेत का, त्याची कोणतीही तपासणी झालेली नसताना, अशा पद्धतीने जिल्हा परिषदेचे अधिकारी ठेकेदारावर मेहेरबान का? असा सवाल चौलकरांकडून करण्यात येत आहे.

**जिल्हा परिषदेचे अधिकाऱ्यांना काम सुरू असल्याचे माहिती नसल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. ज्यांच्या आदेशाने या कामाची निविदा प्रक्रिया सुरू आहे, तेच अधिकारी कामाबाबत अनभिज्ञ कसे असू शकतात, नक्की यामध्ये कोण कोणाची पोळी भाजण्याचे काम करतेय, याबाबत उलटसुलट चर्चा सुरू आहेत.**

## बैलाची चोरी करुन कत्तल

जनावरे वाट चुकल्यानंतर पुन्हा घरी परतत असताना तो नेहमीप्रमाणे परत येईल, असा विचार करून ते निघाले. मात्र, त्या बैलाची चोरी झाली होती आणि त्या बैलाची त्याच परिसरात कत्तल करण्यात आली. कत्तल करणाऱ्या व्यक्तींनी त्या बैलाचे कत्तल करून विविध साहित्य त्याच भागात अस्ताव्यस्त करून फेकून दिले होते. त्यामुळे ऐन दिवाळी सणाच्या दिवशी बैलाचे चोरी करून आर्थिक नुकसान केले आहे.

शेतीच्या कामासाठी अत्यावश्यक असलेला बैल गमावल्यामुळे सोनावळे यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. या घटनेनंतर गोरक्षक संघटना, शेतकरी बांधव आणि नागरिकांनी तात्काळ आरोपींना अटक करून कठोर शिक्षा करण्याची मागणी केली आहे. याबाबत शेतकरी भाऊ सोनावळे यांच्याकडून पोलिसांना ही माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून गुन्हा दाखल केला आहे.

## विशालला पोलीस वाचवताहेत?

मोरे पहिला घरी आला. त्याने मला भूषण आहे का विचारले. दरवाजा खोला, काही तरी विचारायचे आहे, असे तो म्हणाला, असे घरात असलेल्या भूषणच्या पत्नीने सांगितले. काय काम असेल तर बोला. काही नाही, त्याला फोन लावा. मी फोन लावला आणि त्यांना बोलले विशाल मोरे आलाय, त्याला तुमच्याशी बोलायचे आहे. ते म्हणाले, दे फोन. म्हणून मी दरवाजा उघडून विशालला फोन दिला. तो फोनवर बोलत-बोलत रस्त्यावर गेला. मी बाहेर येऊन पाहते तर भरपूर माणसे उभी होती. पोलीस होते, पण साध्या वेशात. त्यामुळे आधी मला काही समजून आले नाही. परंतु, नंतर विशाल आणि काही साध्या वेशातील माणसे आली, त्यातील एकाने त्याच्या मोबाईलमधून नोटांचे फोटो दाखवत, अशा नोटा तुमच्याकडे आहेत का, अशी विचारणा केली. मी नाही सांगितले. तरी, ते सरळ-सरळ घरात घुसले. विशाल या सर्वांच्या पुढे होता. तो काय पोलीस होता का? मी आणि माझा मुलगा तेव्हा घरात होतो, आम्हाला बाहेर काढले. आणि, विशालच घरातील सामान उचलाउचल करीत शोधाशोध करीत होता. पण, दाव्यानिशी सांगते की, आमच्या घरात काहीच सापडलेले नाही. बनावट नोटाही घराबाहेर सापडल्यात. विशालला कशा काय या नोटा सापडल्या?

पोलिसांनी त्याला येथे का आणले? तो पोलिसांचा खबरी आहे का? त्याचे या प्रकरणात नावच नाही. त्यांनीच त्या नोटा येथे आणून ठेवल्या, असा आरोप भूषण पतंगेचा भाऊ मनोज पतंगे आणि भूषणच्या पत्नीने केला आहे. नोटा घरात सापडलेल्या नाही. घराच्या बाहेर सापडल्या आहेत. आणि, पोलीस खोटारडेपणे त्या नोटा घरामध्ये सापडल्याचे सांगत आहेत. तपासादरम्यान जे प्रिंटर मिळाल्याचे पोलीस सांगत आहेत, तेसुद्धा आमच्याकडे सापडलेले नाही, असा दावाही मनोज पतंगे यांनी केला आहे.

विशाल मोरे कोण आहे, तो पोलिसांबरोबर का आला? त्याचा यामध्ये काही संबंध आहे का? हे सर्वच प्रश्न अनुत्तरीत आहेत. विशाल मोरेला घरामध्ये येऊन सर्व सामानाची झाडाझडती घेण्याचा अधिकार पोलिसांनी दिला का? पोलीस त्याला पाठीशी घालत आहे, असा आरोप मनोज पतंगे यांनी केला आहे. विशालची चौकशी का होत नाही. विशाल मोरे पुढे पुढे होता. हा प्रश्न आम्हीसुद्धा पोलिसांना विचारला की, विशाल मोरेचा या प्रकरणात काय संबंध, तो काय पोलीस आहे का? तेव्हासुद्धा पोलीस काहीच सांगायला तयार नव्हते. पोलिसांकडून भूषणला फसविण्यात आले आहे, असा आरोप मनोज पतंगे आणि भूषणच्या पत्नीने केला आहे. जर भूषण आरोपी असेल, तर त्याला न्यायालयाने दोन-पाच वर्षांची शिक्षा अथवा आणखी कोणती शिक्षा दिली असती, तरी आमचे काहीच म्हणणे नव्हते. परंतु, सर्व घडामोडी पाहता, नाट्यमय आहेत. पोलिसांचा तपास आणि त्यांची भूमिका संशयास्पद आहे, असा आरोपही पतंगे कुटुंबियांनी केला आहे.

## पिसाळलेल्या बैलाचा जीवघेणा हल्ला

जखमी झाले आहेत. कर्जत शहरातील दहिवली भागातील ललानी परिसर, संजयनगर आणिमुद्रे आदी ठिकाणी धुमाकूळ घातला होता. या पिसाळलेल्या बैलाने आदित्य कनोजिया (वय ९) या बालकावर हल्ला करून त्याला २२ ऑक्टोबरच्या रात्री जखमी केले. त्यानंतर २३ ऑक्टोबरच्या पहाटे पाचच्या सुमारास मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या मंजुळा चव्हाण (वय ६५) आणि योगिता थोरवे (वय ४४) यांच्यावर छत्रपती संभाजी महाराज चौकात बैलाने जोरदार हल्ला केला. यात मंजुळा चव्हाण यांना गंभीर दुखापत झाली असून, पुढील उपचारासाठी पनवेल येथील रुग्णालयात हलवण्यात आले.

याच वेळी संजयनगर इथे राहणारे ७० वर्षीय अर्जुन म्हसे यांच्यावरही बैलाने हल्ला करून गंभीर जखमी केले. या गंभीर हल्ल्यात अर्जुन म्हसे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तसेच आणखी दोन नागरिक किरकोळ जखमी झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

घटनेची माहिती मिळताच कर्जत पोलीस व नगरपरिषद कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. हेल्प फाऊंडेशनचे गुरुनाथ साठेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली रेस्क्यू पथकाने अत्यंत धाडसाने प्रयत्न करून बैलाला नियंत्रणात आणले. बचाव मोहिमेदरम्यान परिसरातील राज्य मार्ग काही काळासाठी बंद ठेवण्यात आला होता. पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवून नागरिकांना शांततेचे आवाहन केले. माजी नगरसेवक संकेत भासे यांनी पहाटेच्या सुमारास तात्काळ रुग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध करून दिली. या घटनेनंतर दहिवली परिसरात नागरिकांमध्ये मोठी दहशत पसरली असून, प्रशासनाने अतिरिक्त दक्षता घेतली आहे.

## महावितरण जनमित्रास मारहाण

काही वेळातच आरोपी अजय नाईक, टोनी सिंग, प्रमोद लाड, संदीप सोनकांबळे हे कोनगाव शाखा कार्यालयात आले आणि जाऊळकर यांना शिवीगाळ करून रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाण केली. तेथे असलेल्या यंत्र चालक आणि सुरक्षा रक्षकाने मध्यस्थी केली. जाताना पोलीस तक्रार केली तर काम करू देणार नाही, अशी धमकी दिली. अखेर आशिष जाऊळकर यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी वरील आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे, अशी माहिती महावितरणचे कोकण प्रादेशिक कल्याण कार्यालयाचे उपमुख्य जनसंपर्क अधिकारी यांनी दिली आहे.

## अपहृत मुलगी अनम अखेर सुरक्षित!

''पोलीस यंत्रणेकडून मदत मिळत असतानाही तपासाला अपेक्षित गती नव्हती. जेव्हा 'कृषीवल'मध्ये बातमी प्रकाशित झाली, तेव्हा वातावरण बदलले आणि तपास पथक अधिक सक्रिय झाले. कृषीवलने माझी व्यथा आणि माझ्या निरागस मुलीची गरज समाजासमोर आणली. त्यांच्या या धैर्यवान पत्रकारितेमुळे आणि सामाजिक बांधिलकीमुळे आज माझी मुलगी सुरक्षित आहे. मी कृषीवलचे आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मनापासून आभार मानते.''

या संपूर्ण कायदेशीर लढ्यात हुमैरा यांना ॲड. अजहर घट्टे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या प्रयत्नांमुळे न्यायालयाने तत्परतेने सर्च वॉरंट जारी केला. पोलीस हवालदार लवटे यांनीदेखील या शोधकार्यात महत्त्वाची भूमिका बजावली. कृषीवल, ॲड. अजहर घट्टे आणि पोलीस प्रशासनाच्या सामूहिक प्रयत्नांमुळे एका लहानग्या मुलीला तिची आई आणि सुरक्षितता परत मिळाली आहे. या घटनेमुळे माध्यमे आणि कायदेशीर यंत्रणेचा समाजाला होणारा सकारात्मक परिणाम पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

## कामोठ्यात जादूटोण्याची खळबळ

परिसरातील रहिवाशांमध्ये खळबळ उडाली. काहींनी याला 'जादूटोणा' किंवा 'भानुमतीचा प्रकार' असल्याचे म्हटले असून, सोशल मीडियावरही या घटनेचे फोटो व्हायरल झाले आहेत.

विशेष म्हणजे, ज्या मजल्यावर ही प्रतिकृती ठेवलेली आढळली, त्याच मजल्यावरील एका फ्लॅटमध्ये काही दिवसांपूर्वीच २५ लाखांच्या सोन्याची चोरी झाली होती. त्यामुळे या दोन्ही घटनांचा काही संबंध आहे का, याची चर्चा सध्या सोसायटीत जोरात सुरू आहे. रहिवाशांमध्ये या घटनेमुळे भीती आणि अस्वस्थता निर्माण झाली असून, काहींनी हे कृत्य कुणाच्यातरी धाक दाखविण्याचा किंवा अंधश्रद्धेमुळे केलेला प्रकार असावा, असा अंदाज वर्तवला आहे. या प्रकरणाबाबत एका रहिवाशाने सांगितले, ''आमच्या सोसायटीत अशा प्रकारच्या घटना आधी कधी घडल्या नव्हत्या. आधीच सोन्याची चोरी झाली आणि आता हा विचित्र प्रकार दिसतोय. त्यामुळे सर्वजण चिंतेत आहेत.''

दरम्यान, या घटनेमुळे प्रतीक जेम्स सोसायटीत भानुमती, जादूटोणा यांसारख्या अफवांनी जोर धरला आहे. काही जण या घटनेला अंधश्रद्धेचा भाग मानत आहेत, तर काहींच्या मते हा कुणाचातरी लक्ष वेधण्यासाठी केलेला दंगा असू शकतो.

## निवडक

### जनावरांना कत्तलीसाठी नेणाऱ्यांना अटक

**पनवेल :** पनवेल शहर पोलिसांनी जनावरांना कत्तलीसाठी नेणाऱ्या दोघांना टेम्पोसह ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरु आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मानखुर्द शिवाजी नगर येथील मोहम्मद युसुफ अब्दुलाहा कुरेशी (३७) आणि मोहम्मद आरीफ मोबीन अन्सारी (३८) हे दोघेजण पनवेल जवळील पळस्पे गावाच्या हद्दीतून पिकअप (एमएच-०४-एल क्यू-०९०५) मधून दोन तांबड्या रंगाच्या गाई व दोन काळया रंगाचे बैल कत्तलीसाठी घेऊन जात असल्याची माहिती पनवेल शहर पोलिंसाना मळिाली. माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरिक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरिक्षक धामापूरकर, पोलीस हवालदार पवार व गुन्हे शाखा आदींच्या पथकाने हा टेम्पो जनावरांसह ताब्यात घेऊन आरोपी विरोधात कारवाई करण्यात आली.






### संजय कदम यांचा सन्मान

**पनवेल :** तालुक्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चलवळीत सक्रिय असणारे पत्रकार, संगीत, गायन आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यासाठी ब्ल्यू पँथर्स या संघटनेने विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्या हस्ते ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांना ब्ल्यू पँथर्सचा 'मौल्यवान रत्न' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष नरेंद्र गायकवाड होते. तर, प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील सोनावळे, पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, विजय गायकवाड, सुनील सोनावणे, महेश साळुंखे, कमलाकर कांबळे, नितीन कांबळे, नवनीत गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज सदावर्ते यांनी केले, तर कृष्णा गायकवाड यांनी आभार मानले.



### कर्जत पोलिसांची भामट्यांवर कारवाई

**कर्जत :** कर्जत पोलीस खात्यातील मोठा अधिकारी आहे असे भासवून कर्जत तालुक्यातील रिसॉर्ट मालकांना धमकावत होता. एस.पी. शुभम आणि पोलीस निरीक्षक समीर असे पद आणि नाव वापरून, तुमच्या फार्मवर एक अल्पवयीन जोडपे आले होते. त्या मुलाने सोबतच्या मुलीचे बेड सीन शूट केले आहेत. हा प्रकार तुमच्या फार्म हाउसवर घडला असल्याने तुमच्यावर सुदधा पोस्को अंतर्गत गुन्हा दाखील करीत आहोत. त्यामुळे तुमचे फार्महाउस सील करण्यात येईल. या कारवाईसाठी आमची टीम मुण्यावरून निघाली असून तुम्हाला त्वरित अटक करण्यात येईल, अशी पालिसी कडक भाषेत दमटाटी करून फार्महाउस मालकाला घाबरवून त्याला सेटलमेंट करायला लावून त्यांच्याकडून पैसे वसुल करीत होते. अशा अनेक घटना समोर आल्या होत्या. कर्जत पोलिसांनी फार्महाउस मालकांची सायबर फसवणूकीबाबत तात्काळ कारवाई करून संबंधितांना फसवणूक झालेली रक्कम पुन्हा मळिवून देऊन त्यांची दिवाळी आनंदाची केली आहे.

### मोटारसायकलची रिक्षाला धडक

**कोलाड :** कोलाड-विळा मार्गावरील ढोकळेवाडी गावानाजिक बुधवारी (दि.२२) रात्रीच्या सुमारास एका दुचाकीची अॅपे रिक्षाला जोरदार धडक बसली. या धडकेत दोघेजण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी अॅपे रिक्षा (एमएच-०६-झेड-२८१२) ही विळे ते कोलाड असा प्रवास करीत होती. ही रिक्षा ढोकळेवाडी गावानजिक रुद्र हॉटेल समोर आली असता समोरून येणाऱ्या दुचाकी (एमएच-०६-बीक्यु-४३९१) समोर अचानक कुत्रा आला आणि दुचाकीस्वारोने दुचाकी विरूद्धदिशेला वळवुन अॅपे रिक्षाला धडक दिली. या अपघातात लक्ष्मण वालेकर व मंगेश आरेकर हे जखमी झाले असुन त्यांना उपचारासाठी आंबेवाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आले. अपघातचा अधिक तपास प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरिक्षक सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली कोलाड पोलीस एन.डी. महाडिक करीत आहेत.

## कळंबोली स्टील मार्केट परिसरात अंमली पदार्थांची विक्री

- सराईत गुन्हेगाराला अटक
- १५ लाख ८३ हजार किमतीचा माल जप्त

**| पनवेल | प्रतिनिधी |**

अंमली पदार्थ विरोधी पथकाने कळंबोली येथील स्टील मार्केट परिसरात छापा मारून अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला अटक केली आहे. राजन बाळा राठोड (३३) असे या सराईत गुन्हेगाराचे नाव असून पोलिसांनी त्याच्याकडून तब्बल १५ लाख ८३ हजार रुपये किमतीचे हेरॉईन आणि गांजा जप्त केला आहे. या आरोपीवर यापूर्वी आठ गंभीर गुन्हे दाखल असल्याचे तपासात आढळून आले आहे.

पनवेल तालुक्यात दररोज विविध प्रकारचे गुन्हे घडतच असतात. त्यात अंमली पदार्थाची खरेदी-विक्री या घटनांत प्रचंड प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. त्यामुळे तरूण वर्ग अंमली पदार्थाच्या विळख्यात अडकत असून त्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. यावर संबंधित प्रशासनासह पोलिसांनी कडक कारवाई करावी, अशी मागणी पनवेलकरांकडून करण्यात येत आहे. अशातच आता अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या एका व्यक्तीला अंमली पदार्थ विरोधी पथकाकडून अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्यात अटक करण्यात आलेला आरोपी राजन राठोड हा गोवंडी येथे राहत असून तो कळंबोली स्टील मार्केट परिसरात अंमली पदार्थाची विक्री करत असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मळिाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे व त्यांच्या पथकाने कळंबोली स्टील मार्केट परिसरात सापळा लावला होता. यावेळी संशयित आरोपी राजन राठोड हा त्या परिसरात आला असता त्याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याजवळ १ किलो ८०० ग्रॅम गांजा आणि ३० ग्रॅम हेरॉईन असा एकूण १५ लाख ८३ हजार रुपये किमतीचे अंमली पदार्थ सापडला. त्यानंतर अंमली पदार्थ विरोधी पथकाने आरोपी राजन राठोड जवळ सापडलेला अंमली पदार्थ जप्त केला. न्यायालयाने या आरोपीला २४ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.



**आरोपीचा गुन्हेगारी इतिहास**

अटक करण्यात आलेला आरोपी राजन बाळा राठोड हा सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरोधात विविध पोलीस ठाण्यांत गंभीर गुन्ह्यांच्या नोंदी आहेत. त्यात एनडीपीएस कायदा, मारहाण, खुनाचा प्रयत्न आणि शस्त्रास्त्र कायद्यांतर्गत गुन्ह्यांचा समावेश आहे. त्याच्यावर उरण, शिवाजीनगर, देवनार, आरसीएफ या पोलीस ठाण्यांत ८ गुन्हे दाखल असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांनी दिली.

## मिठाईऐवजी व्यक्तिगत भेटवस्तूंना पसंती

**| पनवेल | प्रतिनिधी |**

दिवाळी हा सण केवळ प्रकाशाचाच नव्हे तर आनंद, आपुलकी आणि भेटींगाठीचा सण म्हणून ओळखला जातो. या काळात आपल्या भाऊ-बहीण, नातेवाईक, मित्र परिवाराला मिठाई किंवा भेटवस्तू देऊन आपले प्रेम, स्नेह आणि शुभेच्छा व्यक्त करण्याची परंपरा आहे.

मात्र, गेल्या काही वर्षांपासून आपल्या प्रियजनांना भेटवस्तू देण्याचा ट्रेंड काहीसा बदलताना दिसतो आहे. या दिवाळीत त्या परंपरेला आधुनिक वळण मळिाले असून पारंपरिक मिठाईऐवजी व्यक्तिगत भेटवस्तूंना अधिक पसंती मळिताना दिसत आहे.



नागरिकांमध्ये वाढत चाललेली आरोग्याबाबतची जागरूकता, एखाद्या व्यक्तीसाठी खास भेटवस्तू देणे यामुळे ग्राहकांचा खरेदीचा कल बदलताना दिसत आहे. पनवेल परिसरातील गिफ्ट व सुकामेवा विक्रेते, बुटीक गिफ्ट शॉप्स इत्यादी दुकानांमध्ये सध्या ग्राहकांची वर्दळ आहे. यंदा मिठाईपेक्षा चॉकलेट्स, सुकामेवा, अरोमा कैंडल्स, गेल्या काही काळापासून नागरिकांमध्ये आरोग्याप्रति वाढलेल्या जागरूकतेमुळे साखर खाण्याचे प्रमाण घटले आहे. त्यामुळे साखरयुक्त मिठाईऐवजी साखर विरहित शुगर-फ्री मिठाईला नागरिक पसंती देत आहेत. त्याशिवाय सुकामेवा, खजूर, ड्रायफ्रूट बॉल्स आणि शुगर-फ्री चॉकलेट्सच्या मागणीतही लक्षणीय वाढ झाली आहे.

### रिक्षा चालकाला मारहाण

**| पनवेल | प्रतिनिधी |**

एका रिक्षा चालकाला ५ जणांनी आपआपसात संगनमत करून मारहाण केल्याची घटना शहरातील ओझा हॉस्पिटल परिसरात घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पनवेल शहरातील ओझा हॉस्पिटलजवळ एका रिक्षाचालकाला बेदम मारहाण झाल्याची घटना घडली. येथील रिक्षाचालक संदीप बहोत (४०) याला ५ जणांनी आपआपसात संगनमत करून मारहाण केली आहे. तसेच, लोखंडी रॉडने या रिक्षाचालकाला मारून गंभीर दुखापत केली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



● भाऊबीजेच्या पवित्र नात्याची परंपरा कायम राखत छोटोशी लाडकी बहीण आपल्या इवल्याश्या भावाला ओवाळताना (छायाचित्र: उदय कळस)

## परतीच्या पावसामुळे बळीराजा संकटात

**| रोहा | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यात परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला असून मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ऐन भात कापणीच्या हंगामात झालेल्या अवकाळी पावसामुळे भात शेती पाण्याखाली गेली आहे. हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाला असून ऐन दिवाळीत बळीराजावर उपासमारीची वेळ आली आहे.

यंदा एप्रिल महिन्यापासूनच अनियमित पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले होते. त्या हंगामातून सावरत असतानाच पुन्हा अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या आशांवर



पाणी फेरले आहे. कोलाड,बोरघर, धाटाव, सुतारवाडी, खांब, उडदवणे आदी भागातील जोडणी केलेले भात ओलाव्यामुळे भिजले असून उत्पादनावर परिणाम होणार आहे. गोरगरीब शेतकरी आपल्या घामातून मोत्याचा दाणा पिकवतो; मात्र, निसर्गाच्या कोपामुळे त्याचे स्वप्न वारंवार चुरगळले जात आहे.

## शेतकऱ्यांच्या आनंदावर विरजण

- तातडीने पंचनामे करण्याची सरकारकडे मागणी

**| सुकेळी | प्रतिनिधी |**

जिल्ह्यातील सर्वच ठिकाणी परतीच्या पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले भातपीक अक्षरशः हिरावून घेतले आहे. नागोठणे जवळच असलेल्या सुकेळी परिसरामध्ये देखील भातशेतीचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असून येथील शेतकऱ्यांचे डोळे पाणावलेले आहेत.

नागोठणे परिसरातील सुकेळी विभागामध्ये आदिवासी लोकांची वस्ती मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह शेतीवरच अवलंबून आहे. वर्षभर पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहत भातशेती लावली जाते.



येथील आदीवासी बांधवांची परिस्थिती अत्यंत हलाकिची असून शेती करण्यासाठी लागणारी बी-बियाणे, खतं, मजुर इत्यादी खर्चाने आदीवासी शेतकऱ्यांचे कंबरडे मोडत आहे. तरीदेखील त्यांच्याकडून भातशेती पिकवली जाते. दरम्यान, सर्व संकटांवर मात करत यंदा भातशेती उत्तम पिकली म्हणून सर्वच आनंदीत होते. परंतु, भातशेतीचे उत्पन्न अतिशय चांगल्या प्रकारे आले असतांनाच पुन्हा एकदा परतीच्या पावसाने त्यांच्या आनंदावर विरझण टाकले आहे. दरम्यान, परतीच्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात झालेले भातशेतीचे नुकसान पाहता राज्य सरकारने तातडीने पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातुन होत आहे.

## नवी मुंबईचे भविष्य धोक्यात

**जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी सजग नागरी मंचाचे निवेदन**




**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

नवी मुंबईतील बेलापूर हिल, पारसिक हिल, खारघर हिल आणि शहरातील इतर सर्व नैसर्गिक टेकड्या वन विभागाकडे हस्तांतरित करण्याची मागणी सजग नागरिक मंचाने जिल्हाधिकारी ठाणे आणि रायगड यांना निवेदनाद्वारे केली आहे.

नवी मुंबई शहराचे पर्यावरण, जैवविविधता आणि भविष्यातील शाश्वत विकास टिकवून ठेवण्यासाठी शहरातील टेकड्यांचे संवर्धन अत्यंत आवश्यकआहे.सध्यायाटेकड्यांवर मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड, भूमी समतलीकरण, अवैध बांधकामे आणि भूखंड विक्रीचे प्रकार सुरू आहेत. सिडको आणि नवी मुंबई महानगरपालिका या दोन्ही संस्थांनी विकास आराखड्यांमध्ये या टेकड्यांवरील काही क्षेत्रे 'निवासी' म्हणून दर्शवून पर्यावरणीय हानीला निमंत्रण दिले आहे. या कृतीमुळे शहराच्या हवामान संतुलनावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. सजग नागरिक मंचच्या म्हणण्यानुसार, शहराचे पर्यावरण, जैवविविधता आणि शाश्वत विकास टिकवण्यासाठी या टेकड्यांचे संवर्धन अत्यावश्यक आहे.

भविष्यात नवी मुंबईचे पर्यावरण वाचवायचे असेल तर नवी मुंबईतील पाणथळी क्षेत्रे, कांदळवणे, सर्व टेकड्या तातडीने वनविभागाकडे हस्तांतरित करणे हाच एकमेव मार्ग आहे, या आशयाचे निवेदन नवी मुंबईच्या सजग नागरिक मंचद्वारे रायगड व ठाण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात आले आहे. तसेच, मुख्यमंत्री, वनमंत्री, वन विभागाचे सचिव, सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेला देखील निवदेन पाठवण्यात आले आहे.

## मतिमंद मुलांच्या शाळेला आग

**| रोहा | प्रतिनिधी |**

रोहे शहरातील ज्ञानगंगा बहुविकलांग संस्था संचालित प्रेरणा मतिमंद मुलांच्या शाळेला मंगळवारी (दि.२१) रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास आग लागली. या आग दुर्घतेनेत लाखो रुपये किंमतीचे साहित्य जळून खाक झाले.

रोह्यातील मतीमंद मुलांच्या शाळेला मंगळवारी रात्रीच्या सुमारास आग लागल्याने परिसरात खळबळ उडाली. शाळेच्या कौलांमधून धूर येत असल्याचे प्रीतम देशमुख यांच्या निदर्शनास आले. रात्रीची वेळ असल्याने शाळेला कुलूप होते. प्रीतम देशमुख यांनी तत्परतेने संस्थेच्या अध्यक्षा दर्शना आठवले आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे तालुका प्रमुख नितीन वारंगे यांना आग लागल्याची माहिती दिली. तसेच, शाळेचे कुलूप तोडून



अंधारआळी व धनगर आळीतील युवकांना सोबत घेऊन मदतकार्य सुरू केले. दहा मिनिटांत एमआयडीसीच्या अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले. या आगीत शाळेचे कॉम्प्युटर, फर्निचर, सीसीटिव्ही, वायफाय सिस्टीम, कपाटातील स्टेशनरी व खेळांचे साहित्य जळून खाक झाले. या आगीचे कारण मात्र अद्याप समजू शकलेले नाही.

**कायद्याच्या क्षेत्रात नवीन वाटचाल | अॅड. प्रदीप घरत यांच्या उपस्थितीत उद्घाटन**

## अॅड. हितिका जन्नावर यांचा नवा विधी प्रवास

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

कायद्याच्या क्षेत्रात नवीन वाटचाल करणाऱ्या अॅड. हितिका जन्नावर यांच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन नुकतेच पार पडले. मुंबईतील प्रख्यात ज्येष्ठ विधिज्ञ आणि विशेष सरकारी वकील अॅड. प्रदीप घरत यांच्या हस्ते या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.



यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तोडणकर गुरुजी, ज्येष्ठ पत्रकार अमर वार्डे, सहयोग व्यापारी नागरी पतसंस्था अध्यक्ष योगेश मगर, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, दत्ता भोपी, जितेश्री पाटील, अर्जुन पाटील, संतोष मोरे, अजय घरत, डॉ. प्रशांत जन्नावर व विशाखा जन्नावर आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमादरम्यान, तोडणकर गुरुजी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना अॅड. हितिका जन्नावर यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आज एका महत्त्वाच्या मुहूर्तावर अॅड. हितिका जन्नावर यांच्या कार्यालयाचे उद्घाटन होत आहे. व्यवसायात उतरल्यावर अनेक गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, तुम्ही जो व्यवसाय निवडला आहे, त्यावर तुमची श्रद्धा आणि विश्वास असला पाहिजे. पुढे बोलताना त्यांनी, डॉ. प्रशांत जन्नावर यांचा उल्लेख केला. ते म्हणाले की, डॉ. जन्नावर यांनी सरकारी रुग्णालयात डॉक्टर म्हणून काम केले आणि त्यानंतर स्वेच्छानिवृत्ती घेऊन या सामाजिक कार्याला वाहून घेतले. त्यांचा ध्यास आणि लोकांचा त्यांच्यावरील विश्वास या गोष्टी त्यांनी जवळून पाहिल्या आहेत. त्यामुळे व्यवसायात काय करायला हवे, हे सांगण्याची त्यांना गरज नाही. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून अॅड. हितिका यांचा व्यवसाय अत्यंत यशस्वीपणे चालेल, यात शंका नाही, असेही तोडणकर यांनी सांगितले.

कायद्याच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल अॅड. हितिका जन्नावर यांना सिम्बॉसिस विद्यापीठातून विधी पदवीमध्ये सुवर्णपदक प्राप्त झाले आहे. या कामगिरीबद्दल भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला होता. या कार्यालयामुळे अॅड. हितिका जन्नावर आपल्या कार्यात यशाचे शिखर गाठतील आणि समाजात मोठे नाव कमवतील, अशा शुभेच्छा उपस्थितांनी दिल्या.

## वादळामुळे वृक्ष रस्त्यावर

- पाली-खोपोली मार्गावरील वाहतूक ठप्प

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यातील पालीसह परिसरात बुधवारी (दि.२२) संध्याकाळच्या सुमारास अचानक वादळ वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे पाली-खोपोली महामार्गावरील पाली शहराजवळ एक मोठा वृक्ष वाऱ्याच्या तीव्र झटक्यामुळे रस्त्यावर कोसळला. त्यामुळे काही काळ या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र, रस्त्यावर अडथळा निर्माण झाल्यामुळे वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागला. ही बाब वाहतूक पोलिसांच्या निदर्शनास आल्यानंतर जागरूक पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन



पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. शंतनू लिमये, प्रदीप गोळे, पोलीस कर्मचारी गायकवाड, राजेश ठाकूर आणि ऋषिकेश थळे यांनी तत्परतेने परिस्थिती हाताळली. यावेळी जेसीबीच्या सहाय्याने पडलेले झाड रस्त्याच्या बाजूला हटवण्यात आले. या कार्यवाहीमुळे वाहतूक सुरळीत सुरू झाली. जागरूक पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या तात्काळ प्रतिसादामुळे मोठी दुर्घटना टळली असून त्यांच्या कार्यक्षमतेचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

# भ्रष्टाचाराची कबुली

घराघरात नळाने पाणी ही नरेंद्र मोदी यांची महत्वाकांक्षी योजना आहे. हर घर नलजल या नावाने तिचा गवगवा केला जातो. या योजनेत प्रचंड भ्रष्टाचार झाल्याच्या अनेक तक्रारी आजवर झाल्या. आता खुद्द केंद्र सरकारनेच त्याची कबुली दिली आहे. केंद्रीय पाणीपुरवठा मंत्रालयाद्वारे सर्व राज्यांना याबाबतच्या चौकशीचे निर्देश देण्यात आले आहेत. या संदर्भात राज्याराज्यांमधले भ्रष्ट अधिकारी व कंत्राटदार यांच्याविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली याची माहिती देण्यात यावी असे केंद्राने राज्यांना सांगितले आहे. या योजनेला २०२८ पर्यंत मुदतवाढ दिली जाईल असे यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात फेब्रुवारी महिन्यात जाहीर करण्यात आले होते. पण मधल्या काळात या योजनेचा आढावा घेताना तिच्यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार झालेला असून व याबाबतच्या चौकशा चालू असूनही अधिकारी व कंत्राटदार मोकाट आहेत हे केंद्राच्या लक्षात आले. त्यामुळे आता योजनेला मुदतवाढीला केंद्रीय मंत्रिमंडळाची परवानगी रोखून धरण्यात आली आहे. राज्यांनी भ्रष्टाचाऱ्यांवर काय कारवाई केली हे कळल्यानंतरच योजना पुढे चालू करायची की नाही हे ठरेल. आज देशात बहुसंख्य मोठ्या राज्यांमध्ये भाजपची सरकारे आहेत. या राज्यांककट सर्व ठिकाणी भानगडी झालेल्या आहेत हे मुद्दाम नोंदवायला हवे. न खाऊंगा न खाने दूंगा ही नरेंद्र मोदींची घोषणा केव्हाच हवेत विरली आहे. अलिकडे मोदीदेखील ती देत नाहीत. त्यांना बहुदा खालच्या जमिनी वास्तवाची जाणीव झाली असावी. दुर्दैवाची बाब अशी की, या भ्रष्टाचाराबाबत इतके दिवस बोंबाबोंब होऊन त्याची दखल घेतली गेली नव्हती. पण आता केंद्राचा निधी संमत करण्याची वेळ आली तेव्हा काटेकोरपणा सुचला आहे. फुकट रेशन वगैरेंसारख्या रेवड्या वाटून आता केंद्राच्या तिजोरीला बरीच भोके पडली आहेत. त्यामुळे निधी कुठे वाचवता येईल याची चाचपणी सुरू झाली आहे. त्याचेच हे उदाहरण आहे. अर्थात, त्या निमित्ताने का होईना पैशाच्या उधळपट्टील चाप लागणार असेल व भ्रष्टाचाऱ्यांना शिक्षा होणार असेल तर त्याचे स्वागतच करायला हवे.

## बोगस व बेकार कामे

केंद्र सरकारने २०१९ मध्ये ही योजना सुरू केली, तेव्हा पाच वर्षांमध्ये म्हणजे २०२४ पर्यंत सर्व घरांना नळाने पाणी देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. त्यावेळी देशातील सुमारे १८ कोटी कुटुंबांपैकी साडेचौदा कोटी म्हणजे ८१ टक्के कुटुंबांना नळाद्वारे पिण्याचे पाणी मिळत नव्हते. मोदींच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मधल्या काळातल्या निवडणुका जिंकण्यासाठी या योजनेची बरीच जाहिरात करण्यात आली. पण २०२४ मध्ये विशिष्ट मुदतीत योजना पूर्ण होऊ शकली नाही. अनेक ठिकाणी नळजोडण्या दिल्या गेल्या तरी पाणीच आले नाही. महाराष्ट्राचा विचार केला तर १.४६ कोटी कुटुंबाना नळजोडणीचे उद्दिष्ट होते. त्यातल्या सुमारे ९० टक्के कुटुंबाना (१.३१ कोटी) जोडणी मिळाली. पण मुळात जी तळी, विहिरी, नद्या इत्यादींमधून नळाला पाणी येणार होते त्याच पावसाळ्यानंतर कमीअधिक कोरड्या पडत असल्याचे लक्षात आले. त्यामुळे आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार असा प्रकार सुरू झाला. पण मोदी सरकारला नळजोडण्यांची जाहिरात करण्याची संधी तर मिळाली. शिवाय, कंत्राटे देऊन कार्यकर्त्यांना खूष करून टाकण्यात आले. पण हे करताना अत्यंत निकृष्ट दर्जाची कामे झाली. नळजोडण्या वापरात येण्याआधीच तुटल्या किंवा गळू लागल्या. टाक्या बेकार निघाल्या. अनेक कंत्राटदारांनी खोटी बिले काढून पैसे उकळले. बनावट कागदपत्रे सादर करून कंत्राटे मिळवली. एकाच कंत्राटदाराला असंख्य गावांची कंत्राटे मिळाल्याचेही निष्पन्न झाले. स्थानिक आमदार व अधिकारी यांच्या सहमतीखेरीज या भानगडी होणे कठीण आहे. पण वेळ येताच ते सुटून गेले व कंत्राटदार अडकले. अनेक कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यात आले. रायगड, रत्नागिरीसह चौदा जिल्ह्यांमधल्या १०७ कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यात आले असून २६७७ कंत्राटदारांकडून ११८ कोटींचा दंड आकारण्यात आला आहे असे सरकारने मध्यंतरी जाहीर केले होते. हा दंड वसूल झाला का आणि या कंत्राटदारांशी साटेलोटे असलेल्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई झाली हे अजूनही गुप्तच आहे. आता केंद्राच्या आदेशामुळे कदाचित राज्य सरकारला याबाबत काहीतरी हालचाल करणे भाग पडेल अशी शक्यता आहे.

## कंत्राटदार लटकले, अधिकारी मोकाट

या प्रकरणामध्ये कंत्राटदारांचीही बाजू आहेच. त्यांचे तब्बल ३५ हजार कोटी रुपये राज्य सरकारकडून येणे आहेत. यासाठी मध्यंतरी कंत्राटदार संघटनेने आंदोलन केले होते. यंदाच्या जुलै महिन्यात सांगलीतील हर्षल पाटील नावाच्या ३५ वर्षीय तरुणाने सरकारकडून या योजनेतील दीड कोटी रुपयांचे येणे थकित असल्याने निराश होऊन आत्महत्या केली होती. हर्षलला एका कंत्राटदाराने हे छोटे काम दिले होते. त्याने कर्ज घेऊन ते काम पूर्ण केले होते. पण कंत्राटदाराचे पैसे सरकारने थकवल्याने त्याने हर्षलला पैसे दिले नाहीत व त्याचा शेवट आत्महत्येमध्ये झाला. या घटनेनंतर राजकारण्यांनी अश्रू ढाळले व थोडी खळबळ झाली. पण आता स्थिती पुन्हा जैसे थे आहे. रस्तेबांधणी, धरण किंवा अन्य विभागातील सर्वच कामांचे मिळून सुमारे ९० हजार कोटींचे येणे सरकारकडे बाकी असल्याचे कंत्राटदारांचे म्हणणे आहे. त्यात १२ हजार कोटी या योजनेतील आहेत. त्यातील ५० टक्के वाटा केंद्राचा आहे. पण भ्रष्टाचाराच्या तक्रारीमुळे त्यांनी पैसे द्यायला नकार दिला आहे. या योजनेत भ्रष्टाचार झाला आहे हे खुद्द कंत्राटदार संघटनेचे लोकच सांगतात. या कामाचे अंदाजपत्रक एका खासगी कंपनीने कार्यालयात बसून तयार केले. यासाठी तिने गावोगाव पाहणी वा सर्वेक्षणे करणे अपेक्षित होते. पण ते न करता गुगल मॅपच्या आधारे कागदावर झटपट योजना तयार करून तिला मंजुरी देण्यात आली. त्यामुळेच पुढे जिथे जोडणी दिली आहे तिथे बारा महिने पाण्याची सोय आहे की नाही याची कोणतीही खातरजमा केली गेली नाही. वास्तविक ही भानगड केंद्राच्या तेव्हाच लक्षात यायला हवी होती. पण आता ते राज्य सरकार व कंत्राटदारांना कैचीत पकडू पाहत आहेत. त्यात सुक्याबरोबर ओलेही जळते तसा प्रकार घडू लागला असून प्रामाणिकपणे कामे केलेल्या हर्षलसारख्यांना जीव देण्याची पाळी आली आहे. आता केंद्राने भ्रष्टाचाराबाबत दाखवलेली जागरुकता आरंभापासून दाखवली असती तर हा बळी जाणे टळले असते. आता तरी किमान याबाबत वेगाने कार्यवाही व्हावी व जिथे कामे झाली आहेत त्यांचे पैसे दिले जावेत. दुसरीकडे पाण्याची सोय आहे की नाही आणि नळजोडण्यांचा दर्जा कसा आहे याचे स्वतंत्र पथकामार्फत परीक्षण केले जावे. तरच खर्च केलेला पैसा सत्कारणी लागेल. अन्यथा या नळजोडण्या म्हणजे सरकारी भ्रष्टाचाराची स्मारके होऊन बसतील व मोदी दुसरी काहीतरी घोषणा करून ही स्मारके विसरून जातील.

विचार

# पाकव्याप्त काश्मीरमधील होरपळ

***एकीकडे पाकिस्तान भारतावर आरोप करून स्वतःच तोंडघशी पडत असताना पाकव्याप्त काश्मीर मात्र हिंसाचाराच्या वणव्यात होरपळतो आहे. याशिवाय पाकिस्तानमधील अनेक प्रांत एकमेकांशी भीषण संघर्ष करत आहेत. काही प्रांत तर पाकिस्तानातून फुटून निघण्याची भाषा करत आहेत. बलुचिस्तानसारख्या काही प्रांतांनी तर आपले स्वातंत्र्य घोषित केले आहे. या परिस्थितीत तिथले केंद्र सरकारही अडचणीत आहे.***

प्रा. जयसिंग यादव



पाकव्याप्त काश्मीरमध्ये निदर्शक आणि सुरक्षा दलांमध्ये अलिकडेच झालेल्या हिंसक चकमकीत तीन पोलिस अधिकाऱ्यांसह नऊजणांचा मृत्यू झाला. दोन्ही बाजूंचे डझनभर लोक जखमी झाले. परिस्थिती नियंत्रित करण्यासाठी संघीय सरकारने एक वाटाघाटी समिती पाठवली होती. नुकतीच पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीर संयुक्त अवामी कृती समिती (जेएएसी) सोबत महत्त्वपूर्ण चर्चा करण्यासाठी ती मुझफ्फराबाद येथे पोहोचली होती. ही समिती व्यापाऱ्यांचे आणि नागरी समाज गटांचे प्रतिनिधित्व करणारी एक प्रमुख संघटना आहे, जी संपूर्ण प्रदेशातील तळागाळातील असंतोषाचा आवाज म्हणून उदयास आली आहे. या प्रकरणात मिळालेल्या माहितीनुसार, कार्यकर्ते शौकत नवाज मीर यांच्या नेतृत्वाखाली 'जेएएसी'ने आयोजित केलेला बंद २९ सप्टेंबर रोजी सुरू झाला. त्यामुळे पाकिस्तान प्रशासित काश्मीरमधील अनेक जिल्हे, ज्यांना स्थानिक पातळीवर आझाद जम्मू आणि काश्मीर (एजेएके) म्हणून ओळखले जाते, ते पूर्णपणे ठप्प झाले. सरकारने तिथे २८ सप्टेंबरपासून संपूर्ण संप्रेषण ब्लॅकआउट लागू केले आहे, रहिवाशांचे मोबाइल टेलिकम्युनिकेशन आणि इंटरनेट कनेक्शन खंडित केले आहे. मुझफ्फराबादमधील गजबजलेल्या बाजारपेठा बंद आहेत, तर रस्त्यावर विक्रेतेही नाहीत. सार्वजनिक वाहतूक ठप्प आहे. या गोंधळामुळे प्रदेशातील सुमारे ४० लाख रहिवासी अनिश्चिततेच्या स्थितीत बुडाले आहेत. सरकारने एका निवेदनात म्हटले आहे, की अधिकारी सुव्यवस्था पुनर्संचयित करण्यासाठी काम करत आहेत आणि जनतेला विशिष्ट अजेंडा घेऊन 'सोशल मीडिया'वर पसरवल्या जाणाऱ्या प्रचार आणि खोट्या बातम्यांनी प्रभावित होऊ नये, असे आवाहन केले आहे.

गेल्या दोन वर्षांमधील या भागात हे तिसरे मोठे आंदोलन आहे. सरकारने समितीच्या ३८ सूत्री मागण्या मान्य न केल्यामुळे हे आंदोलन सुरू झाले. पाकव्याप्त काश्मीरमधील स्थानिक सरकार आणि आंदोलकांमध्ये गेल्या दोन वर्षांपासून सुरू झालेला संघर्ष थांबायला तयार नाही. या संघर्षामागचे कारण जाणून घेतले पाहिजे. काश्मीर खोरे हा एक सुंदर; पण वादग्रस्त हिमालयीन प्रदेश आहे. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून पाकिस्तान आणि भारतात अनेक युद्धे झाली आहेत. चीनचेदेखील या प्रदेशाच्या उत्तरेकडील दोन भागांवर नियंत्रण आहे. भारताने पाकव्याप्त काश्मीर परत घेण्याची भाषा वारंवार वापरली आहे. चीन पाकिस्तानचा मित्र असला, तरी पाकिस्तान चीनने व्यापलेल्या भागांशिवाय संपूर्ण काश्मीरवर दावा करतो. २०१७ च्या जनगणनेनुसार पाकव्याप्त काश्मीरची लोकसंख्या ४० लाखांहून अधिक आहे. पाकव्याप्त काश्मीरला पंतप्रधान आणि विधानसभेला अर्ध-स्वायत्तता आहे. सध्याच्या अशांततेचे मूळ मे २०२३ मध्ये आहे. या भागातील नागरिक गगनाला भिडणाऱ्या वीज बिलांचा निषेध करण्यासाठी प्रथमच रस्त्यावर उतरले होते. पिठाची प्रचंड तस्करी आणि अनुदानित गव्हाच्या पुरवठ्यात तीव्र कमतरता असल्याच्या तक्रारी होत्या. ऑगस्ट २०२३ पर्यंत या वेगळ्या तक्रारींचे रूपांतर संघटित प्रतिकारात झाले. त्या वर्षी सप्टेंबरमध्ये शेकडो कार्यकर्ते मुझफ्फराबादमध्ये जमले आणि त्यांनी औपचारिकपणे 'जेएएसी'ची स्थापना केली. त्यात या प्रदेशातील सर्व जिल्ह्यांचे प्रतिनिधी समाविष्ट होते.

मे २०२४ मध्ये निदर्शकांनी मुझफ्फराबादकडे 'लाँग मार्च' सुरू केला, तेव्हा या आंदोलनाची पहिली मोठी तीव्रता दिसून आली. आंदोलनाला हिंसक वळण लागले. त्यात एका पोलिस अधिकाऱ्यासह किमान पाचजणांचा मृत्यू झाला. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी पिठाच्या किमती आणि वीजदरात कपात यासारख्या प्रमुख मागण्या मान्य केल्या, तेव्हाच हिंसक निदर्शने थांबली. पीठ परवडणाऱ्या दरात मिळावे आणि वीजदरात कपात करावी, यासाठी सरकारने अब्जावधी रुपयांचे अनुदान वाटप केले. तथापि, ही शांतता फार काळ टिकली नाही. त्याच वर्षी ऑगस्टमध्ये 'जेएएसी'ने आणखी एक टाळेबंदी लागू करण्याची घोषणा केली. 'जेएएसी'ने सादर केलेल्या मागण्यांमध्ये ३८ विशिष्ट मुद्दे समाविष्ट आहेत. या मागण्यांमध्ये मोफत शिक्षण आणि आरोग्य सेवा प्रदान करणे, मोठे पायाभूत सुविधा प्रकल्प सुरू करणे आणि प्रांतीय कायदेमंडळाची रचना बदलणे यांचा समावेश आहे. या यादीच्या वरच्या भागात सत्ताधारी वर्गाचे विशेषाधिकार संपवण्याची मागणी करण्यात आली आहे. ही मागणी मागील तक्रारींमध्येदेखील अधोरेखित करण्यात आली होती. 'जेएएसी' ने म्हटले आहे, की मे २०२४ च्या निषेधानंतर सरकारने वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या विशेषाधिकारांचा आढावा घेण्यासाठी न्यायिक आयोगाची स्थापना मान्य केली. मंत्री आणि वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांना देण्यात येणाऱ्या विशेषाधिकारांमध्ये दोन सरकारी वाहने, अंगरक्षकांसह वैयक्तिक कर्मचारी आणि अधिकृत कामांसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांसाठी अमर्यादित इंधनाचा समावेश आहे.

'जेएएसी'च्या यादीत पहिल्यांदाच समाविष्ट केलेली दुसरी प्रमुख मागणी स्वायत्त प्रदेशाच्या विधानसभेत निर्वासितांसाठी राखीव असलेल्या बारा जागा रद्द करण्याशी संबंधित आहे. 'जेएएसी'च्या मते १९४७ च्या फाळणीनंतर भारताच्या काश्मीरमधून गेलेल्या निर्वासितांनी आणि त्यांच्या वंशजांनी आता एक शक्तिशाली राजकीय गट तयार केला आहे. त्यांनी विकासनिधीची मक्तेदारी केली आहे. २०२३ आणि २०२४ च्या निषेधादरम्यान कार्यकर्त्यांवर दाखल केलेले कायदेशीर खटले मागे घेण्याची मागणीदेखील या सनदेत करण्यात आली आहे. मागण्यांमध्ये करसवलती आणि चांगल्या रोजगाराच्या संधींचा समावेश आहे. पायाभूत सुविधांचा विकास हा 'जेएएसी'च्या दृष्टिकोनाचा एक प्रमुख केंद्रबिंदू आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळाव्यतिरिक्त समितीने बोगदे आणि पूल यासह नवीन प्रकल्पांची मागणी केली आहे, जे पर्वतीय प्रदेशाला उर्वरित पाकिस्तानशी जोडतील. मुझफ्फराबादमध्ये सध्या एक विमानतळ आहे; परंतु ते वर्षानुवर्षे बंद आहे. तथापि, या वर्षी एप्रिलमध्ये पंतप्रधान शरीफ यांनी या प्रकल्पाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी एक समिती स्थापन केली. त्यांनी या प्रदेशातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे शहर असलेल्या मीरपूरमध्ये आणखी एक विमानतळ विकसित करण्याची व्यवहार्यता तपासण्याचे निर्देश दिले. ताज्या अस्वस्थतेनंतर मात्र येथे स्थानिक प्रशासनाने दळणवळण बंद केले असून शैक्षणिक संस्था अनिश्चित काळासाठी बंद करण्याचे आदेश दिले आहेत. त्याहूनही वादग्रस्त म्हणजे त्यांनी अर्धसैनिक दलांसह उर्वरित पाकिस्तानमधून अतिरिक्त पोलिस तुकड्या बोलावल्या आहेत. पाकिस्तानी संघराज्य सरकारने या संघर्षात नऊजणांचा मृत्यू झाल्याचे म्हटले आहे; परंतु वरिष्ठ स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांनी मृतांची संख्या १५ असल्याचे सांगितले आहे. 'जेएएसी'ने अर्धसैनिक दलांच्या तैनातीवर आक्षेप घेतला आहे. 'जेएएसी' नेते मीर यांनी या आठवड्याच्या सुरुवातीला पत्रकारांना सांगितले, की स्थानिक पोलिस आधीच उपस्थित असल्यामुळे मुख्य भूमी पाकिस्तानमधून निमलष्करी दलांना बोलावण्याची गरज नाही. पाकव्याप्त काश्मीरचे अर्थमंत्री अब्दुल मजीद खान यांनी कबूल केले, की चर्चेची पहिली फेरी आधीच झाली असली, तरी आता एक नवीन समिती मुझफ्फराबादमध्ये आली आहे. तिला निदर्शकांच्या तक्रारींचे निराकरण करण्याचे काम देण्यात आले आहे. खान यांनी सरकारचा बचाव करताना म्हटले आहे, की गेल्या वर्षी त्यांनी निदर्शने सुरू केली, तेव्हा ते सर्व वीज आणि पिठाच्या किमतींबद्दल होते आणि आम्ही यावर सहमत झालो; परंतु त्यांनी हेदेखील समजून घेणे आवश्यक आहे, की गोष्टी एका रात्रीत बदलू शकत नाहीत आणि त्यासाठी वेळ लागतो. 'जेएएसी'च्या ३८ मुद्द्यांपैकी बहुतेक मुद्द्यांवर सरकारने सहमती दर्शवली आहे; परंतु निर्वासितांसाठी राखीव बारा जागा रद्द करणे आणि 'सत्ताधारी वर्गाचे विशेषाधिकार' संपवण्याच्या मुद्द्यांवर वाटाघाटीवरून बोलणे फिसकटले आहे.

उपखंडाच्या फाळणीच्या वेळी झालेल्या गैरसोयीकडे लक्ष वेधून मंत्र्यांनी निर्वासितांसाठी राखीव जागा रद्द करण्यामागील तर्काला आव्हान दिले. खान यांनी युक्तिवाद केला, की हे असे लोक आहेत, ज्यांचे कुटुंब भारतातून आले होते. तिथे ते जमीनदार आणि व्यापारी होते; परंतु त्यांची मालमत्ता मागे सोडून अत्यंत गरिबीत पाकिस्तानात पळून गेले. 'जेएएसी'ला वाटते, की त्यांना जागांचा कोटा देणे अन्यायकारक आहे. मंत्री स्वतः या प्रदेशातील अंदाजे २.७ दशलक्ष लोकांमध्ये आहेत, ज्यांच्या कुटुंबांनी भारताच्या काश्मीरमधून स्थलांतर केले. दरम्यान, 'जेएएसी'च्या बहुतांश मागण्या पूर्ण झाल्या आहेत, असा दावा करून खान यांनी पुन्हा निदर्शने करण्याचे कारण काय, असा प्रश्न उपस्थित केला.

सरकारी प्रतिनिधी आणि 'जेएएसी' सदस्यांमधील चर्चा कोणत्याही तोडग्याशिवाय संपली. त्यानंतरही दोन्ही बाजूंनी संवादासाठी वचनबद्धता व्यक्त केली; परंतु वारंवार आश्वासने आणि निराशेनंतर सरकारविरोधात अविश्वास वाढत चालला आहे. या भागातील नाराजी आणि अस्वस्थता किती लवकर संपेल हे काळच सांगेल. तथापि, सध्याची परिस्थिती पाहता निदर्शकांच्या अलिकडच्या मृत्यूंमुळे लोक खूप संतापले आहेत आणि प्रभावित झालेल्यांना इतक्या लवकर शांत करणे कठीण आहे, असे दिसते.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

# खरच नक्षलवाद शेवटचा श्वास घेतोय?

सुयोग आंग्रे

काही दिवसांपूर्वी नक्षलवाद्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण केले. देशाच्या संविधानावर विश्वास ठेवून त्यांनी आत्मसमर्पण केल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. असे असलेतरी देश स्वतंत्र झाल्यानंतर जेव्हा संविधान अस्तित्वात आले त्याला आता पंचाहत्तर वर्ष पूर्ण होऊन गेले आहेत. म्हणजेच संविधानाशिवाय पर्याय नाही हे नक्षलवाद्यांना समजण्यास किंबहुना त्यांना संविधान समजावून सांगण्यात शासन अपयशी ठरल्याचे यातून अधोरेखित होते आहे. एक गोष्ट चांगली आहे. नक्षलवादी आता समर्पण करीत आहेत. हे देशाच्या भविष्याच्या दृष्टीने चांगले आहे. असे म्हणावे कि डाव्या विचारांचा पगडा असतानाही उजव्या विचारसरणीला अंगीकृत करण्यासाठी त्यांच्यावर बंधने लादली जात आहेत. असो पण सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने नक्षलवाद आता हळूहळू संपणार आहे. हे ऐकण्याचाआनंद घेण्यास तूर्तास कोणतीच हरकत नाही. सध्या संपूर्ण माओवादी पक्ष नेतृत्वहीन आहे, त्यामुळे भारत सरकार पुढील वर्षी ३१ मार्चपर्यंत माओवाद्यांचा नायनाट करण्यासाठी कटिबद्ध आहे. गृह मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, देशातील माओवादग्रस्त जिल्ह्यांची संख्या ११ वर आली आहे, त्यापैकी केवळ तीन जिल्हे अत्यंत प्रभावित आहेत. या ११ जिल्ह्यांपैकी ७ जिल्हे छत्तीसगडमधील आहेत. यामध्ये नारायणपूर आणि कांकेरमधील जवळपास सर्व माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. गरियाबंद जिल्ह्यातील माओवाद्यांनीही आत्मसमर्पण करण्याचे सांगितले आहे. सुरक्षा दलांना नुकतेच माओवादाच्या विरोधातील लढ्यात काही मोठे यश मिळाले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील गडचिरोली येथील केंद्रीय समितीचे सदस्य आणि माओवाद्यांचे पॉलिटब्युरो वेणुगोपाल उर्फ भूपती उर्फ सोनू यांच्या दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीच्या सदस्यांसह ६० माओवाद्यांचे स्वयंचलित शस्त्रांसह आत्मसमर्पण अनेक अर्थाने महत्त्वाचे होते. माओवाद्यांच्या विचारसरणीतील हा बदल अचानक आलेला नाही. ऑगस्ट २०२४ मध्ये, माओवादी पॉलिट ब्युरोने पक्षाला वाचवण्यासाठी बचावात्मक उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला होता. सर्व मोठे पक्ष आणि कंपन्यांचे छोटे तुकडे करून माओवादी सुरक्षा दलांपासून पळून जाण्यासाठी सतत प्रयत्न करत होते. तेलंगणात नुकतेच अनेक माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले. यामध्ये माजी माओवादी किशनजी यांच्या पत्नी पद्मावती उर्फ सुजाता, चंदू, विकास इत्यादींचा समावेश आहे. बदललेल्या परिस्थितीत सरकारची दोन कर्तव्ये महत्त्वाची आहेत. प्रथम, त्या भागाचा योग्य विकास व्हावा आणि दुसरे म्हणजे आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांचे योग्य पुनर्वसन व्हावे. अशा सर्व सामाजिक विषमता दूर करण्यासाठी सरकारने प्रयत्न केले पाहिजेत, ज्याच्या आधारे माओवाद्यांनी गावकऱ्यांमध्ये प्रवेश केला होता. 'नियाद नेलानार' (तुमचे चांगले गाव) सारख्या विकास योजना केवळ सुरक्षा शिबिरांच्या पाच किलोमीटरच्या परिघात मर्यादित न राहता माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलेल्या संपूर्ण भागापर्यंत विस्तार केला पाहिजे. शिक्षणासाठी आश्रम, रुग्णालये किंवा आरोग्य सेवेसाठी दवाखाने बांधण्याची योजना लवकरच राबवावी लागेल, कारण वनोपज हे आदिवासींच्या जीवनाचे महत्त्वाचे साधन आहे. त्यांच्या रास्त किमतीसाठी काही योजनांची अंमलबजावणी आणि त्यांच्या प्रक्रियेचाही विचार करावा लागेल. रस्तेही बांधले जावेत, मोबाईल टॉवर बसवावेत. अशी विकासकामे राबविताना पर्यावरणाची कमीत कमी हानी होईल याचीही काळजी घ्यावी लागणार आहे. आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांना पुनर्वसन धोरणाचा लाभ लवकर मिळावा यावरही सरकारने लक्ष ठेवले पाहिजे. त्यांना आवश्यक प्रशिक्षण देऊन रोजगाराचे साधन उपलब्ध करून द्यावे लागेल. हे सर्व केल्यानंतरही माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलेल्या भागांवर सुरक्षा दलांना लक्ष ठेवावे लागणार आहे. सध्या संपूर्ण माओवादी पक्ष नेतृत्वहीन आहे, त्यामुळे भारत सरकार पुढील वर्षी ३१ मार्चपर्यंत माओवाद्यांचा नायनाट करण्यासाठी कटिबद्ध आहे. गृह मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, देशातील माओवादग्रस्त जिल्ह्यांची संख्या ११ वर आली आहे, त्यापैकी केवळ तीन जिल्हे अत्यंत प्रभावित आहेत. या ११ जिल्ह्यांपैकी ७ जिल्हे छत्तीसगडमधील आहेत. यामध्ये नारायणपूर आणि कांकेरमधील जवळपास सर्व माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. गरिआबंद जिल्ह्यातील माओवाद्यांनीही आत्मसमर्पण करण्याचे सांगितले आहे. काही भाग वगळता दंडकारण्यमधील जवळपास सर्व माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. आता, माओवादी केंद्रीय लष्करी आयोगाचे प्रमुख देवजी, लष्करी बटालियनचे प्रमुख माडवी हिडमा आणि दंडकारण्य समितीचे काही सदस्य याशिवाय बाकी आहेत, जे शरण जायचे की युद्ध सुरू ठेवायचे या संभ्रमात आहेत. सोनू आणि रुपेश प्रमाणे ते देखील परिस्थितीचा विचार करून लवकरच मुख्य प्रवाहात येण्याचा निर्णय घेतील अशी शक्यता आहे. तसे झाले नाही तरी माओवादी पक्ष ही केवळ औपचारिकता राहील.

दिनविशेष

# जागतिक पोलिओ दिन



आज २४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा केला जातो. पोलिओ मुक्तीसाठी मोलाचे योगदान देणारे शास्त्रज्ञ जॉन सॉल्क यांचा आज जन्मदिवस. जॉन सॉल्क आणि त्यांच्या टीमने पोलिओची पहिली लस शोधून काढली म्हणून त्यांचाच जन्मदिन जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय जागतिक आरोग्य संघटनेने घेतला. आजच्या दिवसाकडे पोलिओशी दिलेल्या यशस्वी लढ्याचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने १९९८ सालापासून पल्स पोलिओची मोहीम हाती घेतली. जानेवारी व फेब्रुवारी महिन्यातील रविवार पोलिओ रविवार म्हणून साजरा केला जातो. पोलिओ रविवारच्या नंतरच्या आठवड्यात ० ते ५ वयोगतील बालकांना घरोघरी जाऊन पोलिओचा डोस पाजला जातो. त्यासाठी व्यापक प्रमाणावर जनजागृती केली जाते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनाखाली आपल्या आरोग्य यंत्रणेने भारतातून पोलिओ मुक्तीसाठी अथक प्रयत्न केले. अमिताभ बच्चन, मोहम्मद कैफ इत्यादी व्यक्तींनीही दूरचित्रवाणीवरून जनजागृती केली. शासन, प्रशासन, आरोग्य यंत्रणा यांच्या अथक प्रयत्नातून आज भारत पोलिओ मुक्त झाला आहे. २७ मार्च २०११ या दिवशी जागतिक आरोग्य संघटनेने भारत पोलिओ मुक्त झाल्याची घोषणा केली. अर्थात सव्वाशे कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशाला पोलिओ मुक्त करणे ही वाटते तितकी सोपी गोष्ट नव्हती. सुरवातीला तर पालक आपल्या बालकांना पोलिओ डोस देण्यास तयारच होत नसे. आपल्या बालकांना पोलिओ डोस पाजण्यास पालक निरुत्साही होते. लोक घरातून बाहेरच पडत नसत. पालकांचा निरुत्साह असला तरी आरोग्य खात्यातील कर्मचारी हिरमुसले नाही. त्यांनी त्यांचे काम चालूच ठेवले. एखादे व्रत हाती घेतल्या प्रमाणे देशातील आरोग्य कर्मचारी पोलिओ मुक्तीसाठी झटत होते. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांना लवकरच यश मिळाले. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार या राज्यात दूषित पाण्यामुळे जुलाब, उलट्यांचे प्रमाण अधिक असल्याने तिथे तोंडावाटे दिलेली लस उपयुक्त ठरत नव्हती. तेंव्हा वैद्यकीय संशोधकांनी मुरदाबाद या गावात पोलिओची एक गुणी लस म्हणजे १,२,३ विषाणूंची लस वेगवेगळी प्रत्येक जन्मलेल्या बाळास दिली. मात्र देशातील सगळ्या बालकांपर्यंत असा कार्यक्रम पोहचवणे अशक्य होते. त्यानंतर पुन्हा त्यात संशोधन करण्यात आले. सर्वांना उपयुक्त अशा लसीची मात्रा तयार झाल्यानंतर देशात पोलिओ मुक्तीची मोहीम वेगाने राबवण्यात आली. त्याचा परिणाम म्हणजे आज पोलिओमुक्त मुक्त भारत अशी आपली ओळख बनली आहे. आफ्रिका खंडातील काही देशात तसेच आशिया खंडातील पाकिस्तान, अफगाणिस्तान, सीरिया या देशात अजूनही पोलिओचे रुग्ण आढळून येतात. या देशातूनही पोलिओ लवकरच हद्दपार होईल आणि जग लवकरच पोलिओमुक्त होईल अशी आशा करूया.

**– श्याम ठाणेदार, पुणे**

लोकसंसद

# 'मनाचे श्लोक' नावाचा वापर करणे पडले महागात !

समर्थ रामदास स्वामी लिखित 'मनाचे श्लोक मागील साडेतीनशेहून अधिक काळ विद्यार्थ्यांच्या मनात संस्कारांचे बीजारोपण करत आहेत. साध्या सरळ भाषेत असलेले 'मनाचे श्लोक' आदर्श जीवन कसे असावे याची शिकवण बालमनावर उत्तम प्रकारे बिंबवतात. लहानग्यांनाच नव्हे तर मोठ्यांनाही या श्लोकांच्या वाचनातून उभारी मिळते, स्वतःतील दोषांची जाणीव होते, काय करावे आणि काय टाळावे याचे दिशादर्शन होते, त्यामुळे शेकडो वर्षांपासून हे श्लोक घराघरांत श्रद्धेने आणि आदराने म्हटले जात आहेत, पाठ केले जात आहेत. अशा परमश्रध्देय 'मनाचे श्लोक' हे नाव घेऊन एक चित्रपट मागील महिन्यात प्रदर्शित झाला. हे नाव वाचल्यावर या चित्रपटातून समर्थांविषयी अधिक माहिती मिळेल, हा चित्रपट आपल्या घरातील लहान मुलांनाही दाखवूया अशी काहीशी चर्चा सुरु असतानाच चित्रपटाचा ट्रिझर प्रदर्शित झाला आणि चित्रपटाची सत्यता समोर आली. भारतीय संस्कृतीला काळिमा फासणाऱ्या 'लिव्ह इन रिलेशनशिप'चा उहापोह करणारा हा चित्रपट असल्याचे लोकांच्या लक्षात आले ज्यातील काही दृश्यसुद्धा खटकणारी होती. चित्रपटात हेच दाखवायचे होते, तर त्याला 'मनाचे श्लोक' नाव का? हा स्वाभाविक प्रश्न त्यावेळी प्रेक्षकांना पडला आणि या चित्रपटाच्या नावाला विरोध सुरु झाला. केवळ आपला गल्ला भरण्यासाठी परमपवित्र 'मनाचे श्लोक' या नावाचा वापर करणे कोणालाही न रुचणारे होते. या चित्रपटाला प्रेक्षकांकडूनच विरोध होऊ लागला, काही ठिकाणी या चित्रपटाचे प्रक्षेपण थांबवण्यात आले. चित्रपटाच्या निर्मात्यांनी अखेर राज्यभरात या चित्रपटाचे प्रक्षेपण बंद करून चित्रपटाचे नाव बदलून चित्रपट पुन्हा प्रदर्शित करण्याची घोषणा केली. त्यानुसार चित्रपटाला 'तू बोल ना' असे नाव देऊन १६ ऑक्टोबरला चित्रपट पुन्हा प्रदर्शित करण्यात आला; मात्र मायबाप प्रेक्षक चित्रपटाच्या निर्माता दिग्दर्शकांसह कलाकांवर नाराज झाल्याने त्यांनी या चित्रपटाकडे अक्षरशः पाठ फिरवली. प्रेक्षकांच्या भावनांचा विचार न करता चित्रपट प्रदर्शित केल्यास त्याचे काय परिणाम होतात हे या चित्रपटाच्या टीमच्या लक्षात आलेच असेल. यावरून अन्य निर्माता दिग्दर्शकांनीही बोध घ्यायला हवा. चित्रपट हा व्यवसाय आहे आणि तो ज्यांच्यावर अवलंबून आहे त्या प्रेक्षकांच्या आवडीनिवडी जपायला हव्यात, त्यांच्या भावनांचा सन्मान करायला हवा. आजमितीला 'महाअवतार नरसिम्हा', 'कांतारा : अ लिजेंड चॅप्टर १', 'दशावतार' यांसारखे चित्रपट बॉक्स ऑफिसवर भरपूर गल्ला जमवतात. या चित्रपटांतून धार्मिक विषय हाताळले आहेत मात्र ते हाताळताना प्रेक्षकांच्या भावनांचाही आदर करण्यात आला आहे. मागील ४-५ वर्षांत प्रेक्षकांची आवड बदलू लागली आहे. आपली श्रद्धास्थाने, धार्मिक प्रतीके, आपल्या प्रथा परंपरा यांबाबत सजग होऊ लागले आहेत. त्यांचा अवमान आजचा प्रेक्षक सहन करणार नाही; मात्र त्यांचा आदर करून चित्रपटांची निर्मिती केली तर हेच प्रेक्षक त्या निर्मितीला डोक्यावर उचलून घेण्यासही कमी करत नाहीत. 'तू बोल ना' चित्रपटाची टीम सुजाण आहे. ती आपल्या चुकीतून नक्कीच बोध घेतील आणि येणाऱ्या काळात प्रेक्षकांच्या भावनांचा आदर करून दर्जेदार चित्रपटाची निर्मिती करतील अशी अपेक्षा आहे!



**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

# एसटी बससेवा कोलमडली

## • जादा पैसे देवून खासगी वाहनाने प्रवास, उभे राहून करावा लागतो प्रवास



**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

दिवाळीनिमित्त हजारो, लाखो प्रवासी आपआपल्या मुळगावी रवाना होण्यास सुरूवात झाली असून, रत्नागिरी विभागाच्या वतीने आरक्षित व जादा गाड्यांचे नियोजन केले आहे. मात्र जिल्हांतर्गत एसटीचे वेळापत्रक कोलमडले आहे. त्यामुळे प्रवाशांना लांजा, राजापूर, रत्नागिरी आगारासह विविध आगारातून येजा करण्यासाठी दीड ते दोन तास एसटीची वाट पहावी लागत आहे. बस वेळेत येत नसल्यामुळे वडाप किंवा मिळेल त्या मिनी बस, चार चाकीला हात दाखवून घर गाठावे लागत आहे. त्यामुळे सणासुदीत जरी लांब पल्ल्यासाठी जादा गाड्या सोडल्या असल्या तरी जिल्हा अंतर्गत प्रवासाचे नियोजन करणे अपेक्षित होते. त्यामुळे प्रवाशांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे. गणेशोत्सवानंतर दिवाळीत नोकरी, व्यवसायनिमित्त रत्नगिरी जिल्ह्यात असणारे चाकरमानी आपआपल्या मूळ गावी जात असतात. रत्नागिरी विभागातून पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाड्यासाठी दररोज २१ फेऱ्याप्रमाणे २५० हून अधिक गाड्या सोडण्यात आल्या आहेत. तसेच विविध बसेसचे आरक्षण ही फुल्ल झाले आहे. त्यामुळे या सर्व बसेस विविध मार्गावर रवाना होत असून ६ नोव्हेंबरपर्यंत या जादा बसेस सोडण्यात येणार आहेत. मात्र, दिवाळी निमित्त जादा गाड्या बाहेर सोडल्यामुळे जिल्हांतर्गत एसटी बससेवा पुन्हा विस्कळीत झाली आहे. मागील दोन दिवसांपासून एसटी बसेस वेळेवर येत नाही. विशेषत: सकाळी आणि सायंकाळच्या सुमारास प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रत्नागिरी -लांजा, रत्नागिरी राजापूर, रत्नागिरी-देवरूख, रत्नागिरी-चिपळूण यासह लांजा, राजापूर, कणकवली बसेस वेळेवर येत नाहीत. आल्यातर मोठ्या प्रमाणात गर्दी वाढत आहे. नाईलाजास्तव प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागत आहे. काहीजण दुसऱ्या गाडीची वाट पाहत आहेत. मात्र, दुसरी बस येत नसल्यामुळे जादा पैसे देवून खासगी बसेसने प्रवास करीत आहेत. त्यामुळे रत्नागिरीतील प्रवासी एसटी विभागावर चांगलेच संतापले आहेत. विभाग नियंत्रक, आगार व्यवस्थापकांनी याकडे लक्ष देणे गरजेचे होते मात्र तसे झाले नाही. एसटी बसेस वेळेवर येत नाही. लांजा, राजापूर या बसेस फार उशिराने येत आहेत, तर कधी येतच नाही.

> **एसटीची तास-तास वाट पहावी लागते. त्यामुळे खासगी बसेसने जादा पैसे देऊन घर गाठावे लागत आहे. सणासुदीत जिल्हांतर्गत बससेवेकडून विभाग नियंत्रक, आगार व्यवस्थपकांनी लक्ष देणे गरजेचे आहे.**
> **-निखील भालेराव, प्रवासी.**

## वाहतूक पोलिसांकडून हेल्मेटचे वाटप

**उरण** : उरण तालुक्यातील वीर वाजेकर विद्यालय, फुंडे येथे वाहतूक नियमांचे प्रबोधन व हेल्मेट वाटपाचा कार्यक्रम आयसीआयसीआय लोंबर्ड इन्शुरन्स व सहयोग फाऊंडेशनतर्फे आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात उपस्थितांना रस्त्यावर वाहनांचे अपघात होऊ नयेत यासाठी हेल्मेट परिधान करणे, वाहन चालवतांना मोबाईलवर बोलू नये, तसेच रस्ता सुरक्षा, वाहतुकीचे नियम याबाबत न्हावाशेवा वाहतूक नियंत्रण शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक मुजावर यांनी अतिशय मौलाचे प्रबोधनपर मार्गदर्शन केले. यावेळी वनय बर्वे, प्राध्यापक साळुंखे, किरण म्हात्रे विद्यालयाचे विद्यार्थी, विद्यार्थी पालक यांच्यासह शिक्षक वर्ग उपस्थित होते.

## यशवंत शिर्के यांचे निधन



**नागोठणे** : नागोठण्याजवळील कडसुरे (ता.रोहा) येथील रहिवासी यशवंत नारायण शिर्के (वय ८८ वर्षे) यांचे मंगळवार (दि.२१) त्यांच्या राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच विवाहित मुलगे, तीन विवाहित मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. दिवंगत शिर्के यांचे दशक्रिया विधी गुरुवार दिनांक ३० ऑक्टोबर रोजी कडसुरे येथेच तर उत्तरकार्य १ नोव्हेंबर रोजी कडसुरे येथे होणार असल्याचे शिर्के कुटुंबियांकडून सांगण्यात आले.

# कोकण रेल्वेच्या 'रो-रो'ला सावंतवाडी, रत्नागिरीत थांबा




**| सावंतवाडी | प्रतिनिधी |**

मुंबई आणि कोकण दरम्यानचा लांबचा रस्तेप्रवास टाळण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या कोकण रेल्वेच्या रो-रो सेवेला अधिक प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी आता सावंतवाडी, रत्नागिरी आणि संगमेश्वर या प्रमुख स्थानकांवर थांबा देण्यात येणार आहे. यामुळे प्रवासी आपली वाहने ट्रेनमधून घेऊन कमी वेळेत कोकणात पोहोचू शकतील.गणेशोत्सव काळात कोकण रेल्वेने कार ऑन ट्रेन (रो-रो) सेवा सुरू केली होती. मात्र, कोलाड, नांदगाव रोड आणि वेर्णा असे तीनच थांबे या सेवेला असल्याने सुरुवातीला प्रवाशांचा अल्प प्रतिसाद मिळाला. विशेषतः रत्नागिरी आणि सावंतवाडीसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी थांबा नसल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत होती. दरम्यान प्रवाशांचा प्रतिसाद वाढवण्यासाठी प्रशासनाने आता या मार्गावर रो-रो सेवेसाठी तीन नवीन स्थानकांचा समावेश केला आहे. रो-रो ट्रेनमधून वाहने चढवण्यासाठी आणि उतरवण्यासाठी सावंतवाडी, रत्नागिरी आणि संगमेश्वर येथे लवकरच रॅम्प तयार केले जातील, अशी माहिती कोकण रेल्वेचे संतोष कुमार झा यांनी दिली. रो- रो सेवेची क्षमतारो-रो ट्रेनमध्ये सध्या १० वॅगन आणि दोन प्रवासी कोच आहेत. या ट्रेनमधून एकावेळी सुमारे ४० कार घेऊन जाता येतात. रो-रो सेवेला अधिक प्रभावी बनवून जास्तीत जास्त प्रवाशांना आकर्षित करण्याच्या योजना प्रशासनाने जाहीर केल्या आहेत.



# पाचारकर मित्र फाऊंडेशनतर्फे आदिवासी बाधंवाना मदत

**| बोर्ली पंचतन | प्रतिनिधी |**

बोर्ली पंचक्रोशीमध्ये सन २०१८ सालापासून आरोग्य शैक्षणिक आणि सामाजिक सेवेत कार्यरत असलेल्या डॉ.राजेश पाचारकर मित्र फाऊंडेशनच्या वतीने श्रीवर्धन तालुक्यातील कुडगाव आदिवासी वाडीत विविध वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी चादर, टॉवेल, नॅपकिन, साखर व मुलांना खाऊ अशा विविध वस्तू भेट देण्यात आल्या. यावेळी डॉ. पाचारकर यांनी येथील आदीवासी कुटुंबांजवळ संवाद साधताना सांगितले की आपणाला आरोग्य विषयी कोणत्याही समस्या असतील त्याचबरोबर लहान मुलांचे काही विकार असतील तर त्याबाबत आमच्या फाऊंडेशनच्या सदस्यांजवळ तातडीने संपर्क साधा आम्ही त्यासाठी मदत करु. डॉ. पाचारकर यांच्याकडून सांगितले.

## सुरगडावर स्वच्छता मोहिम




**| कोलाड | प्रतिनिधी |**

सुरगड संवर्धन संस्थेची ३९ वी अखंड गड संवर्धन मोहिम स्थानिक सुरगड संस्थेच्या वतीने राबविण्यात आली.

सदर मोहिमेमध्ये गडावरील सदर, पाण्याच्या टाक्याच्या बाजूची साफसफाई, काटेरी झाडे, वाढलेलं गवत, गडावर जाण्याचा मार्ग, गडावरील दारू कोठार अशी साफ सफाई करण्यात आली. गडाच्या स्वच्छतेसाठी अजय भोसले, स्वप्नील विचारे, महेश किर्दत, अजित दहिंबेकर, ललित जाधव, रोशन जाधव, साहिल जाधव, लवकेश जाधव, पंकज सावरकर, अथर्व कापसे, योगेश गुजर, शुभम पवार, यश वारकर, सार्थक दहिंबेकर, ललित पवार, मनीष धामणसे, राज बिरगावले, विशाल बिरगावले, संग्राम कुंभार पियुष चोरगे, श्रेयस सावरकर, विराज तेलंगे, विलास सुर्वे, विशाल पवार यांनी स्वच्छता तसेच त्याचे संवर्धन करण्याचे काम केले.

## शिहूत दीपोत्सव उत्साहात

**| शिहू | प्रतिनिधी |**

लक्ष्मीपूजनचे औचित्य साधून शिहू येथे मंगळवार (दि.२१) ऑक्टॉबर रोजी श्री. बहिरेश्वर जोगेश्वरी मंदिरात दीपोत्सव उत्सहात साजरा करण्यात आला. यावेळी संपूर्ण मंदिर परिसर दिव्यांच्या रोषणाईने उजळून निघाला होता. मंदिरात श्री. बहिरेश्वर जोगेश्वरी मातेची रांगोळी स्वरूपात हुबेहूब प्रतिकृती वैष्णवी मोकल, सुजल मोकल, किमया पाटील यानी साकारली होती. दीपोत्सवाचे हे सहावे वर्ष असून मंदीरातील गाभारा १००० दिव्यांनी सजवला होते.

# गणपतीपुळे किनारी पर्यटकांची गर्दी



**| गणपतीपुळे | प्रतिनिधी |**

दिवाळी पर्यटन हंगामाच्या पार्श्वभूमीवर गणपतीपुळे येथे विविध ठिकाणांहून मोठ्या संख्येने येणाऱ्या पर्यटकांनी समुद्रस्नाना बाबत मोठी खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, पर्यटकांची किनाऱ्यावरील गर्दी लक्षात घेता प्रशासन त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अलर्ट मोडवर आहे. रत्नागिरी तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या गणपतीपुळे येथे शुक्रवारी १७ ऑक्टोबर रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील तीन महिला पर्यटकांना वाचविण्यात यश आले होते. दिवाळी पर्यटन हंगामाच्या पार्श्वभूमीवर गणपतीपुळे येथे विविध ठिकाणाहून येणार्या पर्यटकांनी समुद्रस्नानाबाबत मोठी खबरदारी घेण्याचे आवाहन पोलीस यंत्रणेने केले आहे. विविध ठिकाणचे पर्यटक मोठ्या संख्येने येथे दाखल होणार आहेत. या पार्श्वभूमीवर समुद्रकिनाऱ्यावर कुठलाही धोक उद्भवू नये, या उद्देशाने पर्यटकांनी समुद्रस्नानाबाबत खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पर्यटकांनी समुद्राच्या खोल पाण्यात जाऊ नये, समुद्रातील भरती ओहोटीचा वेग, लाटा आणि प्रवाह या विषयीची माहिती स्थानिक व्यावसायिक आणि जीव रक्षकांकडून घ्यावी तसेच जीव रक्षक आणि वॉटर स्पोर्ट व्यवसायिकांच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे करावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# आदिवासी कुटुंबाला एक हात मदतीचा

## महाड पत्रकार संघाचा स्तुत्य उपक्रम



**| महाड | प्रतिनिधी |**

महाड पत्रकार संघाच्यावतीने दरवर्षी समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून महाड तालुक्यातील बिरवाडी विभागातील शिवथर घळई आदिवासीवाडी येथे गृहोपयोगी साहित्य वाटप बुधवार (दि.१५) ऑक्टोबर रोजी पत्रकार संघाचे अध्यक्ष उदय सावंत यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.

यावेळी सर्व आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी शिवथर घळईचे किशोर भोसले, समीर पवार, किशोर भोसले व सर्व आदिवासी बांधव उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी महाड पत्रकार संघाचे अध्यक्ष उदय सावंत, उपाध्यक्ष महेश शिंदे, सचिव रोहित पाटील, पत्रकार संघाचे ज्येष्ठ सदस्य श्रीकांत सहस्त्रबुद्धे, खजिनदार मिलिंद माने, सल्लागार तुकाराम साळुंखे, किशोर किरवे, उपखजिनदार सुधीर सोनार, प्रसिद्धी प्रमुख नितेश लोखंडे, कार्याध्यक्ष निलेश लोखंडे इत्यादी हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी मेहनत घेतली.

## युवकांनी बुजविले रस्त्यावरील खड्डे



**| सुतारवाडी | प्रतिनिधी |**

सुतारवाडी दत्त मंदिर ते येरळ धगडवाडी येथील रहदारीच्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे. लघुपाट बंधारा चौकीपासून सुतारवाडी धरणापर्यंत मोठे खड्डे पडलेले आहेत. या खड्ड्यातून प्रवास करणे अत्यंत जिगरीचे झाले होते. शालेय विद्यार्थी, धाटाव कंपनीमध्ये जाणारे तसेच येरळ धगडवाडी तसेच अन्य विभागातील नागरिकांना खडतर प्रवास करावा लागत होता. धगडवाडी येथील जय हनुमान मंडळाच्या तरुणांनी पुढाकार घेऊन खड्डे बुजण्यास सुरुवात केली. सार्वजनिक बांधकाम खात्याने याकडे अनेक महिन्यांपासून दुर्लक्ष केले होते युवकांनी बुजवलेल्या खड्ड्यांमुळे अनेकांनी त्यांना धन्यवाद दिले आहेत.

**दिवसेंदिवस मानवी आरोग्याचा प्रश्न निर्माण** | **बदलत्या काळानुसार शहरी भागातून हद्दपार**

# इको फ्रेंडली फटांगरी कालबाह्य



**| ठाणे | प्रतिनिधी |**

दिवाळीत प्रदूषणाचा आलेख हा झपाट्याने वाढत असतो. मात्र वर्षानुवर्षे बांबूच्या साहाय्याने तयार केली जाणारी फटांगरी आज दिसेनाशी झाली आहे. प्रदूषणावर मात कारण्यासाठी व कोणालाही त्रास होणार नाही अशा कमी आवाजाच्या फटांगरीला एरव्ही बाजारात मोठी मागणी असायची. मात्र आता मोठमोठ्या आवाजाच्या फटाक्यांनी बाजारपेठेत प्रवेश करून नागरिकांच्या मनावर अधिराज्य निर्माण केले आहे. त्यामुळे आता बांबूपासून तयार होणारी फटांगरी कालबाह्य होत असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसून येत आहे. शालेय परीक्षा आल्या की ग्रामीण भागात दिवाळीच्या सुट्टीत विद्यार्थ्यांना किल्ले आणि फटांगरी बनविण्याचे वेध लागत असत. मात्र आता मातीच्या किल्ल्यांची जागा प्लास्टर ऑफ पॅरिसने घेतली आहे. तर बांबूच्या सहाय्याने तयार होणारी फटांगरीची जागा ज्वलंत आणि मानवी आरोग्यास तसेच वन्य जीवांसाठी हानिकारक असलेल्या फटाक्यांनी घेतली आहे. त्यामुळे आता दिवसेंदिवस मानवी आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. एका बांबूपासून सुमारे दहा ते पंधरा फटांगऱ्या तयार केल्या जात असतात. बांबूची लाकडी फटांगरी बनविली जाते. त्यानंतर शेताच्या बांधांवर आणि माळरानावर येणाऱ्या गोल आकाराच्या गोळ्या त्यांना चोपड असे म्हणतात.

त्या गोळ्या फटांगरीमध्ये टाकल्यानंतर फटाक्यासारखा आवाज येत असतो. मात्र, आता बदलत्या काळानुसार हे प्रदूषण मुक्तीचे संदेश देणारे फटाके कालबाह्य होत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे शहरी भागात या फटांगऱ्यांना मोठी मागणी आहे. कल्याण, अंबरनाथ, उल्हासनगरच्या कॅम्प पाच परिसरात ग्रामीण भागातून फटांगरी आणि तिच्या गोळ्या विक्रीसाठी येत असत. मात्र, आता बदलत्या काळानुसार फटांगरी शहरी भागातून हद्दपार झालीच आहे. मात्र आता ग्रामीण भागातून देखील हद्दपार होत असल्याचे दिसून येत आहे. दिवाळी साजरी करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण महामंडळासह सरकार सातत्याने प्रयत्न करत असत. शासनाने प्रोत्साहन दिले असते, तर बाजारातून प्रदूषणमुक्त फटांगरी लुप्त झालेली पुन्हा एकदा आणण्याची संधी होती.

### प्रदूषण मुक्तीचा संदेश

प्रदूषणमुक्तीचे संदेश दिवाळीच्या सुट्टीत फटांगरी बनवण्याचे वेड हे तरुणांना लागत असे. मात्र फटांगरीपेक्षा अधिक आवाज करणाऱ्या फटाक्यांनी बाजारात प्रवेश केल्याने आता फटांगरी मात्र कालबाह्य होत चालली आहे. त्यामुळे आता बदलत्या जीवनशैलीत शासन प्रदूषण मुक्तीचे संदेश देत आहे. मात्र, हेच संदेश शेतकऱ्यांनी प्रदूषण करणाऱ्या फटाक्यांच्या जन्माआधी दिले असल्याचे जुने जाणकार सांगत आहेत.

# निवडक

## खानेकर यांना 'आदर्श शिक्षिक' पुरस्कार




**पाली** : रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग, अलिबाग मार्फत दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार अलिबाग येथे १३ ऑक्टोबर रोजी पार पडले. या सोहळ्यात सुधागड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भार्जे येथील प्राथमिक शिक्षक सतिश किसन खानेकर यांना आदर्श शिक्षिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी सत्यजित बडे, प्राथमिक शिक्षण अधिकारी जिल्हा परिषद ललिता दहीतुले यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या करिता त्यांनी शाळा स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. सन २०२४/२५ मध्ये रायगड जिल्हा परिषदेने आयोजित केलेल्या व्यक्तिमत्व व क्रीडास्पर्धेत त्यांनी गीतगायन स्पर्धेत दोन्ही गटात जिल्हा स्तरावर शाळेला यश प्राप्त करून देण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. लोकसहभागातून शाळेला आवश्यक सर्व सुविधा त्यांनी प्राप्त करून दिल्या आहेत.

## संघर्ष नगर येथे फराळ वाटप



**उरण** : श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था उरणतर्फे दिवाळीनिमित्त संघर्ष नगरमधील बांधवांना फराळ वाटप करण्यात आले. याप्रसंगी सुधीर मुंबईकर, गणेश अधिकारी, बाबू दुर्गन्ना, हणमंत पोतेनवरू, संजय गायकवाड, निकिता पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना विठ्ठल ममताबादे यांनी केली. यावेळी सुधीर मुंबईकर, सुदेश पाटील, विठ्ठल ममताबादे, प्रेम म्हात्रे, हेमंत पवार, माधव म्हात्रे, समीर पाटील, सुविध म्हात्रे, ओमकार म्हात्रे, प्रकाश म्हात्रे, साहिल म्हात्रे, प्रीती पाटील, वैशाली भगत, नितेश पवार, आकाश पवार, सुमित कोळी, हेमंत ठाकूर, जुगल कोळी, सुरज पवार, कुमार ठाकूर, अर्णव पाटील, रुद्र ममताबादे तसेच पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.



## गणपत वारगडा यांना पुरस्कार

**पनवेर्ल** : पनवेल तालुक्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चलवळीत सक्रिय असणारे पत्रकार, संगीत, गायन आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यासाठी ब्ल्यू पँथर्स या संघटनेने विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या विशेष कार्यक्रमात आदिवासी समाजाला न्याय देणारे आणि सत्यताने चलवळीत सक्रिय असणारे आदिवासी समन्वय समिती रायगड संघटनेचे अध्यक्ष, गणपत वारगडा यांनी सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय काम करत असल्याने ब्ल्यू पँथर्सचा मौल्यवान रत्न पुरस्कार सुनील सोनावळे यांच्या हस्ते देण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष नरेंद्र गायकवाड होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, प्रकाश बिनेदार, विजय गायकवाड, सुनील सोनावणे, संजय कदम, महेश साळुंखे, कमलाकर कांबळे, नितीन कांबळे, नवनीत गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज सदावर्ते यांनी केले, तर कृष्णा गायकवाड यांनी आभार मानले.



## फातिमा मातेची तीर्थयात्रा उत्साहात

**कर्जत** : कर्जतमधील ख्रिश्चन धर्मियांचे प्रार्थना मंदिर (चर्च) गेल्या काही दशकांपासून फातिमा माऊलीच्या नावाने प्रसिद्ध आहे. प्रत्येक वर्षी १३ ऑक्टोबर किंवा त्या नंतर येणाऱ्या रविवारी या मातेची तीर्थयात्रा असते. यंदा फातिमा मातेची ९० वी तीर्थयात्रा उत्साहात संपन्न झाली. देश-विदेशांतून आलेल्या भाविकांनी मातेचे दर्शन घेतले. तसेच अन्य धर्मियांनी देखील उपस्थिती दर्शवून दर्शन घेतले. कर्जत रेल्वे स्थानका नजीक असलेल्या चर्चच्या परिसरात अक्षरशः जत्रेचे स्वरूप आले होते. फातिमा मातेची मिरवणूक काढण्यात आली. फादर ज्यो डिमेलो यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात चर्चची महती सांगितली.

## संकल्प मित्र मंडळातर्फे विविध कार्यक्रम

**सुकेळी** : संकल्प मित्र मंडळ वांगणी यांच्या वतीने बुधवार (दि.२२) ऑक्टोबर रोजी एक दिवा शहीदांसाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी रांगोळी व गडकिल्ले स्पर्धेचे आयोजन देखिल करण्यात आले होते. रांगोळी स्पर्धेमध्ये शिद्धिका तेलंगे प्रथम क्रमांक, शरयू ठाकूर द्वितीय क्रमांक तर जान्हवी भोईर हीला उत्तेजनार्थ क्रमांक देण्यात आले. तसेच गडकिल्ले स्पर्धेत प्रथम क्रमांक आराध्य निलेश शिर्के, द्वितीय क्रमांक, ऋग्वेद ठाकूर उत्तेजनार्थ अनय देविदास तेलंगे ग्रुप यांना देण्यात आला. या कार्यक्रमास एकनाथ ठाकुर, मोरेश्वर तेलंगे, अंकूश तेलंगे, प्रविण कदम, सखाराम ठाकूर, देविदास तेलंगे, पांडूरंग तेलंगे, मनीष तेलंगे, राकेश भिसे, सौरभ तेलंगे, शुभम तेलंगे, साहिल तेलंगे, रोशन चव्हाण, गोपाळ ठाकूर, प्रविण तेलंगे, सदानंद चव्हाण, जय गोळे, तेजेश तेलंगे, राहुल चव्हाण , हरिश्चंद्र तेलंगे, दिपेश तेलंगे, आदिती ठाकूर, आरती तेलंगे, राजेश्री तेलंगे, रजीता तेलंगे, नेत्रा चव्हाण, शर्मिला चव्हाण, निर्मला तेलंगे, जीनल गोळे, तेजस्वी दळवी तसेच गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# कोलाडमध्ये तुफान पाऊस

## शेतातील भात पिके आडवी; शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी

| कोलाड | प्रतिनिधी |

दिवाळीच्या सणात लक्ष्मीपूजनाची तयारी सुरु असतांना कोलाड-खांब परिसरात संध्याकाळी ४ वाजता अचानक आलेल्या विज वाऱ्यासह तुफान पावसामुळे नागरिकांची तारांबल उडाली. वीज वाऱ्यासह तुफान पावसामुळे घरावरील पत्रे उडाले. तसेच प्रत्येक घरासमोर लावण्यात आलेली लाइटिंग, आकाश कंदील, या वादळ वाऱ्यामुळे खाली कोसळून पडले याच बरोबर उरलेली संपूर्ण भात पीके ही आडवी झाली असुन ऐन दिवाळीच्या आनंदात शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आले आहे. या अगोदर रब्बी हंगामातील



भात लागवडीचे पुगांव, मुठवली, शिरवली, खांब, तसेच इतर काही भागात मे महिन्यात पडलेल्या पावसाने भातशेतीत पाणी साचून मोठे नुकसान झाले.काही भात पिक उभे असणारे कुजून गेले, तर काही शेतकऱ्यांनी कापणी केलेली पीके जमिनीवर लोळत वाहून त्या धानाची नासाडी झाली त्याचे तत्काल पंचनामे देखील वरीष्ठ पातळीवरून करण्यात आले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पंचनामे केल्याचा प्रशासनानी दिलासा दिला मात्र त्याची नुकसानभरपाई अद्याप मिळालेली नाही.

याउलट ऐन दिवाळीत दोन दिवस असाच पाऊस बारसणार असल्याचे संकेत हवामान खात्याकडून देण्यात आल्या नंतर तो तंतोतंत खरा ठरला असुन या पावसामुळे हातातोंडांशी आलेल्या घास हिरावून जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

कोलाड परिसरात ऐन दिवाळीत लक्ष्मीपूजनाला वीज वाऱ्यांसह तुफान पाऊस झाल्यामुळे गोवे गावातील चंद्रकांत पवार यांच्या घरावरील पत्रे उडून मोठे नुकसान झाले आहे. तसेच अनेक झाडे व पोल उलमळून पडले. यामुळे विजपुरवठा खंडित झाला आहे. तर या परिसरातील उरली सुरलेली भात पिके ही या विज वारा पावसात जमीनदोस्त झाली आहेत. यामुळे बळीराजाच्या हातातोंडासी आलेला घास हिरावून जाण्याची शक्यता निर्माण झाली असून अशी परिस्थिती पाहून बळीराजाच्या डोळ्यात पाणी आले आहे.

रासायनिक खते, नांगरणी, व भात लागवडीचा खर्च वाढला असुन ही याला न जुमनता शेतकरी वर्ग भात शेती करत असतो.परंतु निसर्गाच्या कोपामुळे सोन्यासारखी भात पिके मातीमोल झाली आहेत. यामुळे शासनाने भातशेतीचे सरसकट पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

### बळीराजा पुरता हैराण

**गेले काही परतीचा पाऊस धुमाकूळ घालत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. दिवस प्रखर उष्णता आणि सायंकाळी पावसाचे आगमन यामुळे बळीराजा पुरता हैराण झाला आहे. भात शेतीच्या लोंब्यांचा दाणा तयार झाला असून काही ठिकाणी भात कापणी सुरु केली आहे. दिवाळी सण आधी बहुतांशी ठिकाणी भात कापणी सुरुवात झाली आहे. मात्र आता परतीच्या पावसाने बळीराजांस मोठ्या संकटात सापडलेले आहे. भात कापणी करावी की नाही हेच विचार त्यांस स्वस्त बसू देत नाही.**

## श्रीवर्धनमध्ये ‘दीपसंध्या’ कार्यक्रम

**श्रीवर्धन :** कोकण मराठी साहित्य परिषदेच्या श्रीवर्धन शाखेच्या वतीने (दि.२२) ऑक्टोबर रोजी पाडव्याच्या सायंकाळी श्रीवर्धन येथील श्री दत्त मंदिर सभागृहात गझल, पोवाडे, कविता, आगरी गीताची सुंदर भावस्पर्शी मैफील काव्यरंग सादर करण्यात आली. मैफिलीमध्ये शाहीर व कवी-गझलकार गंगाधर साळवी, आगरी कवयित्री संध्या दिवकर, प्रणय इंगळे, सिद्धेश लखमदे आदिंनी श्रोत्यांची मने जिंकली. शाखेच्या अध्यक्षा सीमा रिसबूड यांनी मनोगत व्यक्त केले. कोकण मराठी साहित्य परिषदेचे नूतन जिल्हा अध्यक्ष संजय गुंजाळ यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत बारटक्के यांनी केले.

## धाटावमध्ये भातशेतीची नासाडी

| धाटाव | प्रतिनिधी |

पावसाने शेतीचे काळचक्र यावर्षी बदलून टाकले आहे. ऑक्टोबर अखेर आला तरी पाऊस माघारी जात नाही, याच भयान वास्तवात मंगळवारी सायंकाळी वादळासह आलेल्या मुसळधार पावसाने रोहा तालुक्यातील शेकडो हेक्टरवरील भातशेतीची पूर्तत: नासाडी केली. हाता तोंडाशी आलेला घास हिरावला. ठिकठिकाणी भातशेती पावसाच्या पाण्याने तुडुंब भरून गेली. कापणीला आलेल्या भाताने माना टाकल्या, आता भात कुजणार, मोड येणार याच भीतीने बळीराजा चांगलाच धास्तावला आहे.



दरम्यान, वादळी पावसाने सर्वच ठिकाणच्या भात शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. भात कापणीला वेग येणार तोच मंगळवारच्या धुवांधार पावसाने होत्याचे नव्हते केले.यंदा भात पीक चांगलेच आले, भरघोस सोनं घरात येईल, धनधान्याचे कोठार भरेल याच आशेवर असलेला बळीराजाला अखेरीस मोठा फटका बसला. वादळी पावसाने शेतीतील उभा पीक अक्षरश: झोडपून काढला. भातच आडवा होऊन पाण्यात मिसळला. ओव्हळ, नाले पुर्नजिवित झाल्याचे तीनचार दिवस भाताला हलविणे शक्य नाही. त्यामुळे भात कुजण्याची भीती व्यक्त झाली. जिकडेतिकडे भात पिके आडवी पडल्याचे भयानक दृश्य पाहायला मिळत आहे अशा संकटात सापडलेल्या बळीराजाला प्रशासनाने सरसकट नुकसान भरपाई जाहीर करावी अशी मागणी बळीराजा फाउंडेशनने बुधवारी लावून धरली.शेतकऱ्यांना तातडीने मदत जाहीर करणार नसाल तर आंदोलन उभे करू असा इशारा अध्यक्ष विठ्ठल मोरे यांनी दिला.

# विद्यार्थ्यांनी साकारला किल्ला

| अलिबाग | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषद शाळा साखर येथे दिवाळीनिमित्त मुख्याध्यापक राजेंद्र पाटील व उपशिक्षिका स्मिता चिखले यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी, शिक्षक तसेच पालक या उपक्रमात सहभागी झाले होते. गडकिल्ल्यांचे महत्त्व पटवून देण्यासाठी मातीपासून विद्यार्थ्यांनी किल्ला बनवला. किल्ला बनवताना विद्यार्थ्यांनी मनमुराद




आनंद लुटला. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना कार्यानुभव या विषयाचे महत्त्व समजण्यास मदत झाली. तसेच कागद काम, रंगकाम या विषयाची गोडी निर्माण झाली. आकाश कंदिल बनवण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष रेश्मा भुकवार यांनी विद्यार्थ्यांना उत्तम असे मार्गदर्शन केले.

## बांठिया हायस्कूलला आयएसओ मानांकन

**पनवेल :** नवीन पनवेल येथील के. आ. बांठिया हायस्कूलला आयएसओ मानांकन नुकतेच मिळाले आहे. भौतिक सुविधांबरोबरच इतर अनेक सुधारणा या ठिकाणी करण्यात आलेल्या आहेत. त्याचबरोबर गुणवत्ता वाढीसही जालना देण्यात आलेली आहे. प्राचार्य बी. एस .माळी यांच्या परिश्रमातून जिल्ह्यातील हे मानांकन मिळवलेली पहिली अनुदानित शाळा आहे.

# कोर्लई किल्ल्याचा प्रथम क्रमांक

| रेवदंडा | प्रतिनिधी |

डोंबिवली, टिळकनगर विद्यामंदिरातील तब्बल ३५० विद्यार्थ्यांनी मेहनतीने महाराष्ट्रातील ३२ किल्ल्यांच्या प्रतिकृती उभारून दुर्गोत्सव साजरा केला, त्यात रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील कोर्लई किल्ल्याने प्रथम क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांनी दगड, माती आणि चिखलाचा वापर करून हे आकर्षक किल्ले उभारले आहेत. टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळ, शिक्षक आणि ट्रेक क्षितिज संस्थेच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच



छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुर्गबांधणीच्या परंपरेचा अनुभव घेतला. या उपक्रमात पाचवी ते सातवी गटात कोर्लई किल्ला प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. द्वितीय क्रमांक मंचना कांचना व तृतीय क्रमांक पांडवगड ७ वी यांनी मिळवला. आठवी ते दहावी गटात सुरगड प्रथम, भरतगड द्वितीय, तर आठवी भूषणगड तृतीय क्रमांकावर राहिला. महाविद्यालयीन गटात टिळकनगर कॉलेज ऑफ कॉमर्सच्या धर्मापुरी गडाने प्रथम क्रमांक पटकावला, तर सुमारगड द्वितीय ठरला. या उपक्रमासाठी शाळेने विद्यार्थ्यांना लागणारी माती, दगड, मेनकापड यासह सर्व साहित्य पुरवले. किल्ल्यांची रचना अधिक वास्तव वाटावी यासाठी ट्रेक क्षितिजच्या अमोल पोवळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मार्गदर्शन केले, तर परीक्षणाचे काम प्रिया कराडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. टिळकनगर शाळेच्या आवारातील हे प्रदर्शन भाऊबिजेपर्यंत नागरिकांसाठी खुले असणार आहे.



● महाजने गावातील अर्जुन पारंगे याने बनविलेला किल्ला.



● पाली सुधागड येथे रोहन सुरावकर यांनी किल्ले प्रतापगडची सूंदर प्रतिकृती बनविली आहे.



● दिघोडे येथील पुष्कर ठाकूर यांनी बनविलेला मातीचा किल्ला. (छायाचित्रण : सुनिल ठाकूर)



● रोषणाईने उजळून निघाली महाडची बाजारपेठ. (छायाचित्रण: जुनेद तांबोळी)




● अलिबाग तालुक्यातील मेढेखार येथील अथर्व प्रकाश कोठेकर याने बनविलेला शिवनेरी किल्ला. (छायाचित्रण : सचिन पाटील)

## निवडक



### खानाव शाळेत दिपोत्सव साजरा

**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील रा.जि.प. शाळा खानाव येथे दिवाळीनिमित्त मुख्याध्यापक रवींद्र थळे, नीलम बुरांडे, संजीवनी थळे, संतोष पालकर, मनीषा बलकवडे, सचिन कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात विद्यार्थी, शिक्षक तसेच पालक सहभागी झाले होते. यावेळी गड किल्लयांचे महत्त्व पटवून देण्यासाठी विद्यार्थ्यांनी मातीपासून किल्ले बनवले. तसेच, आकाश कंदिल बनवणे, पणत्या रंगवणे, विविध प्रकारची शुभेच्छा पत्र तयार करणे, रांगोळी स्पर्धा, फॅन्सी ड्रेस स्पर्धा यासारख्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी १०५ विद्यार्थी व शिक्षक व पालकांनी दिवे लावून दीपोत्सव साजरा केला.



### सोगाव-चोरोंडे येथे शिधा वाटप

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील मुनवली येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांनी सोगाव व चोरोंडे येथील आदिवासी बांधवांसह मुनवली ग्रामस्थांची मोफत दिवाळीचा शिधा वाटप करून त्यांची दिवाळी गोड केली आहे. घाडी हे गेली अनेक वर्षे सामाजिक बांधिलकी म्हणून आपल्या भागातील गरीब व गरजु बांधवांना दरवर्षी दिवाळीचा सण उत्साहात साजरा करण्यासाठी दिवाळीचा शिधा न चुकता वाटप करत आहेत. यावेळी सचिन घाडी यांनी सोगाव व चोरोंडे येथील आदिवासी वाडीवरील बांधवांना याहीवर्षी दिवाळी पुर्वी प्रत्येक घरोघरी जाऊन रवा, मैदा, साखर व इतर तत्सम वस्तूंचे मोठ्या प्रमाणात वाटप केले. याबाबत आदिवासी बांधवांनी व मुनवली ग्रामस्थांनी आमची दिवाळी गोड केल्याबद्दल सचिन घाडी यांचे मनपूर्वक आभार मानले आहेत.



### आदिवासी बांधवांची दिवाळी गोड

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील किहीम सरपंच प्रसाद ऊर्फ पिंट्या गायकवाड यांच्यातर्फे बामणसुरे व किहीम येथील सर्व आदिवासी बांधवांना व इतर सर्व ग्रामस्थांना दिवाळीच्या निमित्ताने मिठाईचे वाटप करत आदिवासींची दिवाळी गोड केली. गायकवाड हे नेहमीच आपली सामाजिक बांधिलकी जपत असतात, दरवर्षी ते आदिवासी बांधवांना दिवाळीत न चुकता मोठ्या प्रमाणात मिठाई व फराळ वाटप करत असतात. याहीवर्षी त्यांनी बामणसुरे व किहीम आदिवासीवाडी येथील आदिवासी कुटुंबांना मिठाई वाटप करत आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. यावेळी किहीम ग्रामपंचायत हद्दीतील किहीम, कामथ, बामणसुरे, चोंढी, विश्वनगर, साईनगर व इतर सर्व ठिकाणी आदिवासी बांधवांना व इतर सर्व समाजातील ग्रामस्थांना त्यांच्या घरोघरी जाऊन मिठाईचे वाटप केले व दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी आदिवासी बांधवांनी व ग्रामस्थांनी सरपंच पिंट्या गायकवाड व पिंट्या गायकवाड मित्रमंडळाचे आभार मानले.

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- मुलं, मुली पाहिजेत कामासाठी १० वी १२ वी पास औषधांच्या एजन्सीमध्ये part time सुद्धा चालेल. वेळ : १०.०० am to ७.०० pm
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ संपर्क :९२७०५६०४५६
- अलिबाग, रोहा रोड येथे मालाड्रेगावी १०-२० गुंठ्याचे संपूर्णत: डेव्हलप केलेले प्लॉट विकणे आहेत. ९८२२२५७९२९/ ८४०८९३०८१५
- अलिबाग, किहीम येथे, रिसॉर्टमध्ये ५०% भागीदार पाहिजे. (रु. २ कोटी ७५ लाख इन्व्हेस्टमेंट) जमीन १७ गुंठे. चार कॉटेज बांधलेली, जागा समुद्रापासून ३०० मीटर आणि गावठाणा जवळ आहे, बस - रिक्षा स्टॅन्ड जवळ आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- अलिबाग, चौल येथे ७२ गुंठे जागा (१६ गुंठे बागायत + ५६ गुंठे शेत जमीन एकत्रित) रिसॉर्टसाठी संपादित केलेली आहे. या जागेमध्ये ५०% भागीदार पाहिजे. जागा मेन रोड आणि मुखरी गणपती मंदिराजवळ आहे. जागेची किंमत रुपये ६.५ कोटी आणि पुढील डेव्हलपमेंट एकत्रित करायची आहे. ९८२२२५७९२९/८४०८९३०८१५
- दुकानाचा गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग-रेवस रोडवर हॉटेल रविकिरण शेजारी, अलिबाग बाझार शेजारील गाळा, एरिआ-६६० चौ.फूट, अधिक माहितीसाठी इच्छुक ग्राहकांनी मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा- ९८५०९५६७८२/७०५८५८१८०१
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी मुलींची आवश्यकता आहे. ज्यूस मेकिंग, रेस्टॉरंट सर्व्हिस, रिसेप्शनिस्ट, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप मेसेज करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

**क्रांतीवीर भगत मास्तर प्रतिष्ठानचा उपक्रम | परिसरात हुतात्म्यांच्या घोषणाचा जयजयकार**

# सिद्धगडावर दिवाळीनिमित दीपोत्सव

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील क्रांतिकारक यांना १९४३ मध्ये ब्रिटिश पोलिसांच्या गोळीबाराचे शिकार ठरल्याने अजरामर झालेल्या मुरबाड तालुक्यातील सिद्धगड येथे दोघांना हौतात्म्य प्राप्त झाले होते. या ऐतिहासिक ठिकाणी क्रांतिकारक भगत मास्तर प्रतिष्ठान कडून दिवाळी सणाच्या निमित्ताने दीपोत्सव साजरा केला जातो. यावर्षी देखील प्रतिष्ठान कडून दीपोत्सव साजरा करण्यासाठी असंख्य देशप्रेमी तरुण सहभागी झाले होते.

मुरबाड तालुक्यातील सिद्धगड येथे दोन जानेवारी १९४३ रोजी भाई कोतवाल यांच्या सहकाऱ्यांचा मुक्काम असताना ब्रिटिश पोलिसांनी अंदाधुंद गोळीबार केला होता. त्यावेळी माणिवली येथील हिराजी पाटील हे सर्वप्रथम धारातीर्थी पडले होते तर त्यानंतर माथेरान चे भाई कोतवाल यांना गोळी लागली आणि त्यांना ब्रिटिश पोलिसांनी घोड्याच्या पायाला बांधून फरफटत नेले होते, त्यात भाई कोतवाल शहीद झाले होते. या ऐतिहासिक ठिकाणी कोतवाल यांच्या सोबत सिद्धगड येथे असणारे राघो नागो भगत यांच्या नावाने प्रतिष्ठान चालवणारे भरत भगत हे दरवर्षी दिवाळी सणाच्या दिवाळी दीपोत्सव साजरा करतात. क्रांतिकारक भगत मास्तर प्रतिष्ठान कडून यावर्षी देखील सिद्धगड येथे हुतात्म्यांच्या बलिदान भूमीत दीपोत्सव साजरा केला गेला.त्यावेळी भरत भगत यांच्यासोबत कर्जत तालुक्यातील मार्केवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते बाबू घारे तसेच कळंब, माणिवली, अवसरे, खांडस, नेरळ, बीरडोले आदी गावातील देशप्रेमी तरुण उपस्थित होते. सुरुवातीला सर्व तरुणांनी सिद्धगड परिसर गाड्यांच्या प्रकाशात स्वच्छ करून घेतला आणि दीपोत्सव साजरा करण्यासाठी रांगोळी घालण्याचे कार्य सुरू केले. त्यानंतर आपल्या सोबत आणलेले शकडो दिवे यांची देखील रांगोळी काढून नंतर एक एक दिवा प्रज्वलित करण्यात आला. यावेळी देशप्रेमी तरुणांनी मोठ्या प्रमाणात हुतात्म्यांचा जयजयकार करणाऱ्या घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला. मुरबाड तालुक्यातील घाटेघर, डोंगर न्हावा, आणि म्हसा या गावातील तरुण यावर्षी देखील दीपोत्सव कार्यक्रमात सहभागी झाले होते.

आयोजक भरत भगत यांनी सिद्धगडावर दीपोत्सव साजरा करून स्वातंत्र्यवीरांना श्रद्धांजली वाहिली आणि नंतर बोलताना अनेक वर्षाची परंपरा असून दिव्यांनी सिद्धगड उजळले आहे. सिद्धगडाच्या भूमीवर शहिदांच्या वर क्रांतीकारांवर प्रेम करणारे या सर्व परिसरातील तरुण या ठिकाणी आले आहेत. १९४३ ला भाई कोतवाल यांच्या वरती फायरिंग होऊन ते शहीद झाले. त्या ठिकाणी दीप उत्सव होत आहे. या ठिकाणी निश्चित पद्धतीने उपस्थित तरुण व सर्व देशभक्त नागरिकांचे मनापासून



स्वागत आहे. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये जे जे कंगोरे तपासले तर हा एक स्वतंत्र लढा वेगळ्या पद्धतीचा आहे. पुसेगाव येथील काही तरुण माझ्या वडिलांच्या समाधीचे येथे येत असतात.

# हायकलची नवीन लॅब कार्यान्वित



| महाड | प्रतिनिधी |

समीर हिरमठ यांच्या नेतृत्वाखाली हायकलने पुण्यात नवीन 'हाय पोटेन्सी एपीआय (एचपीएपीआय) लॅब सुरू केली आहे. ही अत्याधुनिक सुविधा कंपनीच्या संशोधन व उत्पादन क्षमतांना नवा आयाम देणार आहे. या लॅबचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले असून ही सुविधा हायकलच्या वाढत असलेल्या मूल्य साखळीतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्यामुळे कंपनीच्या उच्च सामर्थ्याच्या आणि विशेष रसायनशास्त्राच्या उत्पादनांना चालना मळिणार आहे.

ही लॅब सध्याच्या उत्तम उत्पादन नियमावलीनुसार प्रमाणित (सीजीएमपी) असून, व्यावसायिक संपर्क श्रेणी ५ च्या मानकांनुसार तयार करण्यात आली आहे. त्यामुळे कोशिका नष्ट करणारा (सायटोटॉक्सिक) आणि विशेषणीय अणु (स्पेशल्टी मॉलिक्यूल्स) सुरक्षितरीत्या हाताळणे शक्य होणार आहे. ही लॅब वेगवेगळ्या प्रक्रियांसाठी डिझाइन केली असून, हायकलच्या आधीच्या लॅबसोबत एकत्र काम करण्यासाठी सक्षम आहे. याचा मुख्य उद्देश सूक्ष्म प्रमाणातून शंभर किलोपेक्षा जास्त प्रमाणात बॅच तयार करणे आहे. 'एचपीएपीआय' लॅब ही 'आशा' आणि 'अनिश्चितता' अशा दोन्ही वातावरणात सुरू होत आहे. या सुविधेमुळे हायकलची 'उच्च प्रतिबंधक रसायनशास्त्रा'तील क्षमता वाढेल आणि संशोधनात अधिक गुंतवणूक होईल. मात्र, त्याचा परतावा ग्राहकांच्या मागणीवर आणि जागतिक स्पर्धेच्या दबावाखाली मार्जिन सांभाळण्यावर अवलंबून राहणार आहे.

# रायगडच्या समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांचा जल्लोष

| रेवदंडा | प्रतिनिधी |

सध्या दिवाळीच्या सुट्टीचा आनंद घेण्यासाठी रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची तुफान गर्दी उसळली आहे. जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यासह मुरूड तालुक्यातील समुद्रकिनारे पर्यटकांमुळे बहरले आहेत. येथील अलिबाग समुद्रकिनाऱ्यासह नागाव व काशिद समुद्रकिनारे हाऊसफुल्ल झाले आहेत. दिवाळीतील सलग चार दिवस सुट्टीचा फायदा घेत मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे, कोल्हापूर, सातारा आदी भागांमधून हजारो पर्यटक याठिकाणी दाखल झाले आहेत. नुकताच पावसाळा संपल्याने परिसरात हिरवळ दाटून आली आहे. नारळ-पोफळीच्या झाडांनी नटलेला किनारा आणि नळिशार समुद्र पाहून पर्यटक मंत्रमुग्ध झाले आहेत. रेवदंडा, नागाव, काशिद आणि अलिबाग या समुद्रकिनाऱ्यांवर वॉटर गेम्स, बोट राईड्स, जेट स्की, पॅरासेलिंगसारख्या खेळांमध्ये तरुणाई मनसोक्त रमली आहे. गोव्याच्या धर्तीवर सुरू असलेले हे बीच ॲक्टिव्हिटीज पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरत आहेत. समुद्रकिनारी मळिणाऱ्या ताज्या मच्छीच्या स्वादिष्ट पदार्थांमुळे खवय्यांची हॉटेल व कॉटेजमध्ये मोठी गर्दी झाली आहे.

# उरणमध्ये मोफत वैद्यकीय शिबीर

| उरण | प्रतिनिधी |

भारतीय नौदलाच्या 'नेव्ही वीक सेलिब्रेशन २०२५'चा एक भाग म्हणून, आयएनएचएस संधानी आणि नेव्हल स्टेशन कारंजा हे उरण आणि आसपासच्या गावातील रहिवाशांना मोफत आरोग्य सेवा आणि सल्ला देण्यासाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करत आहेत. हे शिबीर सोमवारी (दि.२७) सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत उरण एज्युकेशन सोसायटी इंग्लिश स्कूलच्या पालक मैदानात पार पडणार आहे. या शिबिरात वैद्यकीय तज्ज्ञ, दंतवैद्य, शल्यचिकित्सक, स्त्रीरोग तज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, इएनटी विशेषज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ आणि त्वचारोग जज्ज्ञ उपस्थित राहणार असून त्यांच्याकडून विविध वयोगटातील आरोग्यविषयक सल्ला देण्यात येणार आहे. तसेच, तज्ज्ञांच्या सल्ल्याव्यतिरिक्त, औषधे आणि रक्त तपासणी यासह आवश्यक मोफत सेवा प्रदान केल्या जाणार आहेत.

## जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. संजय गणपत पाटील व सौ. मनीषा संजय पाटील यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक अमित अरूण घरत आणि मोनिका अमित घरत यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

**जिल्हा रायगड, तालुका अलिबाग येथील मौजे आंबेपूर येथील सर्व्हे नं. १४२/७३ ही अमित अरूण घरत आणि मोनिका अमित घरत यांचे मालकीची मिळकत**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|
| आंबेपूर ता.अलिबाग जि.रायगड | १४२/७३ | ०-०३-०० हे. आर. (३०० चौ.मी.) | ३०.०० |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : २३/१०/२०२५

सही
**ॲड. कादंबरी काळे**
**जिल्हा न्यायालय रायगड अलिबाग**
मो.नं. ८००७८५५३५५

# लक्ष्मण ठाकूर यांना मातृशोक!



| उरण | प्रतिनिधी |

तारा गावचे छायाचित्रकार लक्ष्मण ठाकूर यांच्या मातोश्री यमुना ठाकूर (७७) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. यावेळी तारा परिसरातील शेकडो ग्रामस्थ अंत्ययात्रेत सहभागी झाले होते. दरम्यान, महेंद्र घरत यांनी गुरुवारी लक्ष्मण ठाकूर यांच्या तारा येथील घरी घरी जाऊन ठाकूर परिवाराचे सांत्वन केले. यमुना ठाकूर यांचे उत्तरकार्य शनिवारी (दि.२५) तारा येथे राहत्या घरी होणार आहे. त्यावेळी हिराजी महाराज शिवकर यांचे कीर्तन होणार आहे, असे ठाकूर कुटुंबीयांकडून सांगण्यात आले आहे.

# 'गोमातेला वाचवा, गोमाता वाचली तरच आपण वाचू'



| कर्जत | प्रतिनिधी|

महाराष्ट्र राज्यात गाईला गोमातेचा दर्जा दिला आहे. परंतु, अन्य राज्यांमध्ये तेथील राज्यकर्त्यांची इच्छा असूनही गोमातेबद्दलचे प्रेम व्यक्त करता येत नाही. या पुढे मतदान करताना आपल्या गोमातेचे रक्षण करण्याचे प्रतिज्ञापत्र जो उमेदवार किंवा त्यांचा पक्ष देईल त्यालाच मतदान करा. तसेच, मी राजकारण करतो, असे काही जण म्हणतात. मी राजकारण नाही तर धर्मकारण करतो. मला हि गादी सोडून जाण्याची आवश्यकता नाही. कारण राष्ट्रपती, पंतप्रधान सुद्धा चरण स्पर्श करण्यासाठी येथे येतात. तुम्ही कोणत्याही पक्षाला किंवा व्यक्तीला मत द्या, फक्त आपल्या गोमातेला वाचवणारा तो असला पाहिजे. ज्याप्रमाणे मुलाला एखादा बाप मारत असेल तर त्याची आई कोणताही विचार न करता आधी मला मारा, असे म्हणते. त्याप्रमाणे आपल्याला वाचविण्यासाठी गोमाता पुढे असते, असे प्रतिपादन ज्योतिषपीठाधीश्वर परमपूज्य जगद्गुरु शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती महाराज यांनी येथे केले.

कर्जत तालुक्यातील सावरगाव येथे अशोक सावंत व सुभाष सावंत परिवाराने श्री शिवमंदिर उभारले आहे. तेथील मंदिरात शिवपिंड रौप्यकवच समर्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती महाराज यांच्या हस्ते शिवपिंड रौप्यकवच समर्पण करण्यात आले. याप्रसंगी आमदार महेंद्र थोरवे, जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, संतोष भोईर, अनिल कडू, संजय कडू, नरेश ठाकर, चेतन सावंत, योगेश सावंत आदी उपस्थित होते. यजमान सुभाष सावंत आणि संगीता सावंत या उभयतांनी पादुका पूजन केले. यावेळी अशोक सावंत, सरिता सावंत यांच्यासह दत्तात्रेय पिंपरकर, ज्ञानेश्वर भालिवडे, संजय हरपुडे, रणजीत जैन, कैलास पोटे, जितेंद्र ओसवाल, आनंद जोशी, राजेश ओसवाल आदींसह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड
## सामान्य शाखा

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२२११८ ई मेल. tahasildargadraigad@gmail.com

क्र/साशा/कार्या-१/ब-१/जिपपंस/निवडणुक/इ निविदा/२०२५ दि.९/१०/२०२५

**जिल्हा परिषद पंचायत समिती/ नगरपालिका/ नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५**
**ई निविदा सुचना क्रमांक ००/००००**
**विद्युत जोडणी,ध्वनीक्षेपक यंत्रणा व इतर साहित्य पुरवठा बाबत ई निविदा सूचना**

आगामी जिल्हा परिषद/पंचायत समिती नगरपालिका/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने संपूर्ण प्रक्रियेदरम्यान जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी विद्युत जोडणी, ध्वनीक्षेपक यंत्रणा व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करणेत येत आहे.

**कामाचे नाव** : रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद/पंचायत समिती/नगरपालिका/ नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ सार्वत्रिक निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रिये दरम्यान **विद्युत जोडणी, ध्वनीक्षेपक यंत्रणा व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावरपुरवठा करणेबाबत.**

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू. ५०,००,०००/- |
| निविदा फार्म शुल्क | रू. १०,०००/- (विना परतावा) |
| इसारा/बयाणा (EMD) रक्कम | रू. ९०,०००/- |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू. १,५०,०००/- |
| ई निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वेळ | दि.२४/१०/२०२५ सकाळी ११.०० वाजता |
| ई- निविदा भरण्याचा कालावधी | दि. २४/१०/२०२५ सकाळी ११.०० पासून ते दि. ०७/११/२०२५ सायंकाळी ०५.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैटक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि. ३०/१०/२०२५ स/दु. ११.०० वाजता |
| ई निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि.०७/११/२०२५ सा. ०५.०० वाजता |
| ई निविदा फार्म क्रमांक-१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि.१०/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता |
| ई -निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन जिल्हा रायगड |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन जिल्हा रायगड |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)

२ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

३. सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.

४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.

५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई-निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही. निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पूर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हाधिकारी सामान्य शाखा यांचे दालनात राहील.

सही/-
**जिल्हाधिकारी रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या मिळकती विद्यमान मालक श्री चंद्रकांत जनार्दन घरत यांचेकडून खरेदी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतींवरील मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बामणगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| ६८ | ०-२०-२० | १-०० |
| ७१ | ०-०७-१० | ०-३७ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहेत असे समजून मिळकतींचे खरेदीखत पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- २४/१०/२०२५

**ॲड. निलेश अशोक म्हात्रे**
''गुरूकृपा'' अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेती मिळकत, त्यामधील शेतघरासह सदर मिळकतीचे मालक मयत जयसिंग सिसोदिया यांची पत्नी राजकुमारी रत्ना सिंग, मुलगा-भूवांयू सिंग आणि मुलगी-तनुश्रीकुमारी सिंग यांचेकडून खरेदी घेण्याचा करार केला आहे. वर नमूद व्यक्तीनी मिळकतीवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कोळगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| १९२ | ००-१४-२० | १.७२ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- २४/१०/२०२५

**ॲड. रविंद्र वि.ओक**
''गुरूकृपा'' अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड.

# कर्जत तालुक्यातील कडाव जिल्हा परिषद गटावर अनेकांचा डोळा

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात कडाव जिल्हा परिषद गट हा एकमेव नागरिकांनाच मागास प्रवर्गसाठी राखीव आहे. तालुक्यातील बहुसंख्य राजकारण्यांसाठी कडाव जिल्हा परिषद निवडणूक लढविण्यासाठी एकमेव प्रभाग असल्याने त्या ठिकाणी अनेक फेरबदल राजकीय पक्षांमध्ये होण्याची शक्यता आहेत. दरम्यान, काही आयात उमेदवार या जिल्हा परिषद गटात उतरण्याची शक्यता असून युती आणि आघाड्या यांच्यावर बऱ्याचशा शक्यता अवलंबून आहेत. तसेच, राजकीय फोडाफोडीचे राजकारण कडाव जिल्हा परिषद गटात आगामी काळात दिसून येण्याची शक्यता आहे.

कर्जत तालुक्यात जिल्हा परिषदेचे सहा प्रभाग असून त्यातील सर्व प्रभाग हे आरक्षित झाले आहेत. निवडणूक आयोगाने काढलेल्या सोडतीनंतर कर्जत तालुक्यातील राजकारणी यांच्यात असलेले आनंदाचे वातावरण संपुष्ठात आले आहे. मात्र, त्यातही कडाव हा एकमेव जिल्हा परिषद आहे कि त्या ठिकाणी नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षण असल्याने त्या ठिकाणी निवडणूक लढविण्यासाठी इच्छुकांची गर्दी दिसून येऊ येत आहे. या गटातून निवडणूक लढविण्यासाठी सक्षम उमेदवार शोधण्यात सर्वच पक्षांनी शोधाशोध सुरु केली आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत, मिळकतीचे मालक श्री.चंद्रकांत लक्ष्मण वावेकर वगैरे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी चालू आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| पिटकिरी | ९ | ०-०७-६० ०-०२-३० एकूण क्षेत्र ०-०९-९० | ०.९१ |

सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी दिलेला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकारार, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क, व हितसंबंध वा दुरान्वये संबंध असल्यास अशा व्यक्तीनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार याजकडे हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे, असे समजून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू. व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २४/१०/२०२५

**ॲड. वैभव गिरीधर पाटील**
जिल्हा न्यायालय अलिबाग, रायगड
मु. सांबरी, पो.कुर्डूस, ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ८८०५५१८०६८

## महाराष्ट्र शासन
## जिल्हाधिकारी कार्यालय रायगड अलिबाग
## हिराकोट तलाव जवळ, अलिबाग ता.अलिबाग

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२४१३१ फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८
ई-मेल : tahasildarraigad@gmail.com ई-मेल : degadraigad@gmail.com

क्र/निवडणूक/कार्या ६(२)/ मतदार यादी छपाई निविदा/२०२५ दि. १७/१०/२०२५

**जिल्हा परिषद/पंचायत समिती/नगरपंचायत/नगरपालिका निवडणूक २०२५**
**मतदार यादी छपाई ई - निविदा सूचना क्रमांक ०१/२०२५**
**मतदार यादी छपाई बाबत ई निविदा सूचना**

जिल्हा परिषद/पंचायत समिती/नगरपंचायत/नगरपालिका निवडणूक २०२५ कामासाठी १. अंतिम मतदार यादी, २. निवडणूक अनुषंगाने विषयक इतर छपाई इ.बाबींची छपाई पीडीएफ सीडीवरून छपाई करण्यासाठी ई-निविदा प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. सदर निविदा ही www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**कामाचे नाव**:- जिल्हा परिषद/पंचायत समिती/नगरपंचायत/नगरपालिका निवडणूक मतदार यादी व तदनुषंगिक **बाबींची पीडीएफ वरून मतदार यादी छपाई कामाची ई-निविदा.**

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू.५० लक्ष |
| ई निविदा फॉर्म शुल्क | रू. १०,०००/- (विना परतावा) |
| इसारा/बयाणा (EMD) रक्कम | रू. ९०,०००/- |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू.१,५०,०००/- |
| ई- निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वेळ | दि. २४/१०/२०२५ सकाळी ११.०० वाजता |
| ई- निविदा भरण्याचा कालावधी | दि. २४/१०/२०२५ सकाळी ११.०० पासून ते दि. ०७/११/२०२५ सायंकाळी ०६.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि. ३०/१०/२०२५ सकाळी ११.०० वाजता |
| ई-निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि.०७/११/२०२५ सायंकाळी ०६.०० वाजता |
| ई -निविदा फॉर्म क्रमांक - १ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि.१०/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता |
| ई- निविदा उघडण्याचे ठिकाण | सामान्य शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन तांत्रिक लिफाफ्यामध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा Excel sheet मध्ये BoQ मध्ये अपलोड करावा.) २ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.

४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.

५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई-निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही. निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पूर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी तहसिलदार सामान्य प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे दालनात राहील.

सही/-
**(किशन ना.जावळे)**
**जिल्हाधिकारी रायगड अलिबाग**

## E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification

| Sr. No. | Tender No.EE/400kV R.S. (O&M) Dn/ NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-16/ 25-26/ Rfx No. 7000037756 | Scheme for SITC of 1 No. of 22kV Bay for MSEDCL at 400 kV Nagothane s/s under 400 kV RS O&M Division Nagothane... 2nd call | Rs. 20,22,308.83/- | 02.11.2025 up to 23:59hrs |

**EMD 1 % of estimate Cost i.e. 20,223.08/-,** Tender fee Rs. 500/- + GST
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in**
**Note:** All eligible supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक

### पनवेल महापालिकेच्या डांबरीकरणावर पावसाचे पाणी

**पनवेल** : पनवेल महापालिकेतील खड्ड्यांमुळे मागील काही दिवसांमध्ये पनवेल महापालिका प्रशासनावर जोरदार टीका होत आहे. रस्ते बांधणीच्या विकास कामांची कंत्राट लोकप्रतिनिधींच्या नातेवाईकांच्या कंपन्यांना मिळू लागल्याने हा विषय सर्वाधिक चर्चेचा बनला. महापालिका आयुक्तांनी पालिकेतील कारभार पारदर्शक असल्याचे स्पष्ट करताना संबंधित रस्त्यांची कामे करणाऱ्या कंपन्यांनी केलेल्या कामांची चौकशी करण्यासाठी अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. तसेच चौकशी समितीचा अहवाल येईपर्यंत संबंधित कंपन्यांना कोणतीही भरपाई न देता कंपन्यांनीच खर्च करून पुन्हा खड्डे पडलेले रस्त्यांवर डांबरीकरण तातडीने करण्याचे फर्मान सोडले. याच आदेशाची दखल घेऊन ऑक्टोबर महिन्याच्या मध्यावर कडक उन पडल्यामुळे कंत्राटदार कंपन्यांनी सुद्धा खारघर येथील सेक्टर ३५ मधील रस्त्यांवर पुन्हा डांबरीकरणाचे काम सुरू केले. मंगळवारी सायंकाळी डांबरीकरण केलेला हा रस्ता पुन्हा पाण्याखाली गेल्याने महापालिका आणि कंत्राटदारांच्या विकासकामांवर पावसाचे पाणी फिरल्याची चर्चा शहरभर सुरू होती.

### डॉ. कैलास चौलकर यांना पितृशोक

**अलिबाग** : पशुचिकित्सक व्यवसायी संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष डॉ. कैलास चौलकर यांचे वडील गजानन धर्मा चौलकर यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी (दि. १७) निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. शनिवारी (दि.१८) गजानन धर्मा चौलकर यांच्या पार्थिवावर अंतिमसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. २८ ऑक्टोबर रोजी गजानन चौलकर यांचे उत्तरकार्य साखर, आक्षी येथील त्यांच्या निवासस्थानी करण्यात येणार आहे.



### तटकरे वारकरी भवनचे उद्घाटन

**खांब** : कोकण दिंडी रोहा वारकरी संप्रदाय यांच्या वतीने आळंदी येथे बांधण्यात आलेल्या कै.द.ग.तटकरे वारकरी भवन संस्थापक असलेल्या ब्रह्मकालीन पुरूषोत्तम पाटील (बापू) या इमारतीचा भव्य उद्घाटन सोहळा श्री.क्षेत्र आळंदी येथे रविवारी (दि.२६) सायं.ठिक ४वा.संपन्न होणार असल्याची माहितीआयोजकांनी दिली आहे. राज्यसभा सदस्य खा.प्रफुल्ल पटेल यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत १५ लाख रू.एवढ्या प्राप्त झालेल्या निधीतून या भव्यदिव्य वारकरी भवनाचे उद्घाटन भारत पेट्रोलियम व गॅस नियामक मंडळाचे चेअरमन तथा लोकसभा खासदार सुनील तटकरे व वरदा तटकरे यांच्या हस्ते होणार असून यावेळी महाराष्ट्र राज्य महिला व बाल विकास मंत्री ना.आदिती तटकरे,माजी आ.अनिकेत तटकरे, ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदीचे विश्वस्त योगी निरंजननाथ शांतीनाथ, ज्येष्ठ नेते भाईसाहेब पाशिलकर, कोकण दिंडी अध्यक्ष विजय मोरे, सचिव मधुकर पाटील आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.तर या भव्यदिव्य सोहळ्याचे यशस्वीतेसाठी कोकण दिंडी वारकरी संप्रदायाचे सर्व पदाधिकारी व वारकरी सदस्य तसेच माता भगिनी मोलाचे सहकार्य करीत आहेत.

### मानिवली ग्रामस्थ भंडाऱ्यात नाहले



**नेरळ** : हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांचे मूळ गाव असलेल्या माणिवली गावात ग्रामस्थ गेली काही दशके आपल्या कुलदैवत यांची मिरवणूक दिवाळी पाडव्याला काढत असतात. आज शेकडोचे संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले होते आणि भंडाऱ्याच्या पिवळ्या रंगात सर्व भक्त न्याहून निघाले होते. दरम्यान, हुतात्म्यांच्या गावात जेजुरी अवतरली असल्याचा प्रत्यय अनेकांनी व्यक्त केला. कर्जत तालुक्यातील मानीवली गावात गवळी आणि पाटील कुटुंबाचे कुलदैवत आहे. संपूर्ण गावाचे ग्रामदैवत जय चरोबा आणि कुलदैवत या देवाचा मिरवणूक सोहळा हा दिवाळी पाडव्याच्या दिवशी काढली जाते.या मुहूर्तावर आयोजित केला जाणारा हा उत्सव अनेक वर्षाची परंपरा सांगतो. दरवर्षी गावचे सालकरी पाटील या कुटुंबाकडे देवाचा देव्हारा आहे.तो देव्हारा पुढील वर्षी सरकारी पाटील हे पाडव्याच्या शुभमुहूर्तावर देवाचा हा सोहळा साजरा करत असतात. या सोहळ्यासाठी पंचक्रोशीतील आणि जे मानिवली गावचे रहिवासी आहेत परंतु बाहेर गावी राहायला गेले आहे. ते मोठ्या संख्येने आपल्या कुटुंबासह मिरवणुकीत सहभागी होतात. कुलदैवत यांची ही मिरवणूक बँड पथक यांच्या गाण्यांवर चालत असते. सोबत भंडाऱ्याची उधळण यात न्हाऊन निघणारे भक्त तसेच संपूर्ण रस्ते भंडाऱ्याच्या उधळणीं ने भरून गेलेले असतात.

# भात पाण्याखाली; शेतकरी चिंताग्रस्त

## तोंडाशी आलेला घास जाणार वाया



**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

गेले अनेक दिवस परतीचा पाऊस धोका देईल यांची शाश्वती नव्हती.मात्र भाताच्या लोंब्यामध्ये दाणा तयार झाल्यामुळे भात शेती त्यांच्या वजनाने पडत होती. शिवाय लोंब्यापासून दाणा अलग होत असून हे सर्व संकट ओळखून काही शेतकरी वर्गांनी भात कापणी सुरुवात केली. मात्र काल झालेल्या परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या तोंडचेपाणीपळालेआहे.कापलेल्या कडपा वरती पाणी पडल्यामुळे पेंढा कुजण्यांची शक्यता शेतकऱ्यांकडून वर्तवली जात आहे.यामुळे गुरांच्या चाऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर येणार असल्यांचे भाकीत बळीराजाकडून व्यक्त केले जात आहे.

मागील आठवड्यापासून पाऊस जरी येत असला तरी सुद्धा सर्वच ठिकाणी बरसत नव्हते. यामुळे अल्पभुधारक यांनी भातकापणी सुरु केली होती. मात्र काल झालेल्या परतीच्या पावसाने अक्षरश: दाणादाण उडवून दिली. सायंकाळी पाऊस येत नाही यांचा अंदाज घेत भातकापणी सुरु केली. मात्र परतीच्या पावसाने बळीराजास मोठ्या संकटात सापडलेले आहे.भात कापणी करावी की नाही हेच विचार त्यास स्वस्त बसू देत नाही.त्यास बरोबर दुपारी रणरणत्या उन्हाची दाहकता वाढली असून भात कापणींस मजूर मिळणे कठीण झाले आहे.यामुळे घरातील कुटुंब भातकापणीकडे वळले होते.

तोंडाशी आलेला घास वाया जावू नये, यासाठी बळीराजाने कंबर कसली आहे. कसे ही करुन भात कापणी करुन ती सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करु या विचारातून भात कापणी सुरु असून आज पुन्हा एकदा परतीच्या पावसाने धुमाकूळ घातल्यामुळे कापलेल्या भातावर पाणी पडल्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहे.यामुळे कापलेल्या कडपा पावसाच्या पाण्यामुळे भिजून गेल्या आहेत.

# परतीच्या पावसाने रडविले

## ऐन दिवाळीत व्यापारी हवालदिल शेतकरी हताश



**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

ऐन दिवाळीत पालीसह सुधागड तालुक्यात विविध ठिकाणी सोसाट्याचा वारा व विजांच्या कडकडाटासह आलेल्या परतीच्या मुसळधार पावसाने धुडगूस घातला. परिणामी ऐन दिवाळीत व्यापारी हवालदिल तर, शेतकरी हताश झाले आहेत.

पावसामुळे येथे वीज पुरवठा देखील खंडित झाला होता. दिवाळीच्या खरेदीसाठी बाहेर पडलेले ग्राहक पावसामुळे माघारी फिरले. शेतकऱ्यांचे भाताचे पिक अजुनही शेतात आहे. तर काहींनी कापून ठेवले आहे. पावसामुळे या पिकाचे नुकसान झाले.

व्यापारी व दुकानदारांनी दिवाळीचा लाखो रुपयांचा माल भरून ठेवला आहे. परंतु पावसामुळे ग्राहक खरेदीसाठी बाहेर न पडल्याने ऐन दिवाळीत वस्तुंना उठाव मिळणार नाही. फटाके विक्रेत्यांचा माल अक्षरशः भिजला. इलेक्ट्रिक सामान आकाश कंदील दिवे आदी देखील भिजले. त्यामुळे व्यावसायिक व व्यापारी पुरते हवालदिल झाले आहेत. असे पालीतील व्यावसायिक मुकुंद कोसुंबकर यांनी सांगितले.

> शेतामध्ये भाताचे पीक चांगले आले होते. भाताची कापणी करून झोडणीची कामे सुरू करणार होतो. मात्र ऐनवेळी परतीच्या मुसळधार पावसाचे आगमन झाले. उभे भात पिक अक्षरशः आडवे झाले आहे. शेतात देखील पाणी साठले आहे. भात सुद्धा भिजला असून मोठे नुकसान झाले आहे. शासनाने लवकरात लवकर पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी.
> राम तुपे, शेतकरी, कोंडगाव, सुधागड

अजुन शेतकऱ्यांचे धान्य शेतात आहेत. सुगीच्या दिवसांना अजुन सुरुवात झालेली नाही. त्यात पावसाने भाताचे (पिकांचे) पुरते नुकसान केले आहे. त्यामुळे ऐन दिवाळीत शेतकऱ्यांना नुकसानीला सामोरे जावे लागणार आहे त्यामुळे तो धास्तीत आणि हताश आहेत.



● मुरुडला दिवाळी हंगाम सुरु आहे आणि पर्यटकांना समुद्रकिनारी सीगल पक्षी पहायला मिळतात. सकाळी थवे पाहायला मिळतात. परंतु फटाक्याचे आवाज झाले की पक्षी समुद्रात पळतात.
(छायाचित्र : सुधीर नाझरे)

### रायगड मेडिकल असोसिएशन तर्फे धन्वंतरी पूजन

**कर्जत** : श्री धन्वंतरी जयंतीनिमित्त रायगड मेडिकल असोसिएशन तर्फे श्री धन्वंतरी पूजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. शर्वाणी कुलकर्णी, डॉ. शीतल कराळे, डॉ. संगीता दळवी, डॉ. रितेश जैन, डॉ. राहुल ओसवाल, डॉ. संजीव पाटील, डॉ. निलेश म्हात्रे, डॉ. गणेश मेंगाळ, डॉ. अमित ओसवाल, डॉ. नागेश चित्ते, डॉ. मनीष परमार डॉ. कुमार ओसवाल, डॉ. दिलीप सावळे आदी उपस्थित होते.

### कर्जत आणि माथेरान नगरपरिषदेच्या
## कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदानाचे वाटप

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत नगरपरिषदमधील अधिकारी, कर्मचारी यांना पालिकेच्या वतीने सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आले. माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेकडून देखील आपल्या अधिकारी आणि कर्मचारी वर्गाला सानुग्रह अनुदान जाहीर केले आहे. कर्जत आणि माथेरान या दोन्ही नगरपरिषदा मधील कर्मचाऱ्यांच्या खात्यात शनिवारी हे अनुदान जमा करण्यात आल्याची माहिती मुख्याधिकारी यांच्याकडून देण्यात आली.

दिवाळी सणाच्या वेळी बोनस म्हणून सानुग्रह अनुदान देण्याची प्रथा आहे.कर्जत नगरपरिषद मधील कर्मचाऱ्यांना बोनस मिळावा यासाठी पालिका कर्मचारी संघटनेने मागणी केली होती.शनिवारी कर्जत नगरपरिषद मधील सर्व कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात आले असून हे अनुदान कर्मचाऱ्यांना बंद खात्यात जमा झाले आहे अशी माहिती पालिकेच्या वतीने देण्यात आली.त्यात कायम स्वरूपी तत्वावर असलेले सफाई कर्मचारी आणि कार्यालयीन कर्मचारी अशा ९१ अधिकारी कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात आले. तानाजी चव्हाण यांच्याकडून २५ हजार सानुग्रह अनुदान म्हणून देण्याचा निर्णय घेण्यात आला आणि त्यानंतर शनिवारी बँक खात्यात जमा करण्यास सुरुवात झाली. माथेरान नगरपरिषदेमध्ये देखील ५८ कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यात आले.

# क्रूझ करियर शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद




**। माथेरान । प्रतिनिधी।**

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर दहावी बारावी नंतरच्या काळात कुटुंबाला आधार देण्यासाठी युवा पिढी कुणी नोकरीच्या मागे लागतात तर कुणी व्यवसाय निवडताना दिसतात. परंतु आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी आणि विशेष म्हणजे कमी वेळात अधिक पैसा कामविण्याचे उत्तम साधन म्हणजे क्रूझ करियर असल्याचे मत माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी व्यक्त केले.

माथेरान तसेच इतर ठिकाणांहून आलेल्या युवकांसाठी क्रूझ करियर शिबिराचे आयोजन खेडकर यांनी हॉटेल सन अँड शेड इथे केले होते त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर क्रूझ मध्ये कार्यरत असणारी मुले प्रमुख अतिथी म्हणून प्रवीण जोशीलकर, अभिराज मेडगे, महेश तुपे, भूषण सावंत, नईम खान, विशाल इंगळे, संदेश पाटील हे स्थानापन्न झाले होते.शिक्षक सुनील शिंदे, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे,उद्योजक नितीन शहा, संदीप शिंदे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.

खेडकर पुढे म्हणाले की हॉटेल मॅनेजमेंट कोर्स पूर्ण झाल्यावर क्रूझ वर चांगल्या पगाराचे काम मिळत असून देशविदेशात याच माध्यम ातून भटकंती सुध्दा होते. दरमहा लाखोंची कमाई आणि जगभर प्रवास हे युवकांना अल्पावधीतच मिळत असते. या क्रूझमधील कामामुळे या युवकांकडून त्यांच्या कुटुंबाला मोठा आधार मिळत आहे. माथेरान मधून तिघेजण या क्षेत्रात कार्यरत असून त्यानांही या गावातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांनी हे शिबीर आयोजित करण्यासाठी परिश्रम घेतले. क्रूझवरील कामामुळे अल्पावधीतच लाखोंची कमाई होत असून या माध्यमातून जगभर प्रवास करण्याची नामी संधी उपलब्ध होत असते. यावेळी गावातील काही युवक युवती त्याचप्रमाणे राज्यातील विविध भागांतील युवकांनी आवर्जून या शिबिरासाठी हजेरी लावली.राधा खेडकर, शिक्षक योगेश जाधव यांनी यावेळी आपले अनमोल विचार व्यक्त केले. त्याचबरोबर उपस्थित क्रूझमधील प्रमुख पाहुण्यांनी उत्तम मार्गदर्शन केले.

# दिवाळीत मतदार ‘राजा’

**। पनवेल । प्रतिनिधी।**

महापालिका निवडणुकीसाठी इच्छुकांकडून मतदारांशी संपर्क साधण्यासाठी विविध क्लृप्त्या लढवल्या जात आहेत. दिवाळी फराळ, मिठाई वाटपाबरोबरच विविध स्पर्धात्मक कार्यक्रमांतून बक्षिसांमधून मतदार राजाला खूश करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिका निवडणूक ३१ जानेवारी २०२६ पूर्वी होणार असल्याचे निश्चित झाले आहे. माजी नगरसेवकासह नवीन इच्छुकही तयारीला लागले आहेत. निवडणूक लढवणार असलेल्या प्रभागांमध्ये दिवाळीनिमित्त विविध स्पर्धात्मक कार्यक्रम होत आहेत.

काहींनी दिवाळी फराळ कार्यक्रमातून संपर्क वाढवला जात आहे. निवडणूक आचारसंहिता लागू होण्यापूर्वी मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू आहे.

### फराळ, पणत्या वाटप, किल्ले स्पर्धा

प्रभागात जनसंपर्क वाढवण्यासाठी नागरिकांना शुभेच्छा घरपोच दिल्या जात आहेत. यासोबत उटणे, पणत्या भेट दिल्या जात आहेत. दिवाळीपूर्वी महिला व्यावसायिकांसाठी गृहपयोगी वस्तूंच्या विक्रीचे प्रदर्शन भरवणे, लहान मुलांसाठी किल्ले स्पर्धा, फोटोसह जाहिरात करणे यासाठी कार्यकर्त्यांची सध्या लगबग सुरू आहे.

> दिवाळी आनंदाचा आणि एकोपा वाढवण्याचा सण आहे. या काळात सांस्कृतिक माध्यमातून संवाद साधत आहोत. दिवाळी पहाटसारखे कार्यक्रम हे केवळ मनोरंजनासाठी नसून समाजातील ऐक्य वाढविण्यासाठीचा प्रयत्न आहे. राजकारणापलीकडे आनंद देणे हाच आमचा हेतू आहे. – महेश पाटील, आयोजक.

### ■ फराळ, मिठाई वाटपातून इच्छुकांकडून संपर्क

# खाडीपट्ट्यात रोजगार वाढीसाठी आम्ही कटिबद्ध

## चंद्रकांत धोंडगे यांचे प्रतिपादन



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दुग्ध शेती शेतकरी सन्मान सोहळा म्हणजे दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाला ओळख देण्यासाठी सी एस धोंडगे ॲग्रो डेअरी फार्मचे रोहन फाटा येथील संस्थापक चंद्रकांत धोंडगे यांनी स्व.अश्विनीताई गीते सभागृह येथे फार्मच्या द्वितीय वर्धापन दिनी कार्यक्रमामध्ये वाशिष्ठी मिल्क ॲन्ड प्रॉडक्ट्स अंतर्गत दुग्ध उत्पादक उत्कृष्ट शेतकरी यांचा विशेष सन्मानित करण्यात आले त्यावेळी चंद्रकांत धोंडगे यांनी खाडीपट्टयात रोजगार वाढीसाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन केले.

याप्रसंगी सी एस धोंडगे ॲग्रो डेअरी फार्मचे संस्थापक चंद्रकांत धोंडगे यांच्यासह संचालक सुरेश धोंडगे, संतोष फाटक, वाशिष्ठी मिल्क डेअरी प्रॉडक्ट प्रा.लि.चे डेअरी मॅनेजर प्रदीप मगदूम, मॅनेजर हर्षल चाळके, जिल्हा पशुधन पर्यवेक्षक सोनाली आहिरे, कुणबी समाज ओवळे गट अध्यक्ष प्रकाश देवळे, सेक्रेटरी लक्ष्मण गजमळ, माजी उप सरपंच गणपत मालप, सदस्य नितीन कदम, जुई सरपंच समीर देवळे यांच्यासह दुग्ध व्यवसाय शेतकरी अंकुश नवले, जया निवाते, राज राणे, कृष्णा म्हसकर, शंकर मालप, संदीप राणे, संजय जंगम, विक्रांत घाणेकर, आर्यन केंद्रे, बाळकृष्ण खोपकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना धोंडगे म्हणाले की, दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मेहनतीचा आणि योगदानाचा गौरव करणे, तसेच इतरांना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचे मुख्य उद्देश असून मनामनात कोकण ब्रीद वाक्य घेऊन सी एस धोंडगे ॲग्रो डेअरी फार्मच्या चार-पाच शेतकऱ्यांपासून दोन वर्षात ४५ शेतकरी जमा झाले व चांगल्या प्रकारे काम करत आहेत अजून पुढे शेतकरी वाढवण्याचा मानस आहे. शेतकऱ्यांना व त्यांना रोजगार विभागातच निर्माण व्हावा यासाठी आमचे प्रयत्न राहतील आणि आम्ही कटिबद्ध आहोत असे ते म्हणाले.

### वीस वर्षांपासूनची परंपरा कायम | महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीचा उपक्रम

# रायगडात फटाकेमुक्त दिवाळी अभियान

**। पाली /बेणसे। प्रतिनिधी ।**

मागील वीस वर्षांपासून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती फटाके मुक्त दिवाळी अभियान राबवित आहे. यंदाही हे अभियान जिल्ह्यात राबविले जात आहे. यासाठी पुस्तक वाटप, रिल्स बनवणे, समाज माध्यम व इंस्टाग्राम पोस्ट वर जनजागृती, पुस्तक स्टॉल, सेल्फी पॉईंट, पत्रके वाटप आदी उपक्रम राबविले जात आहेत.

महा अंनिस बरोबरच विविध सामाजिक संघटना, काही पर्यावरण प्रेमी लोक, समाजसेवक आणि जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयातून देखील पर्यावरणस्नेही दिवाळीसाठी प्रभावी जनजागृती केली जात आहे.

फटाकेवाजवूनखरेतरविध्वंसक वृत्ती वाढू शकते. तसेच वायू व ध्वनी प्रदुषणही वाढते. पर्यावरण ऱ्हास याबरोबरच सभोवतालच्या प्राण्यांना देखिल फटाक्यांचा त्रास होतो. त्यामुळे अनेक सुज्ञ पालक व शिक्षक आपल्या मुलांना दिवाळीत फटाके न फोडण्यास प्रोत्साहित करताना दिसत आहेत. फटाक्यांचे दुष्परिणामांची माहिती देत आहेत.

फटाके फोडण्याऐवजी मुलांना पुस्तक वाचन, किल्ले बांधणी, आकाश कंदिल व भेटकार्ड बणविणे, रांगोळी काढणे अशा रचनात्मक उपक्रमात सहभागी करुन घेत आहेत. तसेच फटाक्याचे पैसे वाचवून त्या पैश्यांत अवांतर वाचनाची पुस्तके विकत घेण्यास मुलांना प्रोत्साहित केले जातांना दिसत आहे. केवळ सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनासाठी लाखो रुपयांचे उत्पन्न बंद करण्याचे धाडस फार कमी लोक करतात. हे धाडस करुन दाखविले आहे पेण येथील रोहन मनोरे या तरुणाने. जवळपास दहा वर्ष मोठ्या जोमात सुरु असलेले फटाक्यांचे एका झटक्यात बंद करुन फटाके विक्री शून्यावर आणण्याचा संकल्प केला.

जिल्ह्यात काही शाळकरी मुले फटाके न फोडता किंवा अगदी कमी फोडून वाचलेल्या पैशातुन विधायक कामे करतांना दिसत आहेत. काही मुले फटाके मुक्त दिवाळी साजरी करून वाचविलेल्या पैश्यातून चांगली पुस्तके, खेळणी, भेटवस्तू, मिठाई, गरिबांच्या घरी फराळ देणे, त्यांना आर्थिक, शैक्षणिक मदत करणे. आदी गोष्टी करतांना दिसत आहेत. पालीतील विनय निकुंभ हा विद्यार्थी फटाक्यांच्या वाचलेल्या पैशातून गरिबांना फराळाचे वाटप करतो. अशी अनेक उदाहरणे आहेत.

अंनिसतर्फे फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सअपद्वारे फटक्याच्या दुष्परिणामांची माहिती प्रसारित करणे. यासारख्या अभिनव पद्धतीचा अवलंब करण्यात येत आहे.

### फटाके न फोडता वाचलेल्या पैशातुन विधायक कामे

अंनिसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना फटाकेमुक्त दिवाळी साजरी करून किमान शंभर रुपये वाचवा आणि वाचविलेल्या रकमेतून चांगली पुस्तके, खेळणी, भेटवस्तू, मिठाई, गरिबांच्या घरी फराळ देणे, त्यांना आर्थिक, शैक्षणिक मदत करणे, सारख्या सामजिक कार्यासाठी प्रोत्साहित करण्यात येते. काही शाळेतील विद्यार्थ्यांनी फटाके न फोडता वाचविलेल्या रकमेतून शाळेच्या वाचनालयाला दिली, काही विद्यार्थ्यांनी या वाचलेल्या रकमेतून वर्गातील गरीब विद्यार्थ्यांना चप्पल व बॅगा दिल्या, काही शाळेतल्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपल्या घरी बनविलेले दिवाळीचे पदार्थ आणले व झोपडपट्टीतील मुलांना देऊन त्यांच्या सोबत दिवाळी साजरी करतात. पालीतील विनय निकुंभ हा विद्यार्थी फटाक्यांच्या वाचलेल्या पैशातून गरिबांना फराळाचे वाटप करतो. अशी अनेक उदाहरणे आहेत.

> महाराष्ट्र अंनिस मार्फत राबविल्या जाणाऱ्या फटाके मुक्त दिवाळी अभियानाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. तसेच सर्वांनी फक्त दिवाळीतच नाही तर वेगवेगळ्या धर्मातील सणांच्या दिवशी, निवडणुका, मिरवणूक, नेत्यांचे वाढदिवस अशा प्रसंगी प्रदूषणकारी फटाक्यांचा वापर टाळावा.
> – मोहन भोईर, जिल्हा कार्याध्यक्ष, महा. अंनिस जिल्हा रायगड




## राशीभविष्य

- **मेष** : सणाच्या खरेदीचा उत्साह राहील. दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. विद्यार्थ्यांना स्पर्धांमध्ये यश मिळेल.
- **वृषभ** : कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. व्यवसायात बऱ्यापैकी उलाढाल राहील. आप्तस्वकीयांची भेट होईल.
- **मिथुन** : विवाहाच्या प्रयत्नात अनुकूलता राहील. सुवार्ता कानी येईल. गृहसजावटीवर अधिक भर राहील.
- **कर्क** : महत्त्वपूर्ण भेटीचे योग आहेत. चैनीवर अधिक खर्च होईल. धार्मिक स्थळांच्या यात्रेने आनंद लाभेल.
- **सिंह** : उत्साहवर्धक घटना घडतील. चांगला पैसा हाती आल्याने सणाचा उत्साह वाढेल. बाकी चिंता नसावी.
- **कन्या** : आर्थिकदृष्ट्या उत्कर्षाच्या संधी लाभतील. अनुभवींचा सल्ला कामी येईल. गुंतवणूक विचारानं करा.
- **तूळ** : भाग्योदयाचा कालावधी आहे. नव्या संकल्पनांना मूर्त रूप येईल. स्थावर प्रश्नातून योग्य मार्ग निघेल.
- **वृश्चिक** : प्रलंबित कामांना गती मिळेल. व्यवसायात मनाजोगी उलाढाल होईल. स्वमताग्रह टाळायला हवा.
- **धनु** : जुनी येणी वसूल होतील. डोळ्यांच्या तक्रारी संभवतात. क्रीडा, शिक्षण या क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **मकर** : इतरांकडून अधिक अपेक्षा बाळगू नका. कलाकारांना उत्तम संधी लाभतील. सणाचा आनंद राहील.
- **कुंभ** : कौटुंबिक अडचणी दूर होतील. भाग्योदयकारक घटना घडतील. नव्या योजना विचारानं स्वीकाराव्या.
- **मीन** : खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. भागीदारी व्यवसायात काळजी घ्यावी. प्रकृती सांभाळावी.

स्टाईल स्टेटमेंट

## ट्राय करा खादी लूक

खादीच्या या लेटेस्ट फॅशनवर एक नजर टाकू या.

✻ खादीच्या पँट बाजारात उपलब्ध आहेत. जीन्सच्या तुलनेत मोकळ्याढाकळ्या आणि अत्यंत आरामदायी अशा या पँटना महिलांची पसंती मिळते आहे. वेगवेगळ्या आकाराच्या, रंगाच्या आणि डिझाइच्या खादी पँट तुम्हाला बघायला मिळतील. या पँट तुम्हाला कूल लूक देतील. ✻ खादीच्या साड्या कायमच ट्रेंडमध्ये असतात. हटके लूक मिळवण्यासाठी तुमच्या वॉर्डरॉबमध्येही खादीची साडी असली पाहिजे. खादीच्या साड्याही ट्रेंडी दिसतात. अशा साड्यांवर छान डिझायनर ब्लाउज कॅरी करून तुम्ही मस्त फॅन्सी लूक मिळवू शकता. डिझायनर ब्लाउजसोबत खादीची साडी भाव खाऊन जाते. कोणत्याही ऑकेजनला ही साडी शोभून दिसते. ✻ खादीच्या कुर्त्यांमध्येही बरीच व्हरायटी बघायला मिळते. खादीमध्येही डिझायनर कुर्ते उपलब्ध झाले आहेत. खादी कुर्त्यांचा टिपिकल लूक कधीच मागे पडला आहे. खादी कुर्ता तुम्हाला क्लासी लूक मिळवून देऊ शकतो. ✻ खादीचे टॉप्स आणि शॉर्ट कुर्तेही आहेत. हे कुर्ते जीन्स, कॉटन किंवा खादी पँटवर अगदी सहज कॅरी करता येतील. कॉलेज, ऑफिस किंवा कॅज्युअल ऑकेजनलाही हे कुर्ते चालून जातील.

## २४ ऑक्टोबर

दिनविशेष

१९१० : अभिनेत्री लीला पेंढारकर यांचा जन्म.
१९३५ : पत्रकार आणि लेखक मार्क टुली यांचा जन्म.
१९७६ : अभिनेत्री मल्लिका शेरावत यांचा जन्म.
२०१३ : आपल्या जादुई आवाजाने तब्बल पाच दशके हिंदी चित्रपट संगीतात ठसा उमटवणारे ज्येष्ठ गायक मन्ना डे ऊर्फ मन्नादा यांचे निधन.
२०१६ : सायरस मिस्त्री यांची टाटा समूहाच्या चेअरमन पदावरुन हकालपट्टी.

महत्त्वपूर्ण काही...

## पाण्याची उकळी

उष्णतेशिवाय पाण्याला उकळी येणं शक्य नाही. पण पाण्याच्या किंवा खरं तर कोणत्याही द्रवपदार्थाच्या नैसर्गिक गुणधर्मांचाच वापर करत पाण्याला उष्णतेशिवाय उकळी आणणं शक्य आहे. पाणी हे निसर्गात घन, द्रव आणि वायू अशा तिन्ही अवस्थांमध्ये अस्तित्वात असतं. ते एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जातं तेव्हा रेणूंच्या बंधनांवर परिणाम होतो. द्रवरूपात असताना पाण्याचे रेणू एकमेकांना घट्ट धरुन असतात. त्यामुळेच काचेच्या भांड्यात पाणी ठेवलं तर भांड्याच्या तोंडाशी फुगवटा येतो; पण त्याच वेळी त्यावर हवेचा दाबही पडलेला असतो. तो पाण्याच्या रेणूंना खालच्या दिशेनं दाबतो. पाणी तापवतो तेव्हा त्याला मिळालेली उष्णता पाण्याच्या रेणूंना ऊर्जा देते. ती ऊर्जा मग त्यांना एकमेकांबरोबर असलेल्या बंधनांवर मात करून दूर जायला मदत करते. उष्णता मिळते तसे हे रेणू आपल्याच भाईबंदांच्या ओढीवर मारत करतातच, त्याचबरोबर हवेच्या दाबावरही मात करत हवेत जातात. म्हणजे हवेच्या दाबाला न जुमानता बरेच रेणू उडून जाऊ पाहतात, तेव्हा पाण्याला उकळी येते असं आपण म्हणतो

आरोग्यमंत्र

## उशीरा जेवण टाळा

धकाधकीचं जीवन, कामाचा ताण, घरी जायच्या अडनिड्या वेळा यामुळे अनेकजण रात्रीचं जेवण उशीरा घेतात. रात्री उशीरा जेवल्याने आरोग्यविषयक समस्या उद्‌भवू शकतात. उशीरा जेवल्याचे शरीरावर वाईट परिणाम होतात. रात्री आठनंतर जेवल्याने शरीरात 'ॲड्रेनलाईन' नामक स्ट्रेस हार्मोन्सची निर्मिती होते आणि आपण तणावाखाली येतो. रात्री उशीरा जेवल्याचे इतरही अनेक दुष्परिणाम आहेत. त्याविषयी जाणून घेऊ या...



✻ उशीरा जेवल्याने अन्नाचं रूपांतर ट्रायग्लिसराइड्समध्ये होतं. यामुळे शरीरात अतिरिक्त फॅट्स जमा होऊन वजन वाढायला सुरूवात होते.

✻ जेवायला उशीर झाल्याने पचनाच्या समस्या निर्माण होतात. यामुळे रात्रीच्या झोपेवरही परिणाम होतो.

✻ उशिरा जेवल्याने झोपही उशीरा लागते आणि ताण निर्माण करणाऱ्या हार्मोन्सची निर्मिती होऊ लागते.

✻ अन्नपचन योग्य पद्धतीने न झाल्याने अन्नातले आवश्यक ते पोषक घटक शरीराला मिळत नाहीत.

✻ शरीरात ॲड्रेनलाईन नामक हार्मोनची पातळी वाढल्याने उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होण्याची शक्यता असते.

✻ उशीरा जेवल्याने वजन वाढतं. शरीरात वाईट कोलेस्टेरॉलची निर्मिती होते आणि हृदयविकाराचा धोका वाढतो.

### पंचांग

**शुक्रवार, २४ ऑक्टोबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, कार्तिक शु. ३, चंद्रराशी : वृश्चिक, नक्षत्र : अनुराधा, योग : सौभाग्य, सूर्योदय ६.३८, सूर्यास्त ६.०८

### फॉरवर्डस

**वहम सें भीं ख़त्म हों जातें हैं अक़्सर रिश्तें...**

**कसूर हर बार ग़लतियों क़ा नहीं होतां...!**

### वाचा तर खरं

माणसाचे पूर्वज म्हणजे माकडं. तुम्हाला माहितीये, आशिया आणि आफ्रिकेतील माकडांना प्राचीन जगातील माकडं म्हणतात तर दक्षिणी अमेरिकेकडील माकडांना नवीन जगातील माकडं असं म्हटलं जातं. प्राचीन जगातील माकडांना ३६ दात असतात. पण नवीन जगातील माकडांच्या तोंडात ३२ दात असतात. आत्तापर्यंत माकडांच्या २६४ प्रजातींचा शोध लागला असून सर्वाधिक प्रजाती ब्राझीलमध्ये आढळतात. माणूस आणि माकडांचा डीएनए ९८ टक्के समान असतो.

करिअरवाटा

## इव्हेंट मॅनेजर व्हा

आजकाल कोणत्याही समारंभाचं यश नेटकं नियोजन, मनमोहक सजावट आणि उत्तम पदार्थ यावर अवलंबून असतं. या सगळ्या एकत्रित कामालाच इव्हेंट मॅनेजमेंट म्हणतात. सध्या वाढत्या कॉर्पोरेट ट्रेंडमध्ये इव्हेंट मॅनेजमेंट क्षेत्राला चांगले दिवस आले आहेत. विशेष म्हणजे यात



प्रशिक्षित मनुष्यबळाची चणचण जाणवते. त्यादृष्टीने धडपड्या आणि उत्तम व्यवस्थापन कौशल्य असलेल्या तरुणांनी या क्षेत्रात आवर्जुन शिरलं पाहिजे. आपण टीव्हीवर अनेक शोज बघतो. त्यांच्या स्टेजवरचा झगमगाट, प्रकाश योजना, मांडणी आणि ट्रिक्स हे सारं पाहिलं म्हणजे नवल वाटतं. पण यासाठी अनेक कलाकार अनेक दिवस झटतात आणि कंपनीही त्यावर लाखो रुपये खर्च करते. आताच्या काळात एकेका इव्हेंटवर करोडो रुपये खर्चले जात आहेत. याचा फायदा इव्हेन्ट मॅनेजमेंटच्या व्यवसायात शिरणाऱ्या तरुणांना होऊ शकतो. विवाहाच्या आयोजनाचंही मॅनेजमेंट केलं जातं आणि निरनिराळ्या स्वरूपात केलं जातं. या पार्श्वभूमीवर सध्या केवळ इव्हेन्ट मॅनेजमेंटचे प्रशिक्षण देणाऱ्या काही मोजक्याच संस्था आहेत. मात्र एमबीए चं शिक्षण देणाऱ्या काही संस्थां या विषयाचं शिक्षण देत आहेत. इच्छुकांना कोणत्याही व्यवस्थापन शास्त्र संस्थांकडे चौकशी करता येत नाही.

खेचाखेची

## बोलू लागले

आधी आमच्या सोसायटीत
आमच्यासोबत कोणी बोलत
नव्हतं...
पण जेव्हा सगळ्यांना कळलं
की, आमच्याकडे उंच स्टूल,
फोल्डिंगची शिडी आणि जाळे
काढण्यासाठी दांडा असलेला
झाडू आहे,
.
.
तेव्हापासून सगळे आमच्याशी
थांबून बोलू लागले...

### वेगळं काही

फिलिपाईन्सची राजधानी मनिलाच्या जवळ असलेल्या बटानगस शहरामधल्या ड्रेनेज सिस्टिमच्या स्वच्छतेदरम्यान सफाई कामगारांच्या हाती काही डझन वॉलेट्स लागली. त्यात बरीच क्रेडिट्स कार्ड होती. पण या वॉलेट्समध्ये एकही पैसा नव्हता. क्रेडिट कार्डसही कालावधी संपलेली होती. ही सगळी वॉलेट्स ड्रेनेज लाईनच्या तळाशी होती याचा अर्थ असा की बऱ्याच कालावधीपासून ती तिथे पडून होती. यात मालकांची ओळखपत्रही होती. हे भुरट्या चोरांचं काम असल्याचा त्यांचा अंदाज आहे. पाकिटं मारून चोरांनी त्यातले पैसे काढून घेतले असावेत आणि पाकिटं गटारात टाकून दिली असावी असं त्यांचं म्हणणं आहे.

## आरामदायी पादत्राणं निवडा

ॲक्सेसरीज

उन्हाळ्यात उन्हाच्या प्रखरतेमुळे केवळ हात, चेहरा, केस यांच्याशी संबंधित समस्या उद्‌भवतात असं नाही. या ऋतूतील चिकचिकाटामुळे पायाच्या त्वचेलाही अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे उन्हाळ्यात पादत्राणांची निवड करताना काळजी घ्यावी. या संदर्भातील काही महत्त्वाच्या टीप्स...



✻ फ्लिप फ्लॉप स्लिपर – उन्हाळ्यात फ्लिप फ्लॉप स्लिपर अत्यंत आरामदायी असतात. पायांना घाम येत असेल तर या उपयुक्त ठरतात. यात पाय कोरडे राहण्यास मदत होते.

✻ ॲथलेटिक सँडल – ॲथलिट सँडल्स उत्तम ठरतात. यामुळे पावलांमध्ये हवा खेळती राहून घामाचा त्रास होत नाही.

✻ एस्पाड्रिल्स – बाजारातील लोकप्रिय प्रकार म्हणजे एस्पाड्रिल्स. या पादत्राणांमध्ये आराम आणि स्टाईल या दोहोंचा संगम पहायला मिळतो.

✻ डेनिम स्लाईड्स – उन्हाळ्यात वॉर्डरोबमध्ये डेनिम असतं तसंच ते शू रॅकमध्येही असावं. कडक उन्हाळ्यात डेनिमची आरामदायी पादत्राणं पसंतीस उतरतात.

✻ स्लाईड्स – स्टायलिश आणि आराम या दोहोंचा संगम हवा तर स्लाईड्स हा सर्वोत्तम पर्याय आहे. तरुणींमध्ये या स्टाईलची क्रेझ दिसून येते.

## सुडोकू २०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ९ | | ६ | | ४ | |
| ८ | ३ | | | | ४ | | | |
| | | | | | ७ | ५ | १ | |
| | २ | ४ | | | १ | ८ | ५ | |
| ५ | ८ | | ६ | | २ | | ९ | ७ |
| | ९ | ७ | ८ | | | २ | ६ | |
| | १ | ६ | ३ | | | | | |
| | | | ४ | | | | ३ | १ |
| | ४ | | १ | | ८ | | | |

टीप -
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ५ | ७ | २ | ३ | ९ | ४ | १ | ६ |
| ४ | २ | ६ | ५ | ८ | १ | ९ | ३ | ७ |
| ९ | १ | ३ | ६ | ७ | ४ | ८ | २ | ५ |
| ६ | ८ | १ | ९ | ४ | ७ | ३ | ५ | २ |
| २ | ९ | ४ | १ | ५ | ३ | ६ | ७ | ८ |
| ७ | ३ | ५ | ८ | २ | ६ | १ | ४ | ९ |
| ५ | ७ | ९ | ४ | १ | ८ | २ | ६ | ३ |
| १ | ६ | २ | ३ | ९ | ५ | ७ | ८ | ४ |
| ३ | ४ | ८ | ७ | ६ | २ | ५ | ९ | १ |

## शब्दकोडे क्रमांक २०



**आडवे शब्द :-**
१) पक्का निश्चय दाखविणारी एक म्हण.
१०) कोवळा अंकुर
११) लाटांचा आवाज
१२) कावळा
१३) दिनांक
१५) एक मोठे चर्मवाद्य
१७) केव्हा ( ग्रा.)
१९) ✻✻✻ निर्यात
२०) तेव्हा ( ग्रा.)
२२) अत्यंत तिखट मसाले [illegible]
२६) ज्ञानियांच्या राजाने भोगलेले राजसुख
२८) मगज
२९) दुर्गंधयुक्त पाणी
३१) चुरुचुरु,सतत हलणे,वळवळणे
३४) ✻✻✻तमका
३५) सैन्याचा मुक्काम,बूड
३६) प्रजा
३७) घराणे
३८) माजघर
४०) होकारच्या विरुद्धचा शब्द
४३) स्तुतीची गाणी
४५) मनुका
४६) पंजाब मधील एक नदी
४८) कदर करणारा
५०) परमेश्वर
५१) अहिल्येचा उद्धार करणारा
५२) डावा
५३) गणपतीच्या आईचे एक नाव
५४) ६३पर्वताचा मध्यभाग,सैन्याची बगल
५७) जेवणे,पोट भरणे
५८) अत्यंत तिखट,उग्र
५९) वर्ध्याजवळील पू.विनोबाजींच्या परमधाम आश्रमाचे गाव
६०) कारखान्यात काम करणारा मजूर
६२) लोकमान्य टिळकांनी गीतेवर लिहिलेला टीकाग्रंथ
६३) ये ✻✻ मुझे दे दे ठाकूर शोले चित्रपटातील गब्बरची मागणी.

**उभे शब्द :-**
१) भुईमूगाचा दाणा
२) कोवळा अंकुर
३) रेडा,हल्या
४) घोडे बांधण्याची जागा
५) करमणूक करणारे
६) अभंगातील तुकाराम
७) अग्र
८) कष्ट,प्रयत्न
९) बोटाच्या टोकावरील आवरण
१४) पद्धत
१५) व्यापारातील फायदा
१६) रात्र सुगंधित करणारी वनस्पती
१८) मरुत,पवन
१९) नभ
२१) किराणा माल विकणारा,वाचा
२३) आईचा नवरा
२४) लहाब,छोटा
२५) श्रीफळ
२७) वर्तुळ
२८) प्रस्थान करणे
२९) मान खाली घातलेला
३०) केस कापणे
३२) वतन मिळालेला
३३) माल साठविण्याची जागा
३४) न्यायालय ( हिं.)
३६) धरित्री
३८) माकडातील एक प्रकार
३९) कापड
४१) चकणा
४२) आग्रा येथील संगमरवरी प्रसिद्ध वास्तू
४४) मुख,चेहरा
४५) अफाट,पुष्कळ
४६) युद्ध
४७) सत्ता
४९) श्रीकृष्णाचे एक नाव
५१) नमस्काराचा एक शब्द
५३) दोघेजण
५५) एक रंगीत कंदमूळ
५६) कोना
५७) निरुद्योगी,भटक्या द्वाड
६०) तांबे–एक धातू
६१) इंद्रिय.

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# निवडक

## विराटकडून वनडे क्रिकेटमधील निवृत्तीचे संकेत!

**नवी दिल्ली :** टीम इंडियाचा अनुभवी फलंदाज विराट कोहली याने ऑस्ट्रेलिया विरूद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात घोर निराशा केली. विराट एडलेड ओव्हलमध्ये भोपळा फोडण्यात अपयशी ठरला. विराटची एकदिवसीय क्रिकेटमध्ये या मालिकेत झिरोवर आऊट होण्याची ही सलग दुसरी वेळ ठरली. विराटने ४ चेंडूंचा सामना केला. मात्र विराटला खातं उघडता आलं नाही. झिरोवर आऊट



झाल्यानंतर विराटच्या चेहऱ्यावर नाराजी दिसत होती. विराट या निराशेसह ड्रेसिंग रुमच्या दिशेने निघाला. यावेळेस क्रिकेट चाहत्यांनी विराटला स्टँडिंग ओव्हेशन देत सन्मान दिला. विराटनेही चाहत्याचं अभिवादन स्वीकारलं. त्यानंतर विराटने केलेल्या एका इशाऱ्यामुळे तो लवकरच एकदिवसीय क्रिकेटमधूनही निवृत्त होणार असल्याचं म्हटलं जात आहे. विराटचा ऑस्ट्रेलिया विरूद्धचा तिसरा आणि अंतिम सामना हा त्याच्या एकदिवसीय कारकीर्दीतील शेवटचा सामना असल्याचं म्हटलं जात आहे. विराट पर्थमध्ये रविवारी १९ ऑक्टोबरला झाला होता. विराट पर्थमध्ये ८ चेंडूंचा सामना केल्यानंतरही १ धावही करण्यात अपयशी ठरला.

## इस्त्रायली जिम्नॅस्टला इंडोनेशियात प्रवेश मनाई

**इंडोनेशिया :** आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीने सर्व क्रीडा महासंघांना इंडोनेशियामध्ये कोणतेही कार्यक्रम आयोजित न करण्याचा सल्ला दिला आहे. इंडोनेशियाशी झालेल्या सर्व वाटाघाटीही स्थगित केल्या आहेत. इंडोनेशियाने जागतिक कलात्मक जिम्नॅस्टिक्स चॅम्पियनशिपमध्ये इस्त्रायली खेळाडूंना प्रवेश नाकारल्यानंतर कडून हे पाऊल उचलण्यात आले आहे. इंडोनेशिया १९ ते २५ ऑक्टोबर दरम्यान जागतिक कलात्मक जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करत आहे. गाझामधील इस्त्रायलच्या लष्करी कारवाईच्या निषेधार्थ इंडोनेशियाने इस्त्रायली जिम्नॅस्टना व्हिसा नाकारला होता. परिणामी, जकार्ता येथे सुरू झालेल्या जागतिक कलात्मक जिम्नॅस्टिक्स अजिंक्यपद स्पर्धेत इस्त्रायली खेळाडू सहभागी होऊ शकले नाहीत. इंडोनेशियाचे वरिष्ठ कायदेशीर व्यवहार मंत्री युसरिल इहजा महेंद्र म्हणाले की, सरकार आणि इस्लामिक धर्मगुरूंच्या परिषदेने इस्त्रायलच्या सहभागावर आक्षेप घेतला होता. इंडोनेशियाचे इस्त्रायलशी औपचारिक राजनैतिक संबंध नाहीत आणि गाझा युद्धात त्यांनी इस्त्रायलवर जोरदार टीका केली आहे.

## नीरज चोप्रा बनला लेफ्टनंट कर्नल

**पानिपत :** ऑलिंपिक सुवर्णपदक विजेता नीरज चोप्राची भारतीय सैन्यात लेफ्टनंट कर्नल (मानद) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बुधवारी दिल्लीत झालेल्या एका समारंभात संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी त्याला ही उपाधी प्रदान केली. त्याची आई सरोज देवी, वडील सतीश



चोप्रा, काका भीम चोप्रा आणि पत्नी हिमानी मोर हे देखील उपस्थित होते. हरियाणातील पानिपत येथील रहिवासी नीरज चोप्रा २६ ऑगस्ट २०१६ रोजी नायब सुभेदार म्हणून सैन्यात दाखल झाला. २०२१ मध्ये त्याला सुभेदार म्हणून बढती देण्यात आली. टोकियो ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक जिंकल्यानंतर त्याला सैन्याने परम विशिष्ट सेवा पदक प्रदान केले. २०२२ मध्ये नीरजला सुभेदार मेजर म्हणून बढती देण्यात आली. १४ मे रोजी, भारतीय सैन्याने नीरज चोप्राला प्रादेशिक सैन्यात लेफ्टनंट कर्नलची मानद पदवी प्रदान केली. नीरजला क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी आणि राष्ट्राप्रती असलेल्या वचनबद्धतेसाठी हा सन्मान देण्यात आला. राजपत्रानुसार, ही नियुक्ती १६ एप्रिलपासून लागू झाली.

## कुस्तीगीर विश्वजीत मोरेला कांस्यपदक

**सर्बिया :** सर्बियातील नोव्ही सॅड येथे झालेल्या २३ र्षांखालील वरिष्ठ जागतिक कुस्ती स्पर्धेत कुस्तीगीर विश्वजीत मोरेने कांस्यपदक जिंकले. त्याने ५५ किलो ग्रीको-रोमन प्रकारात ही कामगिरी केली आणि भारताला या अजिंक्यपद स्पर्धेतील पहिले पदक मिळवून दिले.त्याने संपूर्ण सामन्यात आक्रमक खेळ आणि मजबूत बचावाचे उत्कृष्ट मिश्रण दाखवत कझाकस्तानच्या कुस्तीगीरला ५-४ च्या जवळच्या फरकाने पराभूत केले. विश्वजीतने आपल्या



मोहिमेची सुरुवात रोमानियन कुस्तीगीरावर विजय मिळवून केली आणि नंतर तांत्रिक श्रेष्ठतेने एका अमेरिकन कुस्तीगीरला हरवून पुढील फेरीत प्रवेश केला.क्वार्टर फायनलमध्ये त्याचा सामना कुस्तीगीर अलिबेकशी झाला, जिथे तो पराभूत झाला. तथापि, अलिबेकच्या अंतिम फेरीत प्रगतीमुळे विश्वजीतला रेपेचेज फेरीत परतण्याची संधी मिळाली. रेपेचेज लढतीत, विश्वजीतने जॉर्जियन कुस्तीगीरला एकतर्फी पराभव दिला. त्याने उत्कृष्ट तंत्र आणि ताकद दाखवली, तांत्रिक श्रेष्ठतेच्या जोरावर लढत जिंकली आणि कांस्यपदकाच्या लढतीत स्थान मिळवले.

## महिला विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या सह-यजमानपदासाठी अमेरिकेची साथ

**न्यूयॉर्क :** अमेरिकेने २०३१ महिला विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या सह-यजमानपदासाठी मेक्सिको, कोस्टा रिका आणि जमैका यांना साथ देण्याचा निर्णय घेतला आहे. या स्पर्धेच्या यजमानपदासाठी अमेरिका, मेक्सिको, कोस्टा रिका आणि जमैका या देशांनी संयुक्तपणे एकच बोली लावण्यात आली आहे. फिफा सदस्यांच्या ३० एप्रिल २०२६ मध्ये होणाऱ्या बैठकीत या एकमेव बोलीवर विचार केला जाईल. महिला विश्वचषक स्पर्धादेखील पुरुषांच्या स्पर्धेप्रमाणे विस्तारलेली असेल. महिला स्पर्धेतही ४८ देश सहभागी होतील. पुरुषांची विश्वचषक स्पर्धा कशी संयुक्तपणे आयोजित केली जाईल, तशाच समान रचनेत महिलांची स्पर्धादेखील पार पडेल. संघ, सामन्यांची संख्या नाही, तर सुविधांच्या गुणवत्तेतही ही स्पर्धा समान अनुभव देईल, असे अमेरिकन फुटबॉल महासंघाच्या अध्यक्षा सिंडी पार्लो कोन यांनी सांगितले. या स्पर्धेतील सामन्यांच्या आयोजनासाठी अमेरिकेतील तीसहून अधिक शहरांनी तयारी दर्शविल्याची माहितीदेखील सिंडी पार्लो कोन यांनी दिली. अमेरिकेने यापूर्वी १९९९ मध्ये महिला विश्वचषक स्पर्धेचे आयोजन केले होते. तेव्हा संघांची संख्या १२ वरून १६ करण्यात आली होती आणि एकूण ३२ सामन्यांना १.२ दशलक्ष चाहत्यांची उपस्थिती होती. अमेरिका आणि मेक्सिको फुटबॉल महासंघाने गेल्या वर्षी एप्रिलमध्येच २०२७ च्या स्पर्धेचे संयुक्त आयोजन करण्याचा विचार मागे घेतला.

# ऑस्ट्रेलियाने केला भारताचा पराभव



**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

ऑस्ट्रेलियाने ॲडलेडमध्ये भारताला २ विकेट्सने पराभूत करत तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली. भारतीय संघाला १७ वर्षांनी ॲडलेडमध्ये पराभवाचा सामना करावा लागला. ऑस्ट्रेलियासाठी ॲडम झाम्पा, मॅथ्यू शॉर्ट आणि कुपर कोनोली यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

ऑस्ट्रेलियाने भारताविरुद्ध ॲडलेडला झालेल्या दुसऱ्या वनडे सामन्यात गुरुवारी २ विकेट्सने विजय मिळवला. या विजयासह ऑस्ट्रेलियाने तीन सामन्यांची वनडे मालिका २-० अशा फरकाने आघाडी घेतली. त्यामुळे ऑस्ट्रेलियाने मालिकेतील विजय देखील निश्चित केला आहे. त्यामुळे आता तिसऱ्या सामन्यात भारताला प्रतिष्ठेसाठी खेळावे लागणार आहे. ऑस्ट्रेलियासाठी ॲडम झाम्पा, मॅथ्यू शॉर्ट आणि कुपर कोनोली यांनी विजयात मोलाचे योगादन दिले.या सामन्यात ऑस्ट्रेलियाला विजयासाठी २६५ धावांचे लक्ष्य भारताने ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने ४६.२ षटकात ८ विकेट्स गमावत पूर्ण केला. शॉर्ट आणि कोनोली यांनी अर्धशतके केली. भारतीय संघ वनडेत ॲडलेडमध्ये १७ वर्षांनी पराभूत झाला आहे. यापूर्वी भारताने ॲडलेडमध्ये शेवटचा पराभव २००८ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध स्वीकारला होता.

ऑस्ट्रेलियाकडून मिचेल मार्श आणि ट्रॅव्हिस हेड यांनी संयमी सुरुवात केली होती. भारतीय गोलंदाजांनी त्यांना सुरुवातीला मोठ्या धावा करण्यापासून बराचवेळ रोखले होते. अखेर ८ व्या षटकात कर्णधार मिचेल मार्शला अर्शदीप सिंगने ११ धावांवर बाद केले, त्यानंतर १३ व्या षटकात हर्षित राणाने ट्रॅव्हिस हेडचा मोठा अडथळा दूर केला. हेडने ४० चेंडूत २८ धावा केल्या. सलामीवीर बाद झाल्यानंतर मॅथ्यू रेनशो आणि मॅथ्यू शॉर्ट यांच्यात अर्धशतकी भागीदारी झाली. त्यामुळे ऑस्ट्रेलियाने १०० धावांचा टप्पा पार केला. पण ही भागीदारी २२ व्या षटकात अक्षर पटेलने रेनशॉ याला ३० धावांवर त्रिफळाचीत करत तोडली.

त्यानंतर ॲलेक्स कॅरीलाही वॉशिंग्टन सुंदरने ९ धावांवरच त्रिफळाचीत केले. त्यामुळे ऑस्ट्रेलिया दबावात आले होते. मात्र नंतर शॉर्ट आणि कोनोली यांच्यात पुन्हा अर्धशतकी भागीदारी केली. त्यामुळे ऑस्ट्रेलियाचा विजय सोपा झाला. तरी शॉर्टला ३६ व्या षटकात हर्षित राणाने बाद करत भारताच्या आशा उंचवल्या होत्या. यापूर्वी मोहम्मद सिराजकडून एक झेलही सुटला होता. दरम्यान, शॉर्टने ७८ चेंडूत ७४ धावांची खेळी केली, ज्यात त्याने ४ चौकार आणि २ षटकार मारले.

तो बाद झाल्यानंतरही मिचेल ओवेनने आक्रमक खेळताना ऑस्ट्रेलियाला विजयाच्या आणखी जवळ नेले. तरी त्याचे वादळ ४३ व्या षटकात वॉशिंग्टन सुंदरने थांबवले. त्याला २३ चेंडूत ३६ धावा करता आल्या. त्याने २ चौकार आणि ३ षटकार मारले. तो बाद झाल्यानंतर अर्शदीप सिंगने झेव्हियर बार्टलेटला ३ धावांवर आणि मोहम्मद सिराजने मिचेल स्टार्कला ४ धावांवर बाद केले होते. त्यामुळे भारतीय संघाने पुनरागमन केले होते, पण तोपर्यंत ऑस्ट्रेलियभारताकडून हर्षित राणा, अर्शदीप सिंग आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. तसेच मोहम्मद सिराज आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

तत्पुर्वी, भारताने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकात ९ बाद २६४ धावा केल्या होत्या. भारताकडून रोहित शर्माने सर्वाधिक ७३ धावांची खेळी केली, तसेच श्रेय अय्यरने ६१ धावांची खेळी केलीज. या दोघांमध्ये तिसऱ्या विकेटसाठी ११८ धावांची भागीदारी केली. हे दोघे बाद झाल्यानंतर अक्षर पटेलने ४१ चेंडूत ४४ धावांची खेळी केली, तर हर्षित राणाने नाबाद २४ धावा केल्या. बाकी कोणाला खास काही करता आले नाही.ऑस्ट्रेलियाकडून गोलंदाजी करताना ॲडम झाम्पाने ४ विकेट्स घेतल्या, तर झेव्हियर बार्टलेटने ३ विकेट्स घेतल्या, तर मिचेल स्टार्कने २ विकेट्स घेतल्या.

### मोहित स्पोटर्स आग्राव संघ विजेता

# नाईट अंडर आर्म क्रिकेटचा महाजने येथे रंगला थरार





**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

श्री महाजनाई स्पोर्ट्स क्लब आयोजित नाईट अंडर आर्म क्रिकेट स्पर्धांचे आयोजन बुधवारी करण्यात आले. या स्पर्धेत मोहित स्पोटर्स आग्राव संघ अंतिम विजेता ठरला असून या संघाला कै. अंकित हरेश पारंगे व रत्नदिप नारायण पारंगे स्मृती चषक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेचा शुभारंभ बुधवारी (दि.२२) रात्री झाला. या स्पर्धेत एकूण ३२ संघाने सहभाग घेतला होता. रात्रभर ही स्पर्धा रंगली. प्रत्येक संघाने विजय मिळवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. काही सामने चुरशीचे झाले, तर काही सामने एकतर्फी झाले. अंतिम सामना गुरुवारी (दि.२३ ) झाला. त्यामध्ये मोहित स्पोटर्स आग्राव संघ अंतिम विजेता ठरला. या संघाला चषक व दहा हजार रुपये असे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. बापदेव भेरसे संघाला द्वितीय क्रमांकाचे रोख सात हजार रुपये व चषक, मिरा स्पोटर्स आग्राव संघाने तृतीय व श्री महाजनाई स्पोटर्स क्लब (ब) या संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला. या दोन्ही संघांना प्रत्येकी चार हजार रुपये व चषक देऊन सन्मानीत करण्यात आले. तसेच उत्कृष्ट फलंदाज म्हणून अनिकेत म्हात्रे (भेरसे) मालिकावीर म्हणून अभिराज आणि उत्कृष्ट गोलंदाज म्हणून विवेक यांना चषक देऊन गौरविण्यात आले. बक्षीस वितरण विलास भोनकर शशीकांत पाटील, तुषार गुंड, रुपेश पाटील, राजाराम पारंगे, सुबोध पारंगे, सतिश पारंगे, अरविंद पाटील आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी श्री महाजनाई स्पोटर्स क्लबचे पदाधिकारी व सदस्यांनी प्रचंड मेहनत घेतली. संपूर्ण स्पर्धेचे समालोचन विनायक भोनकर, रुपेश पाटील, स्वप्नील पारंगे, संकेत पारंगे यांनी केले.

### रेवदंडा येथील कुस्ती स्पर्धेत

# वाडगाव आखाडा प्रथम



**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

रेवदंडा येथे आयोजीत कुस्ती स्पर्धेत वाडगाव आखाडयाने प्रथम क्रमांक पटकाविला, तर बेलोशी आखाडा द्वितीय, व पनवेल आखाडा तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरला.

सालाबाद प्रमाणे रेवदंडा येथे श्री छत्रपती शिवाजी मंडळाचे वतीने मंगळवार दि. २१ ऑक्टोबर रोजी सायकांळी साडेतिनचे सुमारास लक्ष्मीपुजनाचे निमित्ताने को.ए.सो.हायस्कुलचे प्रांगणात सलग ७२ व्या वर्षात कुस्तीचे जंगी सामन्यास सुरूवात झाली, या स्पर्धेत शेकापक्षाच्या महाराष्ट्र सोशल मिडिया प्रवत्ता चित्रलेखा पाटील यांची उपस्थिती जाहीर होती, परंतू काही अपिहार्य कारणाने त्या शुभारंभ कार्यक्रमास उपस्थित राहिल्या नाहीत, मात्र या कुस्ती स्पर्धेसाठी प्रमुख अतिथी म्हणून शिवसेना उबाठा जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांची उपस्थिती होती. तसेच महाराष्ट्र कुस्तीगीर संघटनेचे कार्याध्यक्ष जयेंद्र भगत, प्रमोद भगत, रेवदंडा ग्रा.प. माजी सदस्य संदिप खोत हे मान्यवर मंडळी सुध्दा या कुस्ती स्पर्धेचा निमित्ताने उपस्थित राहिले होते,

प्रारंभी श्री मारूतीरायांची प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करण्यात आली, व महाराष्ट्र कुस्तीगीर संघटनेचे कार्याध्यक्ष जयेंद्र भगत यांचे हस्ते श्रीफळ वाढविण्यात आला, तसेच

**■ बेलोशी आखाडा द्वितीय तर पनवेल आखाडा तृतीय क्रमांकाचा ठरला मानकरी**

कुस्ती मैदानाचा शुभारंभ शिवसेना उबाठा जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे व श्री छत्रपती शिवाजी महाराज रेवदंडा-चौल अध्यक्ष सुरेश खोत यांचे हस्ते श्रीफळ वाढवून स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. या स्पर्धेसाठी रेवदंडा ग्रा.प. सदस्य पै. इनुसभाई तांडेल यांचे स्मरणार्थ प्रथम,द्वितीय, तृतीय क्रमांकास चषक ठेवण्यात आले, होते, तसेच प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांकास रोख पारितोषीक वितरीत करण्यात आले. तसेच प्रत्येक कुस्तीस विविध पारितोषिके प्रदान करण्यात आली.या स्पर्धेत पंचाचे काम सुधाकर पाटील, वैभव मुकादम, संदिप मोरे, चंद्रकांत धाटावकर, बाळा गुरव यांनी पाहिले. यावेळी श्री छत्रपती शिवाजी मंडळ अध्यक्ष सुरेश खोत, उपाध्यक्ष शरद वरसोलकर, खजिनदार हेमंत गणपत, ग्रा.प.सदस्य खलिल तांडेल, मधुकर फुंडे, ०संदिप खोत, निलेश खोत, महेश ठाकूर, बाळु नवखारकर, विजय आढाव, राहुल हेमंत गणपत, आर्दीनी स्पर्धा यशस्वीपणे पार पडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# दक्षिण अफ्रिकेने पाकिस्तानला दाखवले दिवसा तारे

**| लाहोर | वृत्तसंस्था |**

दुसऱ्या कसोटी सामन्यात पाकिस्तानने नाणेफेकीचा कौल जिंकला आणि प्रथम फलंदाजी स्वीकारली. पाकिस्तानने पहिल्या डावात ११३.४ षटकांचा सामना केला आणि ३३३ धावांवर संपूर्ण संघ बाद झाला. त्यामुळे पहिला डावात पाकिस्तान वरचढ ठरेल असं वाटलं होतं. पण दक्षिण अफ्रिकेने हा अंदाज फोल ठरवला.

कारण अवघ्या २३५ धावांवर ८ खेळाडू तंबूत परतले होते. त्यामुळे पाकिस्तानच्या हातात पहिला डाव होता. आरामात आघाडी घेईल असं वाटलं होतं. पण तळाच्या फलंदाजांना पाकिस्तानी गोलंदाजांचा घाम काढला. मुथुसामी आणि केशव महाराज यांनी नवव्या विकेटसाठी ९२ चेंडूत ७१ धावांची भागादारी केली. या दोघांच्या भागीदारीमुळे संघाची धावसंख्या ३००च्या पार गेली. ३०६ धावा असताना केशव महाराजच्या रुपाने नववी विकेट पडली. शेवटच्या विकेटसाठी मुथुसामी आणि कागिसो रबाडा मैदानात होते. ही विकेट झटपट पडेल असं वाटलं होतं. पण झालं भलतंच.

मुथुसामी आणि रबाडा यांनी शेवटच्या विकेटसाठी ९८ धावांची भागीदारी केली. ११७ चेंडूत त्यांनी या धावा ठोकल्या. यात रबाडाचं योगदान ७१ धावांचं होतं. कागिसो रबाडाने ६१ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकार मारत ७१ धावांची खेळी केली. तर मुथुसामी १५५ चेंडूत ८ चौकार मारत नाबाद ८९ धावांवर राहिला. या दोघांच्या खेळीमुळे जिथे पाकिस्तानला आघाडी मिळणार तिथे दक्षिण अफ्रिकेला आघाडी मिळाली. दक्षिण अफ्रिकेने पहिल्या डावात ७१ धावांची आघाडी घेतली. ही आघाडी मोडू काढताना पाकिस्तानचे चार विकेट पडले.

दक्षिण अफ्रिकेकडून दुसऱ्या डावात सिमोन हार्मरने भेदक गोलंदाजी केली. त्याने १३ षटाकत २६ धावा देत ३ गडी बाद केले. तर कागिसो रबाडाने १ विकेट घेतली. पाकिस्तानला १२ धावा असताना इमाम उल हकच्या रुपाने पहिला धक्का बसला. संघाच्या १६ धावा असताना धडाधड दोन विकेट पडल्या. अब्दुल्ला शफीक ६ धावांवर, तर शान मसूदला तर खातंही खोलता आलं नाही.

सऊद शकीलने बाबर आझमसह भागीदारी केली. पण ११ धावा करून बाद झाला. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा पाकिस्तानने ४ गडी गमवून ९४ धावा केल्या. पाकिस्तानकडे दुसऱ्या डावात २३ धावा जमा झाल्यात. बाबर आझम नाबाद ४९, तर मोहम्मद रिझवान नाबद १६ धावांवर खेळत आहेत.

# लक्ष्य सेनचे आव्हान संपुष्टात

**फ्रान्स :** भारताच्या लक्ष्य सेनला पुन्हा एकदा पहिल्या फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत आयर्लंडच्या नवख्या न्हाट एन्गुयेन याने लक्ष्यचा २१-७, २१-१६ असा पुराभव केला. लक्ष्यने हाँगकाँग स्पर्धेच अंतिम फेरी गाठली होती. एन्गुयेन याच्या जोरकस स्मॅशचा सामना करताना लक्ष्यला सामन्यात संघर्ष करावा लागत होता. त्याचे फटकेही स्वैर ठरत होते. त्याच्या एकूणच खेळात अचूकतेचा अभाव होता. पहिल्या गेमला सुरुवातीलाच राहिलेल्या २-७ अशा पिछाडीतून लक्ष्य बाहेरच येऊ शकला नाही. ही पिछाडी पुढे ७-१९ अशी वाढली आणि एन्गुयेनने पहिला गेम जिंकला. दुसऱ्या गेमला लक्ष्यने थोडा प्रतिकार केला. त्याने पिछाडी भरून काढली होती.

### मालिकेत १-१ ने केली बरोबरी | बांगलादेशचे विजयासाठी २१४ धावांचं आव्हान

# विंडीजचा सुपर ओव्हरमध्ये विजय



**| ढाका | वृत्तसंस्था |**

वेस्टइंडिज क्रिकेट टीमने दुसऱ्या आणि करो या मरो एकदिवसीय सामन्यात बांगलादेशवर मात केली आहे. बांगलादेशने विंडीजला विजयासाठी २१४ धावांचं आव्हान दिलं होतं. विंडीजला विजयासाठी शेवटच्या बॉलवर विजयासाठी ३ धावांची गरज होती. विंडीजने २ धावा केल्या. दोन्ही संघांच्या समसमान २१३ धावा झाल्या. त्यामुळे सामना बरोबरीत सुटला. त्यानंतर सुपर ओव्हरद्वारे सामन्याचा निकाल लागला.

विंडीजने टॉस जिंकला. बांगलादेशला बॅटिंगसाठी भाग पाडलं. विंडीजने या सामन्यात सर्व ५० ओव्हर फिरकी गोलंदाजांकडून करुन घेतल्या. क्रिकेट विश्वात फिरकी गोलंदाजांनीच संपूर्ण ५० ओव्हर टाकण्याची ही पहिलीच वेळ ठरली. विंडीजने बांगलादेशला ५० ओव्हरमध्ये ७ झटके देऊन २१३ धावांवर रोखलं.

बांगलादेशसाठी सौम्य सरकार याने ४५ धावा केल्या. कॅप्टन मेहदी हसन याने ३२ धावा जोडल्या. तर रिशाद हुसैन याने अखेरच्या क्षणी १४ बॉलमध्ये ३९ रन्स केल्या. त्यामुळे बांगलादेशला २०० पार पोहचता आलं. विंडीजसाठी गुडाकेश मोती याने सर्वाधिक ३ विकेट्स मिळवल्या. अकील हुसैन आणि एलिक अथानजे या दोघांनी प्रत्येकी २-२ विकेट्स मिळवल्या. तर खारी पियरे आणि रोस्टन चेज या दोघांना विकेट मिळाली नाही. मात्र या दोघांनी चिवट बॉलिंग केली.

विंडीजने विजयी धावांचा पाठलाग करताना १३३ धावांवर ७ विकेट्स गमावल्या. मात्र कॅप्टन शाई होप याने एक बाजू लावून धरत विंडीजला सामन्यात कायम ठेवलं. होपने नाबाद ५३ धावा केल्या. तर कीसी कार्टी याने ३५ धावांचं योगदान दिलं. तर जस्टीन ग्रीव्ह याने २६ धावा जोडल्या.

**सुपर ओव्हरचा थरार**

**विंडीजने सुपर ओव्हरमध्ये १० धावा केल्या. मात्र बांगलादेशला ११ धावा करता आल्या नाहीत. विंडीजने बांगलादेशला ८ धावांवर रोखलं आणि २ धावांनी सुपर ओव्हरमध्ये विजय मिळवला. विंडीजने अशाप्रकारे मालिकेत बरोबरीत करत पहिल्या पराभवाची परतफेड केली.**

# आशिया चषक देण्यावरून नक्वींची नकारघंटा कायम

**नवी दिल्ली :** आशिया चषक; क्रिकेट स्पर्धेतील विजेतेपदाचा चषक आशियाई क्रिकेट परिषदेचे (एसीसी) अध्यक्ष मोहसिन नक्वी यांच्याकडून स्वीकारण्यास नकार देण्याच्या भारताच्या भूमिकेला श्रीलंका आणि अफगाणिस्तानकडून पाठिंबा मिळाला असला, तरी नक्वी यांनी मात्र चषक भारताला न देण्याचा हट्ट सोडलेला नाही. चषक सध्या एसीसीच्या कार्यालयात असून, तो माझ्या हस्तेच भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या प्रतिनिधीने स्वीकारावा अशी ठाम भूमिका नक्वी यांनी घेतली आहे. मात्र, बीसीसीआयने त्याला नकार दिला आहे. पुढील महिन्यात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) बैठकीत हा मुद्दा उपस्थित करण्याचा पुनरुच्चार बीसीसीआयने केला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)